# सार्वजनिक उपक्रम समिती

(२०१२-२०१३)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्र शासनाच्या सन २००६-०७ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील "महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित" यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण दोन मधील परिच्छेद क्रमांक २.२.९ ते २.२.१३, २.२.१५, २.२.१७ ते २.२.१९, २.२.२१, २.२.२३, २.२.२७ आणि प्रकरण चार मधील परिच्छेद क्रमांक ४.९ व "महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित"यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण चार मधील परिच्छेद ४.१०. तसेच महाराष्ट्र शासनाच्या सन २००७-०८ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील "महाराष्ट्र शेती विकास महामंडळ मर्यादित" यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.४ व "महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ" यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.१९ व ३.२० यावरील समितीचा

## अकरावा अहवाल

सत्यमेव जयते

( दिनांक १९ डिसेंबर, २०१२ रोजी विधानसभेस / विधानपरिषदेस सादर केला )

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर.

# सार्वजनिक उपक्रम समिती

(२०१२-२०१३)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्र शासनाच्या सन २००६-०७ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक
व महालेखापरिक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील "महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी
मर्यादित" यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण दोन
मधील परिच्छेद क्रमांक २.२.९ ते २.२.१३, २.२.१५, २.२.१७ ते
२.२.१९, २.२.२१, २.२.२३, २.२.२७ आणि प्रकरण चार मधील
परिच्छेद क्रमांक ४.९ व "महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी
मर्यादित"यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण चार मधील
परिच्छेद ४.१०. तसेच महाराष्ट्र शासनाच्या सन २००७-०८ च्या
हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या (वाणिज्यिक)
अहवालातील "महाराष्ट्र शेती विकास महामंडळ मर्यादित"
यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण तीन मधील
परिच्छेद क्रमांक ३.४ व "महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ"
यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण तीन मधील
परिच्छेद क्रमांक ३.१९ व ३.२० यावरील समितीचा

## अकरावा अहवाल

## सार्वजनिक उपक्रम समिती

## (२०१२-२०१३)

**समिती प्रमुख :**

(१) डॉ. कल्याण काळे, वि.स.स.

**सदस्य :**

(२) श्री. संग्राम थोपटे, वि.स.स.

(३) श्री. सुभाष घोटे, वि.स.स.

(४) श्री. जगन्नाथ शेट्टी, वि.स.स.

(५) श्री. कैलास गोरंटयाल, वि.स.स.

(६) श्री. दिनानाथ पडोळे, वि.स.स.

(७) श्री. शिरीषकुमार कोतवाल, वि.स.स.

(८) श्री. पंकज भुजबळ, वि.स.स.

(९) डॉ. राजेंद्र शिंगणे, वि.स.स.

(१०) श्री. संजय वाघचौरे, वि.स.स.

(११) श्री. हनुमंत डोळस, वि.स.स.

(१२) ॲड. अशोक पवार, वि.स.स.

(१३) श्री. विकास कुंभारे, वि.स.स.

(१४) श्री. कृष्णा खोपडे, वि.स.स.

(१५) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(१६) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.

(१७) श्री. एकनाथ शिंदे, वि.स.स.

(१८) श्री. चिमणराव पाटील, वि.स.स.

(१९) श्री. महादेव बाबर, वि.स.स.

(२०) श्री. वसंतराव गिते, वि.स.स.

*(२१) श्री. संजय दत्त, वि.प.स.

(२२) श्रीमती अलका देसाई, वि.प.स.

**(२३) श्री. राजेंद्र जैन, वि.प.स.

(२४) श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.

***(२५) डॉ. दिपक सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

डॉ. अ. ना. कळसे, प्रधान सचिव,

श्री. विलास आठवले, उप सचिव,

श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव,

श्री. अमरनाथ ल. जोशी, कक्ष अधिकारी.

* श्री. उल्हास पवार, वि.प.स. यांची सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे, रिक्त जागी श्री. संजय दत्त वि.प.स. यांची दिनांक ३१ ऑक्टोबर २०१२ पासून नियुक्ती करण्यात आली.

** श्री. हेमंत टकले, वि.प.स. यांनी समिती सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यामुळे, रिक्त पदावर श्री. राजेंद्र जैन, वि.प.स. यांची दिनांक ३१ ऑक्टोबर २०१२ पासून नियुक्ती करण्यात आली.

*** डॉ. दिपक सावंत, वि.प.स. यांची विधानपरिषद सदस्यत्वाची मुदत दिनांक ७ जुलै २०१२ रोजी संपल्यामुळे व त्यांची महाराष्ट्र विधानपरिषदेवर सदस्य म्हणून फेरनिवड झाल्यामुळे त्यांचे समितीवरील सदस्यत्व चालू ठेवण्यात आले.



## अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | **प्रस्तावना** | |
| **एक** | **"महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित" (ले.प.अ. २००६-२००७)** | १ |
| | (१) प्रोत्साहक घटक (परिच्छेद क्रमांक २.२.९) | १ |
| | (२) प्रकल्प खर्च व वित्त (परिच्छेद क्रमांक २.२.१०) | ३ |
| | (३) निधी पुरवठ्यातील विलंब (परिच्छेद क्रमांक २.२.११ व २.२.१२) | ५ |
| | (४) एपीडीआरपी प्राप्त्यांसाठी बँकेत खाते न उघडणे (परिच्छेद क्रमांक २.२.१३) | ८ |
| | (५) प्रकल्प नियोजन (परिच्छेद क्रमांक २.२.१५) | ९ |
| | (६) जमिनीच्या उपलब्धतेची खात्री केल्याशिवाय निविदा काढणे (परिच्छेद क्रमांक २.२.१७) | ११ |
| | (७) कार्यसूचीतील त्रुटीमुळे वगळलेली कामे (परिच्छेद क्रमांक २.२.१८) | १३ |
| | (८) प्रकल्प अहवाल तयोर करणे (परिच्छेद क्रमांक २.२.१९) | १४ |
| | (९) कामाची अंमलबजावणी (परिच्छेद क्रमांक २.२.२१) | १८ |
| | (१०) निविदांना अंतिमरुप देण्यात विलंब (परिच्छेद क्रमांक २.२.२३) | २१ |
| | (११) ऊर्जा लेखांकन व ऊर्जा लेखापरीक्षण (परिच्छेद क्रमांक २.२.२७) | २५ |

## अनुक्रमणिका-समाप्त


| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| | (१२) विद्युत आकाराची कमी वसुली (परिच्छेद क्रमांक ४.९) .. .. | २७ |
| दोन | **"महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित" (ले.प.अ.२००६ -२००७)** .. .. | **३०** |
| | (१३) अतिरिक्त पाणी आकाराचे टाळता येण्याजोगे प्रदान (परिच्छेद क्रमांक ४.१०) .. | ३० |
| तीन | **"महाराष्ट्र शेती विकास महामंडळ मर्यादित" (ले.प.अ.२००७ -२००८)** .. .. | ३५ |
| | (१४) भाड्याची वसुली न करणे व अनधिकृत कब्जा (परिच्छेद क्रमांक ३.४) .. .. | ३५ |
| चार | **"महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ" (ले.प.अ.२००७ -२००८)** .. .. | ४१ |
| | (१५) सवलतीच्या दराने भूखंड विक्रीमुळे महसुलाचे नुकसान (परिच्छेद क्रमांक ३.१९) .. | ४१ |
| | (१६) निविदांना अंतिम रूप देण्यामधील विलंबामुळे जादा खर्च (परिच्छेद क्रमांक ३.२०) .. | ४७ |
| पाच | **बैठकींचे परिशिष्टे** .. .. | **५१** |




## प्रस्तावना

मी, सार्वजनिक उपक्रम समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरून, महाराष्ट्र शासनाच्या सन २००६-२००७ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील "महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित" यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण दोन मधील परिच्छेद क्रमांक २.२.९ ते २.२.१३, २.२.१५, २.२.१७ ते २.२.१९, २.२.२१, २.२.२३, २.२.२७ व प्रकरण चार मधील परिच्छेद क्र. ४.९ "महाराष्ट्र राज्य विद्युत वीज निर्मिती कंपनी मर्यादित" यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण चार मधील परिच्छेद क्रमांक ४.१० तसेच महाराष्ट्र शासनाच्या सन २००७-२००८ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील "महाराष्ट्र शेती विकास महामंडळ मर्यादित" यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.४ तसेच "महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ" यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.१९ व ३.२० यावरील समितीचा अकरावा अहवाल (बारावी महाराष्ट्र विधानसभा) सादर करीत आहे.

"महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित" यांच्याकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनावर उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (ऊर्जा) विभागाचे उप सचिव, श्री. अविनाश सुभेदार तसेच "महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित" यांचे व्यवस्थापकीय संचालक, श्री. अजय मेहता व "महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित" यांचे व्यवस्थापकीय संचालक, श्री. आशिष शर्मा यांची समितीने दिनांक १२ सप्टेंबर, २०१२ रोजी साक्ष नोंदवून घेण्यात आली.

"महाराष्ट्र शेती विकास महामंडळ मर्यादित" यांच्याकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनावर महसूल व वन विभागाचे (महसूल), अपर मुख्य सचिव, श्री. स्वाधीन क्षत्रिय व "महाराष्ट्र शेती विकास महामंडळ मर्यादित" यांचे व्यवस्थापकीय संचालक श्री. यु.के.अग्रवाल यांची समितीने दिनांक ११ ऑक्टोबर, २०१२ रोजी साक्ष नोंदवून घेण्यात आली.

"महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ" यांच्याकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनावर उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे (उद्योग) विभागाचे प्रधान सचिव श्री.मनुकुमार श्रीवास्तव व उप सचिव, श्री. किशोर कदम तसेच "महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ" यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. भुषण गगराणी व श्री. पी. अन्बलगन, सह कार्यकारी अधिकारी यांची समितीने दिनांक २६ सप्टेंबर, २०१२ व दिनांक १६ ऑक्टोबर, २०१२ रोजी साक्ष नोंदवून घेण्यात आली.

श्री. पी.एन. शेषाद्री, महालेखाकार, श्री. एस.व्ही. खेडकर, वरिष्ठ लेखा अधिकारी (वाणिज्यिक लेखा परिक्षक) यांनी निमंत्रणानुसार समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला केलेल्या मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांचे आभार मानते. तसेच उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे (ऊर्जा) उप सचिव, श्री. अविनाश सुभेदार तसेच "महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित" यांचे व्यवस्थापकीय संचालक, श्री. अजय

मेहता व "महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित" यांचे व्यवस्थापकीय संचालक, श्री. आशिष शर्मा व महसूल व वन विभागाचे (महसूल), अपर मुख्य सचिव, श्री. स्वाधीन क्षत्रिय व "महाराष्ट्र शेती विकास महामंडळ मर्यादित" यांचे व्यवस्थापकीय संचालक श्री. यु.के.अग्रवाल तसेच उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे (उद्योग) प्रधान सचिव श्री.मनुकुमार श्रीवास्तव व उप सचिव, श्री. किशोर कदम तसेच "महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ" यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. भुषण गगराणी व श्री. पी. अंन्बलगन, सह कार्यकारी अधिकारी यांनी समितीला दिलेल्या संपूर्ण सहकार्याबद्दल समिती त्यांचे आभार मानते.

समितीने मंगळवार, दिनांक २७ नोव्हेंबर, २०१२ रोजी झालेल्या बैठकीत या अहवालावर विचार करून तो काही सुधारणांसह संमत केला.

**विधान भवन**,
मुंबई,
दिनांक २७ नोव्हेंबर २०१२.

**डॉ. कल्याण काळे,**
समिती प्रमुख,
सार्वजनिक उपक्रम समिती.

## "महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित"

**एक "प्रोत्साहक घटक"**

**१.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक २ मधील परिच्छेद क्रमांक २.२.९ मध्ये **"प्रोत्साहक घटक"** यांचे संबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, एपीआरपी अशी तरतुद होती की, वर्ष २०००-०१ हे वर्ष पायाभुत धरुन, राज्य वीज मंडळ/यूटीलीटीजच्या घटलेल्या प्रत्यक्ष वित्तीय तोटयाच्या ५० टक्के रकमेपर्यंत प्रोत्साहक मिळण्यास राज्य सरकार पात्र असेल. ह्या प्रोत्साहक घटकाअंतर्गत प्राप्त झालेले अनुदान केवळ राज्यातील वितरण सुधारणा कार्यावर वापरायचे होते.

**कंपनी रोकड प्रोत्साहकासाठी अपात्र ठरली कारण तोटा कृत्रिमपणे वाढून दाखविला होता.**

रुपये २८९.२७ कोटी रुपयेच्या (म्हणजेच रुपये ५७८.५५ कोटीच्या रोकड तोटयाच्या ५० टक्के) तूलनेत, रुपये १३७.८८ कोटीचा प्रोत्साहक २०००-०१ हे पायाभूत वर्ष धरुन वर्ष २००१-०२ च्या रोकड तोटयाच्या घटीसाठी भारत सरकार नें मंजूर केला. परंतु भारत सरकारने कंपनीस असे कळवले (फेब्रुवारी २००४), की आधीच्या आणि नंतरच्या वर्षांच्या तुलनेत पूर्वावधी आकार (रुपये ८५९.५२) प्रमाणाबाहेर असल्यामुळे तोटा गणनेसाठी स्वीकार्य नव्हता आणि त्यामुळे, कंपनीने वर्ष २००१-०२ च्या लेख्यात दाखविलेली रुपये ५७८.५५ कोटीची रोकड तोटयातील घट, रोकड प्रोत्साहक पात्रतेसाठी स्वीकारण्यायोग्य नव्हती. परंतु भारत सरकार नें पुरवलेल्या रकमेचा परतावा मागितला नाही किंवा ही रक्कम कार्यक्रमांन्तर्गत देण्यात आलेल्या पुढील रकमेत समायोजित केली नाही. तसेच पुढे असे आढळले की कंपनीने प्रोत्साहक रक्कम रुपये १३७.०८ कोटी ऊर्जाक्षेत्राच्या सुधाराकरिता वापरली नव्हती (मे २००७). कंपनीने भारत सरकारकडे पुढचे दावे पेश केले नाही कारण पुढील वर्षात पायाभूत वर्षाच्या (२०००-०१) तुलनेत रोकड तोटा घटला नव्हता.

**१.२** या प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करतांना असे नमूद केले की, भारत सरकारने मंजुर केलेल्या प्रोत्साहक रक्कम रु. २८९.२७ कोटी पैकी १३७.८९ कोटी पैकी GR No. Vipua-२००४/P.K.११६/Urja- ३/दिनांक १.१०.२००५ अन्वये प्राप्त करून दिली आहे. तसेच भारत सरकारने पत्र क्र. ७/१८/२००२-APDRP दि.५.२.२००५ नुसार असे कळविले की, पुर्वावधी आकार रुपये ८५९.५२ कोटी सन २०००-०१ मध्ये खर्च केला होता. मात्र २००१-०२ मध्ये फक्त रु. १९०.५३ कोटींची तरतुद केली होती. तुलनेने सन २०००-०१ मधील खर्च प्रमाणाबाहेर असल्याने लेख्यात दाखविलेली रोकड घट रु.५७८.५५ कोटी पातत्रेसाठी स्विकारली नाही. त्यामुळे वारंवार भारत सरकारकडे उरलेल्या रकमेची मागणी केली. परंतु भारत सरकारने मान्य केले नाही. तसेच सन २००२-०३ व नंतरच काळात रोकड त्रुटीत घट न झाल्याने प्रोत्साहक रक्कमेची मागणी केली नाही.

प्रोत्साहक रक्कम रुपये १३७.८८ कोटी ऊर्जा क्षेत्राच्या सुधारणेसाठीच वापरलेली आहे.

१.३ शासन कंपनीच्या उत्तराशी सहमत आहे.

१.४ राज्य सरकारमार्फत राबविल्या जाणाऱ्या विद्युत क्षेत्रातील सुधारणाकरिता मे २००२ ते मार्च २००७ या कालावधीत लाभ देण्याकरिता भारत सरकारने त्वरित विद्युत विकास कार्यक्रम (एपीडीआरपी) योजना ठरविली होती त्यानुसार ऊर्जा लेखांकन मीटरिंगसहित उपपारेषण व वितरण प्रणालीची श्रेणीमध्ये वाढ करण्याचे उद्दीष्ट ठरवण्यात आले होते व त्याकरिता केंद्र सरकार वित्तीय पाठबळ देणार होते. यासाठी केंद्र सरकारला विद्युत वितरण कंपनीकडून योजना सादर करताना दाखविण्यात आलेला तोटा कृत्रिमपणे वाढविल्यामुळे केंद्रिय योजनेचा लाभ मिळू शकला नाही या महालेखाकारांच्या आक्षेपाबाबत विद्युत वितरण कंपनी व ऊर्जा विभागाचे अधिकारी यांनी सादर केलेल्या माहितीच्या अनुषंगाने विद्युत वितरण कंपनीचे अधिकारी व ऊर्जा विभागाचे अधिकारी यांची समितीने १२ सप्टेंबर, २०१२ रोजी साक्ष घेतली. समितीने अधिक स्पष्टीकरण करण्याविषयी सांगितले असता विद्युत वितरण कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की, केंद्र शासन पुरस्कृत योजनेसाठी केंद्राने ठरविल्यानुसार कॅशलॉश कमी केला तर तेवढया कॅशलॉशच्या ५०% रक्कम वाढवून मिळणार होती त्यानुसार विद्युत वितरण कंपनीकडून २८९ कोटी रूपयांचा कॅशलॉश दाखविला गेला. त्यानुसार केंद्र सरकारने राज्य शासनाला १३७ कोटी रूपये मंजूर केले. व त्यासंदर्भातील लेख्याचे लेखापरिक्षण करताना केंद्र सरकारने कॅशलॉश कशामुळे कमी झाला याची कारणे शोधण्याचा प्रयत्न केला त्यावेळी असे निदर्शनास आले की काही संस्थांकडून वीज खरेदी करण्यात आली होती. त्यावरील आयकर भरण्यात आला नव्हता. त्यामुळे कॅशलॉश कमी करण्यासाठी प्रयत्न व्हावयास पाहिजे होते तसे झाले नाही, असे स्पष्ट केले. याबाबत अधिक स्पष्टीकरण देताना वित्तीय संचालक यांनी सांगितले की केंद्र सरकारने प्रथम २५९ कोटी रुपये मंजूर केले होते त्यातील १३७ कोटी रुपये दिले. उर्वरित रक्कम दिले नाही. व या उर्वरित रक्कमेसंदर्भाने केंद्र सरकारबरोबर पत्रव्यवहार केलेला आहे.

**१.५ अभिप्राय व शिफारशी**

**राज्य सरकारमार्फत राबविल्या जाणाऱ्या विद्युत क्षेत्रातील सुधारणाकरिता मे २००२ ते मार्च २००७ या कालावधीत लाभ देण्याकरिता भारत सरकारने त्वरित विद्युत विकास कार्यक्रम (एपीडीआरपी) योजना ठरविली होती त्यानुसार ऊर्जा लेखांकन मीटरींगसहित उपपारेषण व वितरण प्रणालीची श्रेणीमध्ये वाढ करण्याचे उद्दीष्ट ठरवण्यात आले होते. व त्याकरिता केंद्र सरकार वित्तीय पाठबळ देणार होते. यासाठी केंद्र सरकारला विद्युत वितरण कंपनीकडून योजना सादर करताना दाखविण्यात आलेला तोटा कृत्रिमपणे वाढविल्यामुळे केंद्रिय योजनेचा लाभ मिळू शकला नाही या महालेखाकारांचा आक्षेपाबाबत वस्तुस्थिती जाणून घेताना साक्षीच्या माध्यमातून समितीसमोर आलेली वस्तुस्थितीनुसार खर्चाची आकडेवारी सादर करताना चूकीची सादर केली गेल्यामुळे केंद्र शासनाचे अनुदान मिळू शकले नाही ही वस्तुस्थिती समितीला दिसून आली यावरून केंद्राकडून मिळणाऱ्या वित्तीय सहाय्यासाठी त्यांच्या अटीचे पालन करताना विद्युत वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले असे यावरून दिसून येते. यासाठी भविष्य**



**काळात अशा वित्तीय योजनांचा लाभ घेण्यासाठी सतर्क राहून कार्यवाही करण्यात यावी. जेणेकरून राज्याच्या विकासाला मिळणाऱ्या आर्थिक लाभासाठी वंचित होता येणार नाही अशी समितीची शिफारस आहे. याप्रकरणी करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत कळविण्यात यावी.**

**दोन "प्रकल्प खर्च व वित्त"**

**२.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक २ मधील परिच्छेद क्रमांक २.२.१० मध्ये **"प्रकल्प खर्च व वित्त"** यांचे संबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, मार्च २००७ मध्ये संपलेल्या पाच वर्षांचे मंजूर प्रकल्प मूल्य, भारत सरकार आणि राज्य शासनाकडून मिळालेला निधी, आरईसी/पीएफसी ने सुसज्ज केलेला निधी आणि केलेला खर्च याचा तपशील खाली दिलेला आहे.—

| वर्ष | वर्षांत मंजूर केलेल्या प्रकल्पाची संख्या | मंजूर प्रकल्प मूल्य | भारत सरकारकडून प्राप्त होणारा एपीडी-आरपीचा घटक | भारत सरकारने पुरवलेला निधी | भारत सरकारने कंपनीस दिलेल्या भारत सरकारचा निधी | वित्तीय संस्थेतून कंपनीने घेतलेली कर्ज | | | मार्च, २००७ पर्यंतचा खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | आरईसी | पीएफसी | एकूण | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| २००२-०३ | १८. | ८९६.५४ | ४४८.२७ | १२०.४१ | ४५.०० | नाही | नाही | नाही | नाही |
| २००३-०४ | २ | २४०.०० | १२०.०० | ७१.८५ | ७३.२९ | नाही | नाही | नाही | ५०.०० |
| २००४-०५ | ९ | ९१.७५ | १९.०८ | नाही | ३२.१२ | ६४.५९ | Nil | ६४.५९ | १३८.६३ |
| २००५-०६ | २ | २६७.८० | ४९.८४ | ८०.७८ | ९०.८२ | १०९.३९ | २५.७२ | १३५.११ | ३४५.२४ |
| २००६-०७ | नाही | नाही | नाही | ५२.६५ | ३१.८१ | १३५.७९ | २६.२० | १६१.९९ | १७६.६६ |
| एकूण .. | ३१ | १,४९६.०९ | ६३७.१९ | ३२५.६९ | २७३.०४ | ३०९.७७ | ५१.९२ | ३६१.६९ | ७१०.५३ |

वरील तक्त्यावरुन असे आढळून येईल कि, ३१ मंजूर प्रकल्पाकरिता भारत सरकारकडून मिळणाऱ्या रुपये ६३७.१९ कोटीच्या तुलनेत एपीडीआरपी कामाच्या कार्यान्वयनात विलंब झाल्यामुळे कंपनीला फक्त रुपये ३२५.६९ कोटी मिळाले.

मिळालेल्या कर्जात घेतलेल्या रुपये ६३४.७३ कोटीच्या (भारत सरकार रुपये २७३.०४ कोटी अधिक कंपनी रुपये ३६१.६९ कोटी) एकूण एपीडीआरपी निधीच्या तुलनेत, मार्च २००७ अखेरपर्यंत रुपये ७१०.५३ कोटीचा खर्च झाला होता. भारत सरकार/राज्य शासन आणि वित्तीय संस्थाकडून मिळालेल्या निधी पेक्षा जास्त झालेला खर्च, कंपनीने आपल्या आंतरिक साधन संपत्तीतून भरुन काढला.

२००२-०४ मध्ये मंजूर केलेल्या २० प्रकल्पात आणि २००४-०६ मध्ये मंजूर केलेल्या ११ प्रकल्पांत मुख्य कामासाठी जसे उप केंद्र उच्चदाब/लघुदाब (एचटी/एलटी) वीजवाहिन्या, नवीन ट्रान्सफार्मर्स उभारणे इत्यादी बाबत मार्च २००७ पर्यंत प्रत्यक्ष प्रगती अनुक्रमे ८९ टक्के व २ टक्के होती.

**२.२** या प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले की, भारत सरकारने कमी व्याजाची कर्जाची २५ % रक्कम नाकारल्याने कंपनीने अंतर्गत स्त्रोताद्वारे खर्च केला. तसेच कंपनीने ७५.८० कोटीचा खर्च अंतर्गत स्त्रोतातून खर्च केले कारण महाराष्ट्र शासनाने केंद्र शासनाने रिलीज केलेल्या रक्कमेतून ५२.६५ कोटीची रक्कम थांबवून ठेवली होती.

एल टी लाईन व मिटरचे काम सदर योजनेमध्ये समाविष्ट केले होते. मात्र एल टी लाईन व मिटरचे काम सदर योजनेमध्ये समाविष्ट केले होते. मात्र पी एफसीने कर्ज मंजूर केले नसल्याने कंपनीच्या अंतर्गत स्त्रोतातून खर्च केले.

उपकेंद्र व उ.दा./ल.दा. तारमार्गाचे लक्ष्य कंपनीने दि. **३१.३.२००९** रोजी खालीलप्रमाणे साध्य केले.—

| | टप्पा-एक (२० प्रकल्प) | | | टप्पा-दोन (११ प्रकल्प) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लक्ष्य | साध्य | % | लक्ष्य | साध्य | % |
| उपकेंद्र | ६४ | ६३ | ९८.४३ | ५ | ५ | १००% |
| उ.दा.तारमार्ग | | | | | | |
| ३३ किव्हो | ७०६.१ | ६८७.८६ | ९७.४२ | ३०४.१ | १७२.५१५ | ५६.७२% |
| ११ किव्हो | ४७५७.१३ | ४५६९.८९ | ९६.०६ | २९४.०६ | १३०.८६ | ४४.५०% |
| ल.दा.तारमार्ग | १२०५.४५ | १०३८.८४ | ८६.१ | - | - | - |

भारत सरकारच्या निर्देशानुसार एपीडीआरपीच्या सर्व योजना **३१.३.२००९** रोजी बंद केल्या.

**२.३** शासन कंपनीच्या उत्तराशी सहमत आहे.

**२.४** विद्युत वितरण कंपनीच्या ३१ मंजूर प्रकल्पाकरिता केंद्र सरकारकडून मिळणाऱ्या वित्तलब्धी, त्वरित विद्युत विकास सुधारणा कार्यक्रम (एपीडीआरपी) कामाच्या कार्यान्वयनात विलंब झाल्यामुळे विद्युत वितरण कंपनीला आर्थिक सहाय्य कमी मिळाले होते याबाबत विद्युत वितरण कंपनी व ऊर्जा विभाग यांनी सादर केलेली लेखी माहितीच्या अनुषंगाने विद्युत वितरण कंपनीचे अधिकारी व ऊर्जा विभागाचे अधिकारी यांची समितीने दिनांक १२ सप्टेंबर २०१२ रोजी साक्ष घेतली. या विषयाची वस्तुस्थिती विशद करण्याविषयी समितीने सांगितले असता विद्युत वितरण कंपनीच्या व्यवस्थापकीय संपादक यांनी सांगितले की केंद्र सरकारने जाहीर केलेल्या योजनेच्या संदर्भात वित्तलब्धी राज्य शासनाकडे येतो. राज्य शासन तो संबंधित कंपनीला पुरवितो. याबाबत वितरण कंपनीकडून चालू असलेल्या कामाची देयके अदा करावी लागतात. अशा वेळी वितरण कंपनी अंतर्गत माध्यमातून वित्तलब्धी उभारून देयके अदा करते व तद्नंतर त्याचे परिमार्जन केले जाते. आता यामध्ये सुधारणा करण्यात आली असून पीएफसी कडून डायरेक्ट चेक राज्य शासनामार्फत न येता कंपनीकडे येतो. असे त्यांनी स्पष्ट केले. याबाबत समितीने अशी विचारणा केली की, केंद्र शासनाकडून कमी व्याजाने मिळणारी रक्कम ही प्रकल्पाची कामे वेळेवर न केली गेल्यामुळे



मिळाले नाहीत. त्यामुळे विद्युत वितरण कंपनीला सदर कामासाठी अंतर्गत माध्यमातून पैसा उभारून काम करणे भाग पडले. ही वस्तुस्थिती आहे. याबाबत अंतर्गत माध्यमातून उभारलेल्या पैशांचा व्याजदर व केंद्र सरकारकडून दिल्या जाणाऱ्या पैशाचा व्याजदर यामध्ये किती फरक होता असे विचारले असता विद्युत वितरण कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की याबाबतची माहिती सद्यःस्थितीत माझ्याजवळ नाही.

## २.५ अभिप्राय व शिफारशी

**विद्युत वितरण कंपनीच्या ३१ मंजूर प्रकल्पांकरिता केंद्र सरकारकडून मिळणाऱ्या वित्तलब्धी त्वरित विद्युत विकास सुधारणा कार्यक्रम (एपीडीआरपी) कामाच्या कार्यान्वयनात विलंब झाल्यामुळे विद्युत वितरण कंपनीला आर्थिक सहाय्य कमी मिळाले होते व कमी व्याजदराने मिळणारा वित्तलब्धीपासून आर्थिक मदतीला वंचित व्हावे लागले ही वस्तुस्थिती समितीला आढळून आली. यामध्ये देखील विद्युत वितरण कंपनीमार्फत सुरू असलेल्या कंपनीची कामे विहित वेळेत पूर्ण होऊ शकली नाहीत. त्यामुळे केंद्र सरकारकडून मिळणारा वित्तलब्धी मिळाला नाही. या झालेल्या नुकसानीबाबत महालेखाकारांनी घेतलेला आक्षेप बरोबर असून केवळ हलगर्जीपणामुळे केंद्र शासनाची आर्थिक मदत विद्युत वितरण कंपनीच्या चालू असलेल्या प्रकल्पांना मिळू शकली नाही. या कार्यपद्धतीबाबत समिती खेद व्यक्त करते. बाहेरून मिळणाऱ्या आर्थिक मदतीसाठी भविष्यातील काळात कार्यतत्पर राहण्याच्या दृष्टीने एक सूसूत्र कार्यवाहीची पद्धत आखण्यात यावी व त्यानुसार वेळेवर प्रकल्पाचे कामे कसे पूर्ण होईल याकडे अधिक लक्ष द्यावे अशी समितीची शिफारस आहे. याप्रकरणी करण्यात येणाऱ्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत कळविण्यात यावी.**

## तीन "निधी पुरवठ्यातील विलंब"

**३.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक २ मधील परिच्छेद क्रमांक २.२.११ व २.२.१२ मध्ये **"निधी पुरवठ्यातील विलंब"** यांचे संबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, निधीच्या वापराकरिता ऊर्जा मंत्रालयाने जारी केलेल्या (११ जून २००३) सर्वसाधारण अटी व शर्ती मध्ये खालील बाबींचा समावेश होता.

- राज्य शासनाने राज्य वीज यूटीलीटीला एपीडीआरपी अंतर्गत मिळालेला निधी भारत सरकारने राज्य शासनाच्या खात्यात जमा केल्यानंतर एक आठवड्याच्या आत दिला पाहिजे ;
- एपीडीआरपी अंतर्गत मिळालेला निधी राज्य शासनाने यूटीलीटीला रोखीने द्यायचा होता आणि कोणत्याही प्रकारचे समायोजन अनुज्ञेय नव्हते ;
- एपीडीआरपी अंतर्गत प्रकल्पाच्या कार्यान्वयानाकरिता यूटीलीटीने अनुसूचित/राष्ट्रीय बँकेत पहिल्या प्रथम वेगळे बँक खाते उघडायचे होते. शासनाकडून/ आंतरिक साधन संपत्तीद्वारे मिळालेला निधी किंवा वित्तीय संस्थांकडून या कामासाठी घेतलेले कर्ज या खात्यातच जमा करायचे होते.

लेखापरीक्षा छाननी मध्ये खालील बाबी दिसून आल्या :—

**राज्य शासनाने निधी पुरवण्यात उशीर केल्याने एपीडीआरपी प्रकल्पाच्या कार्यान्वयनास विलंब झाला.** असे आढळले की राज्य शासनाने कंपनीला निधी पुरवावयास विलंब केला. त्याचा तपशील खाली दिला आहे.—

| विलंबाचा पल्ला | गुंतवणूक घटक | | |
|---|---|---|---|
| | अनुदान | कर्ज | एकूण |
| ३ महिन्यांपर्यंत | ४८.९७ | – | ४८.९७ |
| ३ ते ६ महिने | ३१.८० | – | ३१.८० |
| ६ ते १२ महिने | ७३.०९ | ६०.२० | १३३.२९ |
| १२ ते १५ महिने | – | १५.०० | १५.०० |
| १५ महिन्यांपेक्षा जास्त | २३.०५ | २०.९३ | ४३.९८ |

**रूपये ११०.७९ कोटीचा निधी राज्य शासनाने जुन्या येण्याकडे समायोजित केला.** एपीडीआरपी अंतर्गत निधी रोखीने द्यायचा होता व कोणत्याही प्रकारचे समायोजन अनुज्ञेय नव्हते तरी रूपये ११०.७९ कोटीचा निधी शासनाने रोखील दिला नाही व तो अनियंत्रितपणे कंपनीने राज्य शासनाला देणे असलेल्या अन्य रकमेत (कर्जावरील व्याज रुपये ९५.७९ कोटी आणि वीजशुल्क रुपये १५ कोटी) समायोजित केला. याप्रमाणे एपीडीआरपी निधी राज्य शासनाकडून अन्य कामासाठी वळविण्यात आला, याचा परिणाम एपीडीआरपी प्रकल्पाचे कार्यान्वयन उशिरा होण्यात झाला.

याबाबत शासनाने असे म्हटले (ऑक्टोबर, २००६), की कंपनीकडून मंजुरी आदेशाची प्रत मिळाल्यानंतर पुरवणी अर्थसंकल्पात तरतूद करण्याच्या गरजेमुळे विलंब झाला आणि कंपनीने जूने देणे न फेडल्यामुळे निधीचे समायोजन करावे लागले. हे उत्तर समर्थनीय नाही कारण हा कार्यक्रम भारत सरकार आणि राज्य शासनात झालेल्या सामंजस्य ज्ञापनानुसार कार्यान्वित होत आहे आणि म्हणून भारत सरकारचा निधी कंपनीस पुरवण्यासाठी पुरेशी अर्थसंकल्प तरतूद करणे राज्य शासनाकडून अपेक्षित आहे. कंपनीकडून येणे असलेल्या रकमेच्या प्रती एपीडीआरपी निधीचे समायोजन कार्यक्रम मार्गदर्शक सूचनेप्रमाणे अनुज्ञेय नाही.

**३.२** या प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करतांना असे नमूद केले की, प्रत्येक परिच्छेदाचे स्पष्टीकरण खालीलप्रमाणे दिले आहे.

महाराष्ट्र शासनाने जुने येणे एपीडीआरपी फंडातून वळती केले अशाप्रकारे वळती करण्याची तरतूद करारात नव्हती. म्हणून याबाबत शासनाने यावर उत्तर द्यावे. तसेच शासनाने अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद केली नाही. याबाबत शासनाने उत्तर द्यावे.



**३.३** शासन कंपनीच्या उत्तराशी सहमत आहे.

**३.४** त्वरित विद्युत विकास सुधारणा कार्यक्रमाअंतर्गत (एपीडीआरपी) विद्युत क्षेत्रातील विकासाकरिता केंद्र सरकारने द्यावयाच्या वित्तलब्धीसाठी, अटी व शर्ती घातलेल्या होत्या. त्याचे पालन न झाल्यामुळे निधी पुरवठ्यास राज्य शासनाकडून विलंब झाला. तसेच राज्य शासनाने केंद्र शासनाकडून दिलेला निधी विद्युत वितरण कंपनीला देताना जुने येणे समायोजित करून दिले. त्यामुळे केंद्र शासनाने घातलेल्या अटींचे उल्लंघन झाले होते. त्यामुळे महालेखाकारांनी अशा कार्यपद्धतीबाबत आक्षेप नोंदविल्यानंतर विद्युत वितरण कंपनी व ऊर्जा विभाग यांनी सादर केलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने विद्युत वितरण कंपनीचे अधिकारी व ऊर्जा विभागाचे अधिकारी यांची १२ सप्टेंबर २०१२ रोजी समितीने साक्ष घेतली. याविषयी अधिक स्पष्टीकरण करण्याविषयी समितीने सांगितले असता विद्युत वितरण कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की, केंद्र सरकारकडून त्वरित विद्युत विकास सुधारणा कार्यक्रमांतर्गत मिळणारा निधी हा कोणत्याही समायोजनेसाठी अनुज्ञेय नव्हता. तो फक्त केंद्र शासन पुरस्कृत योजनेसाठीच होता. राज्य शासनाने यापूर्वी विद्युत वितरण कंपनीच्या विद्युत करासंबंधात द्यावयाचे १५ कोटी रुपये तसेच कर्जापोटी दिलेले ९५.७९ कोटी रुपये राज्य शासनाला देय होते. सदर रक्कम त्यांनी एपीडीआरपी च्या निधीमधून वळती केल्यामुळे तितका निधी प्राप्त होण्यास विलंब झाला. त्यामुळे प्रकल्पाचे कामदेखील पूर्ण होण्यास विलंब झाला, असें त्यांनी स्पष्ट केले.

**३.५ अभिप्राय व शिफारशी**

**त्वरित विद्युत विकास सुधारणा कार्यक्रमाअंतर्गत (एपीडीआरपी) विद्युत क्षेत्रातील विकासाकरिता केंद्र सरकारने द्यावयाच्या वित्तलब्धीसाठी अटी व शर्ती घातलेल्या होत्या. त्याचे पालन न झाल्यामुळे निधी पुरवठ्यास राज्य शासनाकडून विलंब झाला. तसेच राज्य शासनाने केंद्र शासनाकडून दिलेला निधी विद्युत वितरण कंपनीला देताना जुने येणे समायोजित करून दिले. त्यामुळे केंद्र शासनाने घातलेल्या अटींचे उल्लंघन झाले होते. साक्षीच्या वेळी समितीला असे दिसून आले की, विद्युत वितरण कंपनीकडून विद्युत कराची वसूल केलेली रक्कम तसेच कर्जापोटी दिलेली रक्कम याची परतफेड बिहित वेळेत केलेली नव्हती. त्यामुळे राज्य शासनाने केंद्रीय निधीचे वितरण करताना सदर रक्कम कपात केल्याने प्रकल्पास विलंब झाला. केंद्राने विद्युत विकासासाठी निधी वितरीत करताना घातलेल्या अटी व शर्तीचे देखील ऊर्जा विभागाकडून यामध्ये उल्लंघन झाले त्यामुळे केंद्र सरकारकडून मिळणारी आर्थिक मदतीवर बंधन आले. एकंदरित केंद्र सरकारकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीसाठी विद्युत वितरण कंपनी व ऊर्जा विभाग यांनी गांभिर्याने दखल घेतली नाही असे समितीचे मत आहे. राज्याच्या विकासासाठी मिळणारा निधी जास्तीत जास्त कसा मिळवता येईल याकडे भविष्य काळात सतर्क रहाणे जरूरीचे असून याबाबत दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कडक कारवाईचे धोरण अवलंबावे अशी समितीची शिफारस आहे. याप्रकरणी करण्यात येणाऱ्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत कळविण्यात यावी.**

**चार "एपीडीआरपी प्राप्त्यांसाठी बँकेत खाते न उघडणे"**

४.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षेक यांच्या सन २००६-२००७ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक २ मधील परिच्छेद क्रमांक २.२.१३ मध्ये **"एपीडीआरपी प्राप्त्यांसाठी बँकेत खाते न उघडणे"** यांचे संबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, संमती ज्ञापनाप्रमाणे, राज्य विद्युत युटीलीटीला अनुसूचीत बँकेत वेगळे खाते उघडायचे होते आणि वित्तीय संस्था/आंतरिक साधन-संपत्तीमार्फत मिळालेले वित्त, यासहित संपूर्ण एपीडीआरपी निधी या खात्यामार्फत मार्गीकृत करायचा होता. असे आढळले की एपीडीआरपी अंतर्गत मिळालेला निधी वेगळ्या बँक खात्यात जमा करण्याऐवजी नेहमीच्या बँक खात्यात जमा करण्यात आला होता. क्षेत्रीय कार्यालयांकडून एपीडीआरपी निधीची मागणी आल्यानंतर निधी नेहमीच्या बँक खात्यातून वेगळ्या बँक खात्यात क्षेत्रीय कार्यालयांना वाटप करण्यासाठी बदली करण्यात आला.

व्यवस्थापनाने असे म्हटले (एप्रिल, २००७) की, भारत सरकारकडून निधी प्राप्तीचे निश्चित वेळापत्रक नव्हते आणि राज्य सरकारकडून प्राप्तीची वाट न बघताच, क्षेत्रीय कार्यालयांना एपीडीआरपी प्रकल्पाच्या कार्यान्वयासाठी निधी वेगळ्या खात्यामार्फत मार्गीकृत केला. हे उत्तर समर्थनीय नाही कारण की कंपनी/ राज्य शासनाने मान्य केलेल्या योजना मार्गदर्शक सूचनेप्रमाणे भारत सरकार/ राज्य शासन किंवा वित्तीय संस्थेकडून निधी प्राप्त झाल्याबरोबर ह्या कामासाठी उघडलेल्या वेगळ्या खात्यात जमा करावयाचा होता.

४.२ या प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले की, ऑक्टोबर, २००३ मध्ये कॅनरा बँकेत चालू खाते (क्र. २२२५६) उघडण्यात आले. एपीडीआरपी योजनेनुसार महाराष्ट्र शासनाकडून मिळणारा निधी खात्यात जमा करण्यात येत नाही. परंतु क्षेत्रीय कार्यालयांकडून निधीची आवश्यकता कळल्यानंतर संवितरणासाठी नेहमीच्या खात्यातून स्वतंत्र बँक खात्यात निधी स्थानांतरित करण्यात येतो.

महाराष्ट्र शासनाकडून निधी कमी मिळाल्यामुळे व महाराष्ट्र शासनाकडून मिळणाऱ्या निधीचा कालावधी निश्चित स्वरूपाचा नसल्यामुळे नमूद केलेली व्यवस्था करण्यात आली. तसेच क्षेत्रीय कार्यालयाकडून निधीची आवश्यकता कळल्यावर महाराष्ट्र शासनाकडून मिळावयाच्या निधीची वाट न पहाता नेहमीच्या खात्यातील निधी स्वतंत्र बँक खात्यात वळवण्यात आला. काम वेगाने होण्यासाठी ही सोय करण्यात आली.

४.३ शासन कंपनीच्या उत्तराशी सहमत आहे.

४.४ त्वरित विद्युत विकास सुधारणा कार्यक्रमाअंतर्गत (एपीडीआरपी) केंद्र शासनाकडून मिळणारा निधी अनूसूचीत असलेल्या बँकेत वेगळे खाते उघडून मार्गीकृत करावयाचा होता. यासाठी वेगळे खाते न उघडता नेहमीच्या बँकेमध्ये जमा करून मार्गीकृत केला गेला. त्यामुळे मार्गदर्शक सूचनांचे पालन केले गेले नाही. असा महालेखाकारांनी आक्षेप घेतला होता. याबाबत विद्युत वितरण कंपनी व ऊर्जा विभाग यांनी सादर केलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने विद्युत वितरण कंपनीचे अधिकारी व ऊर्जा विभागाचे



अधिकारी यांची दिनांक १२ सप्टेंबर २०१२ रोजी समितीने साक्ष घेतली. याबाबत अधिक स्पष्टीकरण करण्याविषयी समितीने सांगितले असता विद्युत वितरण कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की योजनेचे पैसे मिळण्यास विलंब होऊ नये म्हणून वेगळे खाते उघडावे लागते म्हणजे त्या योजनेचे पैसे त्या खात्यात जमा होतात. तद्नंतर त्यामधून सर्व आर्थिक व्यवहार केले जातात. असे वेगळे बँक खाते उघडले नाही अशी वस्तुस्थिती आहे. विद्युत वितरण कंपनीची वसुली पुर्णपणे होऊ शकत नाही त्यामुळे खर्चाचा ताळमेळ देखील बसत नाही. कंपनीने जमा केलेला विद्युत कर देखील स्वतःकडे ठेवणेदेखील बरोबर नाही हे त्यांनी मान्य केले. कधी कधी वीज खरेदी करण्यासाठी देखील कर्ज घ्यावे लागते. आता केंद्र शासनाने याबाबत दोन निकष ठरविले असून नवीन योजनेसाठी वेगळे फंडींग करण्यात येईल म्हणून ठेकेदारांची देयके थेट अदा केली जातील. एपीडीआरपीची कामे पूर्ण झाल्यानंतर बिले सादर करावीत व केंद्र शासन थेट सदर देयके अदा करील अशा सूचना त्यांनी दिलेल्या आहेत. काही योजना पूर्ण करण्यासाठी वित्तीय सहाय्याची गरज लागली तर बँकाकडून शॉर्टटर्म लोन देखील घ्यावे लागते. आता रिझर्व बँकेने विद्युत वितरण कंपनीना कर्ज देताना तारण घ्यावे तसेच कर्जावरही मर्यादा घातलेली आहे. त्यामुळे वसुलीवर भर द्यावा लागून आर्थिक उभारणी करणे गरजेचे आहे. महालेखाकारांनी घेतलेला आक्षेप बरोबर आहे असेही शेवटी त्यांनी मान्य केले.

**४.५ अभिप्राय व शिफारशी :**

**त्वरित विद्युत विकास सुधारणा कार्यक्रमाअंतर्गत (एपीडीआरपी) केंद्र शासनाकडून मिळणारा निधी अनूसूचीत असलेल्या बँकेत वेगळे खाते उघडून मार्गीकृत करावयाचा होता. यासाठी वेगळे खाते न उघडता सदर निधी नेहमीच्या बँकेमध्ये जमा करून मार्गीकृत केला गेला. त्यामुळे मार्गदर्शक सूचनांचे पालन केले गेले नाही. असा महालेखाकारांनी घेतलेला आक्षेप साक्षीच्या वेळी मान्य केला गेला. योजनेसाठी मिळणारा केंद्रीय निधी त्वरेने मिळण्यासाठी व त्याचे वितरण सुपद्धतीने होण्यासाठी अशा निधीसाठी स्वतंत्र बँक खाते उघडणे आवश्यक होते. त्यादृष्टीने महामंडळ स्तरावर करण्यात आलेल्या कार्यवाहीचे समितीला सखेद आश्चर्य वाटते. अशा कार्यपद्धतीमध्ये सुधारणा होणे अत्यंत आवश्यक असून याबाबत सतर्क राहण्यासाठी महामंडळाच्या कार्यप्रणालीमध्ये आमुलाग्र बदल केला जावा व त्यादृष्टीने मार्गदर्शक तत्वे देखील ठरविण्यात यावीत व त्याकडे विभागाने देखील लक्ष द्यावे. अशी समितीची शिफारस आहे. याप्रकरणी करण्यात येणाऱ्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत कळविण्यात यावी.**

**पाच "प्रकल्प नियोजन"**

५.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक २ मधील परिच्छेद क्रमांक २.२.१५ मध्ये **"प्रकल्प नियोजन"** यांचे संबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, **जास्त पारेषण व वितरण वीजहानी असलेल्या केंद्र/शहरासाठी प्राथमिकता कामात अपयश.**

पारेषण व वितरण वीजहानी आणि एकूण तांत्रिक वाणिज्यिक वीजहानी कमी करण्याचा कार्यक्रमाचा उद्देश होता. राज्यातील सर्कल/ शहरांना, वीजहानीची टक्केवारी/आकारप्रमाणे प्रकल्प हाती घेण्यासाठी प्राथमिकता ठरवून श्रेणी देणे आवश्यक होते. जेणेकरून महत्तम लाभ घेता येऊ शकणार होता. लेखापरीक्षा छाननीला असे आढळले की काही सर्कल जसे परभणी, बीड, जालनामध्ये पारेषण व वितरण विजहानी अनुक्रमे ४८, ४४ व ३४ टक्के इतकी जास्त असूनसुद्धा कंपनीने हे प्रकल्प हाती घेतले नव्हते. परंतु अनुक्रमे १५.७४ व १०.९७ टक्के पारेषण व वितरण विजहानी असलेले रत्नागिरी आणि कोल्हापूर प्रकल्प वर्ष २००२-०३ मध्ये कार्यक्रमाअंतर्गत निधी पुरवठा करण्यासाठी निवडले होते.

व्यवस्थापनाने असे म्हटले होते की ऊर्जा मंत्रालयाने परभणी, बीड व जालना शहर प्रकल्पाकरिता तत्वतः मान्यता दिलेली आहे. मात्र जास्त वीजहानी असणाऱ्या क्षेत्रास कार्यक्रमाच्या पहिल्या टप्प्यातच निवड करण्यासाठी प्राथमिकता का दिली नाही, याबाबत कंपनीने उत्तरात मौन पाळले.

५.२ याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले की, क्षेत्रातील उच्च घनता विचारात घेऊन औरंगाबाद लातूर उस्मानाबाद (जिल्हे) आणि नांदेड (शहर) योजना मराठवाडा प्रदेशात समाविष्ट केल्या. त्याचप्रमाणे रत्नागिरी व कोल्हापूर योजना टप्पा-एक मध्ये समाविष्ट केला. परभणी बीड व जालना योजना आर-एपीडीआरपी मध्ये मंजूर झाल्या व त्याची अंमलबजावणी वर्ष २००६-०७ मध्ये चालू आहे (तत्वतः).

भारत सरकारने निधी वितरीत केला नाही. त्यामुळे काम हाती घेता आले नाही व योजना पूर्ण झाल्या नाही.

परभणी, बीड, जालना या विभागाचे कृषी क्षेत्रात वर्चस्व असून मिटर नसल्यामुळे प्रत्यक्षात किती तोटा झाला हे काढता येत नाही.

५.३ शासन कंपनीच्या उत्तराशी सहमत आहे.

५.४ जास्त पारेषण व वितरण वींजहानी असलेल्या केंद्रासाठी तसेच शहरांसाठी प्राथमिकता कामात अपयश आले. व त्यादृष्टीने वीजहानी असलेल्या भागामध्ये प्राथमिकता ठरवून अशी वीजहानी टाळण्यासाठी प्राथमिकता ठरविणे आवश्यक होते व त्या दृष्टीने कार्यवाही केली गेली नाही. असा महालेखाकारांनी या परिच्छेदामध्ये आक्षेप नोंदविला होता. या संबंधात विद्युत वितरण कंपनी व ऊर्जा विभाग यांनी सादर केलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने विद्युत वितरण कंपनीचे अधिकारी व ऊर्जा विभागाचे अधिकारी यांची दिनांक १२ सप्टेंबर २०१२ रोजी समितीने साक्ष घेतली. याबाबत अधिक स्पष्टीकरण करण्याविषयी समितीने सांगितले असता विद्युत पारेषण कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की राज्यामध्ये एकूण १ कोटी ९३ लाख मीटरधारक आहेत त्यापैकी ३५ लाख मीटरधारक शेतीशी संबंधित आहेत त्यामधील ४० ते ५० टक्के मीटरधारक नाहीत. शेतीमधील मीटरर्समध्ये मीटर रिडींग घेण्यामध्ये अडचणी येत असल्यामुळे नवीन पर्याय शोधण्याचा प्रयत्न करून मीटरवर मॉडेम बसवून रिडींग घेता येते का? याची पाहणी सुरू आहे. निवासी तसेच औद्योगिक व व्यावसायीक मीटरर्सना असे मॉडेम बसविण्याचे



प्रयत्न सुरू आहेत. सद्यस्थितीत हॉर्सपॉवर पद्धतीने शेतीसाठी वीज दिली जाते. तेथे दर वाढविले आहेत. त्यामुळे ग्राहकांच्या सोयीच्या दृष्टीने देखील वीज वापरानुसार बिल भरणे सोयीचे होत असल्याने लोकांचा मीटर वापरण्याकडे कल वाढून व ज्यांच्याकडे विजेचा वापर कमी आहे. त्यांना वापरानुसार वीज घेणे सोयीचे आहे. यामध्ये पर्यायाने पाण्याची देखील बचत होईल असे त्यांनी स्पष्ट केले.

**५.५ अभिप्राय व शिफारशी**

**जास्त पारेषण व वितरण वीजहानी असलेल्या केंद्रासाठी तसेच शहरांसाठी प्राथमिकता कार्यक्रम ठरविण्याच्या कामात अपयश आले व त्या दृष्टीने वीजहानी असलेल्या भागामध्ये प्राथमिकता ठरवून अशी वीजहानी टाळण्यासाठी प्राथमिकता ठेवली गेली नव्हती. परंतु लेखापरिक्षण करताना जास्त वीज पारेषण व वितरण वीजहानी असलेल्या ठिकाणी प्राथमिकतेने वीजहानी टाळण्यासाठी प्रकल्प हाती घेतले नव्हते असे आढळून आले होते. याउलट कमी वीज पारेषण व वितरण हानी असलेल्या ठिकाणी या कार्यक्रमांतर्गत निधीचा पुरवठा केला गेला होता. समितीसमोर झालेल्या साक्षीपुराव्यावरून शेतीसाठी वीज वापरावयाच्या पद्धतीमध्ये अमुलाग्र बदल सुचविला असला तरी त्यामधून वीज वापर नक्कीच कमी होण्याची शक्यता दिसून येत असली तरी महालेखाकारांनी घेतलेला आक्षेप जास्त वीजपारेषण व वितरणहानी असलेल्या ठिकाणी प्राथमिकतेने प्रकल्प नियोजन करून वीजहानी टाळणे आवश्यक होते. याकरिता समिती अशी शिफारस करत आहे. महाराष्ट्रातील विजेची समस्या लक्षात घेता वीजहानी टाळण्यासाठी त्यामध्ये प्राथमिकता देण्यात यावी व त्यासाठी नियोजनबद्ध कार्यक्रम राबविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे. याप्रकरणी करण्यात येणाऱ्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत कळविण्यात यावी.**

**सहा "जमिनीच्या उपलब्धतेची खात्री केल्या शिवाय निविदा काढणे"**

**६.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक २ मधील परिच्छेद क्रमांक २.२.१७ मध्ये **"जमिनीच्या उपलब्धतेची खात्री केल्याशिवाय निविदा काढणे"** यांचे संबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, पिंपरी-चिंचवड शहरात अखंड वीजपुरवठा व पारेषण वीजहानीच्या कपातीकरिता पुण्यातील देहू रोड येथे २२ केव्ही स्विचिंग स्टेशनची स्थापना करण्याच्या कामाच्या निविदा एपीडीआरपी अंतर्गत मागितल्या (मार्च, २००३). परंतु जमीन उपलब्ध नसल्यामुळे मागविण्यात आलेल्या निविदा रद्द केल्या (मार्च, २००६). प्रकल्पांर्गत निवडलेली जमीन संरक्षण विभागाची होती आणि त्याच्याकडून जमीन संपादनेसाठी परवानगी मिळवणे सोपे नव्हते हे कंपनीला चांगलेच अवगत होते. अशाप्रकारे, निविदा मागण्यापूर्वी जमिनीचा स्पष्ट ताबा मिळवण्यात व पर्यायी जागा मिळण्यात कंपनीला आलेल्या अपयशामुळे काम सुरु झाले नाही. शिवाय चार वर्षांपेक्षा जास्त काळ वाया गेला (ऑगस्ट, २००७). तसेच देहू रोड येथे स्विचिंग स्टेशन स्थापनेचा उद्देश विफळ झाला.

६.२ याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले की, पिंपरी-चिंचवडमध्ये एपीडीआरपी योजनेची अंमलबवणी करताना भोसरी विभागीय कार्यालयाने स्थानिक प्राधिकरणाशी सातत्याने पत्रव्यवहार व पाठपुरावा करुनही देहू रोड येथील स्विचिंग केंद्रासाठी पर्यायी योग्य जागा उपलब्ध होऊ शकली नाही. योग्य जागेच्या अनुपलब्धतेमुळे स्विचिंग केंद्र पूर्ण होऊ शकले नाही.

सध्या या भागाला २२ केव्ही चिंचवड सर्व स्टेशनमधून पुरवठा केला जातो.

६.३ शासन कंपनीच्या उत्तराशी सहमत आहे.

६.४ पिंपरी चिंचवड शहरामध्ये देहूरोड येथे २२ केव्ही स्टेशनची स्थापना करण्यासाठी त्वरित विद्युत सुधारणा कार्यक्रमांतर्गत (एपीडीआरपी) निविदा मागविण्यात आल्या परंतु त्यासाठी आवश्यक असलेली ज़मीन उपलब्ध न झाल्यामुळे सदर निविदा रद्द कराव्या लागल्या. सदर जमीन देखील संरक्षण विभागाची होती व त्यामुळे सदर काम चार वर्षापेक्षा जास्त काळ होऊ शकले नाही. असा महालेखाकारांनी आक्षेप नोंदविला होता. विद्युत वितरण कंपनी व ऊर्जा विभाग यांनी सादर केलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने विद्युत वितरण कंपनीचे अधिकारी व ऊर्जा विभागाचे अधिकारी यांची दिनांक १२ सप्टेंबर २०१२ रोजी समितीने साक्ष घेतली. यावेळी अधिक स्पष्टीकरण करण्याविषयी समितीने सांगितले असता विद्युत पारेषण कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की, जमीन ताब्यात मिळालेली नसतानाही निविदा काढल्या गेल्या हा महालेखाकारांचा मुद्दा बरोबर आहे. हे त्यांनी मान्य केले. परंतु याबाबत कार्यपद्धती विशद करताना सांगितले की, प्रथम जमीन उपलब्ध करून नंतर निविदा काढण्यामध्ये काही कालावधी निघून जातो. निविदा काढण्यात आलेली असली तरी जमीन मिळाल्याशिवाय कामाची ऑर्डर दिली ज़ात नाही. शक्यतो शासनाची जमीन मिळविण्याचा प्रयत्न सुरू असतो. काही ठिकाणी जाहिरातीद्वारे जमिनीसाठी मागणी केली जाते. केव्हीस्टेशनसाठी जमीन रस्त्याच्या लगत असणे आवश्यक असते. त्याबाबत खाजगी जमिनीसाठी दर मागविले जातात. सदर दर त्याबाबत असलेल्या समितीकडून छाननी करून तद्नंतर जमीन खरेदी केली जाते. बहुतांश ठिकाणी शासनाच्या रेडी रेकनरपेक्षा खाजगी जमिनीचे भाव हे जास्त असतात त्यामुळे याबाबतच्या कार्यपद्धतीमध्ये विलंब होत असतो, असे त्यांनी स्पष्ट केले.

६.५ अभिप्राय व शिफारशी

**पिंपरी चिंचवड शहरामध्ये देहूरोड येथे २२ केव्ही स्टेशनची स्थापना करण्यासाठी त्वरित विद्युत सुधारणा कार्यक्रमांतर्गत (एपीडीआरपी) निविदा मागविण्यात आल्या परंतु त्यासाठी आवश्यक असलेली जमीन उपलब्ध न झाल्यामुळे सदर निविदा रद्द कराव्या लागल्या. सदर जमीन देखील संरक्षण विभागाची होती व त्यामुळे सदर काम चार वर्षापेक्षा जास्त काळ होऊ शकले नाही. असा महालेखाकारांनी आक्षेप नोंदविला होता. साक्षीच्या वेळी समितीच्या समोर आलेल्या माहितीनुसार प्रकल्पाचे काम पूर्ण होण्याच्या दृष्टीने जरी कार्यवाही केली जात असली तरी काही जमिनी प्राप्त होण्याबाबतच्या अडचणी लक्षात घेता**



**जमिनी उपलब्ध झाल्याशिवाय निविदा प्रक्रिया सुरू करणे योग्य नाही असे समितीचे मत आहे. त्यामुळे यापुढील काळात कुठल्याही प्रकल्पासाठी जमिनीचे अधिग्रहण केल्याशिवाय प्रकल्पाची पुढील कार्यवाहीस सुरुवात करण्यात येऊ नये. याप्रकरणी करण्यात येणाऱ्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत कळविण्यात यावी.**

**सात "कार्यसूचीतील त्रुटीमुळे वगळलेली कामे"**

७.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक २ मधील परिच्छेद क्रमांक २.२.१८ मध्ये **"कार्यसूचीतील त्रुटीमुळे वगळलेली कामे"** यांचे संबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, भारत सरकारने, एपीडीआरपी अंतर्गत जळगाव प्रकल्पासाठी, रुपये ३५.११ कोटी मंजूर केले (ऑक्टोबर, २००२). ३३ केव्ही वीज वाहिनीच्या तारा बदलणे, सिंगल फेज एल टी वीज वाहिनीच्या तारा बदलणे, जुने वीज खांब बदलणे आणि डीटीसीचे नूतनीकरण करणे, या चार उप कामासाठी रुपये ३.८१ कोटीचा वरील मंजुरीत समावेश होता. असे दिसून आले की, मुख्य अभियंता, नाशिक परिमंडळ यांनी सादर केलेल्या (नोव्हेंबर, २००३) वरील चार उप-कामाच्या कार्यसूची मध्ये बऱ्याच त्रुटी (जसे निविदा कार्यसूचीत घेतलेले जास्त दर, जुन्या सामानाची चुकीची किंमत, अस्पष्ट तपशील इत्यादि) आढळल्यामुळे ही चार उपकामे निविदेच्या व्याप्ती मधून वगळावी लागली अशाप्रकारे सदोष कार्यसूची बनविल्यामुळे प्रकल्प योजनेचा पूर्ण लाभ घेण्यापासून वंचित राहिला (ऑगस्ट, २००७) आणि जळगाव प्रकल्प मंजूर करण्याचा हेतू विफल झाला.

७.२ या प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करतांना असे नमूद केले की, ३३ किव्हो तारमार्गाचे रि-कंडक्टरिंग एकल प्रावस्था, ल.दा. तारमार्गाचे रि-कंडक्टरिंग, जुने खांब बदलणे व वितरण परिवर्तीत केंद्राचे नुतनीकरण करणे याचा खर्च सुमारे ३.८१ कोटी रुपयांवर गेल्याने या परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे सदोष कार्यसूचीमुळे निविदेच्या व्याप्तीतुन ती कामे वगळली. परंतु ती कामे खातेनिहाय पद्धतीने केली. अशाप्रकारे प्रकल्प योजनेचा पूर्ण लाभ घेण्यापासून वंचित राहिला, हे बरोबर नाही.

७.३ शासन कंपनीच्या उत्तराशी सहमत आहे.

७.४ केंद्र सरकारच्या त्वरित विद्युत विकास सुधारणा कार्यक्रमांर्गत (एपीडीआरपी) जळगाव प्रकल्पासाठी मुख्य अभियंता, नाशिक परिमंडळ यांनी निधी मंजूर केला. परंतु त्याकामाच्या कार्यसूचीमध्ये बऱ्याच त्रुटी आढळल्यामुळे सदर कामे निविदेच्या व्याप्तीमधून वगळावी लागली. त्यामुळे प्रकल्पाचा लाभ मिळू शकला नाही असा महालेखाकाराने आक्षेप नोंदविला होता. याबाबत विद्युत वितरण कंपनी व ऊर्जा विभाग यांनी सादर केलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने विद्युत वितरण कंपनीचे अधिकारी व ऊर्जा विभागाचे अधिकारी यांची दिनांक १२ सप्टेंबर २०१२ रोजी समितीने साक्ष घेतली.याविषयी अधिक स्पष्टीकरण

करण्यासाठी सांगितले असता विद्युत पारेषण कंपनीच्या व्यवस्थापक यांनी सांगितले की, यामध्ये अंदाजित कामे करताना चूक झाली होती. त्यातील काही कामे काढण्यात आली. यामध्ये प्रत्यक्ष स्थळाची पहाणी न करता कार्यलयामध्ये बसुन अंदाजित कामे तयार केली असण्याची शक्यता आहे. त्यामूळे त्यातील कामामध्ये जास्त प्रमाणात चुका घडल्या असण्याची शक्यता आहे. ही चूक फार पूर्वी झालेली आहे. यावर समितीने सांगितले की. याबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित केली पाहिजे आणि शासनाच्या नियमाप्रमाणे त्यांच्यावर कारवाई करावयास पाहिजे. त्यामुळे अशा कार्यवाहीमुळे गैरकाम करण्यास भविष्यकाळात कोणीही तयार होणार नाही असे सुचविले असता विद्युत पारेषण कंपनीच्या व्यवस्थापकांनी त्यास सहमती दर्शविली.

### ७.५ अभिप्राय व शिफारशी

**केंद्र सरकाच्या त्वरित विद्युत विकास सुधारणा कार्यक्रमांर्गत (एपीडीआरपी) जळगाव प्रकल्पासाठी मुख्य अभियंता, नाशिक परिमंडळ यांनी निधी मंजूर केला परंतु त्याकामाच्या कार्यसूचीमध्ये बऱ्याच त्रुटी आढळल्यामुळे सदर कामे निविदेच्या व्याप्तीमधून वगळावी लागली अशी वस्तुस्थिती समितीला दिसून आली. पर्यायाने त्यामुळे प्रकल्पाचा लाभ मिळू शकला नाही. असा महालेखाकारानी नोंदविलेला आक्षेप बरोबर होता. त्याबाबत समितीसमोर आलेल्या साक्षीपुराव्यावरून त्यावेळी कार्यरत असलेल्या नाशिक विभागातील कार्यालयाकडून कुठल्याही प्रकारची शहानिशा न करता प्रकल्पाच्या कामाची कार्यसूची तयार झाल्याचे दिसून येत असल्यामुळे समितीमध्ये पारेषण कंपनीने मान्य केल्यानुसार त्यावेळी कार्यरत असलेल्या संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी. व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत कळविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

### आठ "प्रकल्प अहवाल तयार करणे"

८.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक २ मधील परिच्छेद क्रमांक २.२.१९ मध्ये **"प्रकल्प अहवाल तयार करणे"** यांचे संबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, एपीडीआरपीच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे प्रत्येक उच्च घनता क्षेत्रासाठी प्राधान्यतेच्या क्रमाने, सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करायचे होते. सविस्तर प्रकल्प अहवालांची चिकित्सा एनटीपीसी / पीजीसीआयएल यांनी करायची होती आणि तद्नंतर ते ऊर्जा मंत्रालयाकडे मंजुरीसाठी पाठवायचे होते. लेखापरीक्षा छाननीत असे आढळले की, कंपनी ने सात प्रकल्पाचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केले नव्हते, पण भारत सरकारच्या मान्यतेसाठी पथदर्शी प्रकल्प अहवाल/कामाचे संक्षिप्त सारांश पाठविले होते (सप्टेंबर, २००२ ते मे, २००३). ह्या प्रकल्पाचे सविस्तर प्रकल्प अहवाल भारत सरकारच्या मंजुरी नंतर (ऑक्टोबर, २००२ ते २००३) तयार केले होते (फेब्रुवारी, २००३ ते मार्च २००४). यामुळे नागपूर शहर व नाशिक शहर प्रकल्पाचे काम सुरू व्हायला अनुक्रमे सात आणि



पाच महिन्यांचा विलंब झाला. तसेच वेगवेगळया प्रकल्पाचे प्रकल्प अहवाल तयार करण्याच्या कंपनीच्या कामांत खालील त्रुटी आढळल्या :—

- अमरावती , लातूर, मालेगाव,सिंधुदुर्ग प्रकल्पासंबंधित सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करतेवेळी (ऑक्टोबर-नोव्हेंबर २००२) थ्री फेज इलेक्ट्रॉनिक मीटरच्या पुन:स्थापनेचा खर्च रुपये ४००० प्रति मीटर धरला होता. तर नाशिक जिल्ह्यासाठी सिंगल फेज इलेक्ट्रॉनिक मीटरबाबत खर्च रुपये २५०० प्रति मीटर इतका धरला होता (ऑक्टोबर, २००२). ह्या तुलनेत, अन्य सर्कल संबंधित प्रकल्पासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करताना त्याच प्रकारचे थ्री फेज मीटर आणि सिंगल फेज मीटरच्या पुन:स्थापनेचा खर्च अनुक्रमे रुपये २२५० व रुपये १००० प्रति मीटर इतका विचारात घेतला होता. भारत सरकारकडे मंजुरीसाठी पाठविण्यापूर्वी एनटीपीसी/पीजीसीआयएल यांनी ह्या अहवालाची चिकित्सा करायची होती. तरिसुद्धा ते ही चूक दाखवण्यात अपयशी झाले.

व्यवस्थापनाने असे म्हटले (ऑगस्ट, २००७) मीटर पेटी आणि मीटर स्थापित करण्याचा खर्च धरुन थ्री फेज व सिंगल फेज मीटर चा खर्च अनुक्रमे रुपये ४००० व रुपये २५०० प्रति मीटर होता. हे उत्तर बरोबर नाही, कारण की, कोल्हापूर व सोलापूर इत्यादि प्रकल्पाच्या बाबतीत थ्री फेज व सिंगल फेज मीटरची मीटर पेटीधरुन मीटर वर खर्च अनुक्रमे रुपये २००० व रुपये १००० प्रति मीटर धरला होता म्हणून तयार केलेले सविस्तर प्रकल्प अहवाल ह्या बाबतीत चुकीचे होते.

- पर्यवेक्षी नियंत्रण आणि माहिती संपादन, भौगोलिक माहिती प्रणाली, आरेखन आणि मार्ग यथापूर्वकरण आकार या संबंधी चुकीचे अंदाज करणे वा याकामाचा अंतर्भाव न करणे ह्या त्रुटी पुणे/पिंपरी-चिंचवड प्रकल्पात होत्या.

व्यवस्थापनाने चूक स्वीकारली पण पुढे असे म्हटले (ऑगस्ट, २००७) कि प्रकल्प भारत सरकारला १५ ते २० दिवसांत सादर करायचे असल्यामुळे ते घाईघाईने तयार केले होते. यावरुन असे दिसते की, प्रकल्प अहवाल तयार करण्याच्या कामांत कंपनी फारशी गंभीर नव्हती व असे वरवरचे प्रस्ताव फेटाळण्यास पात्र होते.

- जळगाव एपीडीआरपी प्रकल्पाला ऑक्टोबर, २००२ मध्ये मान्यता मिळाली पण प्रकल्प खर्चात प्रकल्पाचा एक भाग म्हणून १३२/३३ केव्ही उपकेंद्रातून येणाऱ्या १३ किलोमीटर लांबीच्या ३३ केव्हीच्या वीजवाहिनीचा (अंदाजित खर्च रुपये ५३.८० लाख), समावेश नव्हता कारण अहवाल घाई गडबडीत तयार केला होता. शेवटी धरणगांव वीजवाहिनीवरुन वीज पुरवठा घेण्यात आला त्याकरिता तीन किलोमीटरची टॅप लाईन संकटकालीन राखीव व्यवस्था म्हणून टाकण्यात आली व उपकेंद्र टेस्ट चार्ज केले (ऑक्टोबर, २००५) ह्यामुळे उपकेंद्र क्षमतेएवढा भार घेऊ शकले नाही. यावरुन असे दिसते की सविस्तर प्रकल्प अहवालात चुकीचे अंदाज केले होते व मान्यतेला पाठविण्यापूर्वी अहवालाची उचित चिकित्सा करण्यात आली नव्हती.

८.२ या प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करतांना असे नमूद केले की, एनटीपीसीने (खरेदी ज्ञापनाच्या एसीसीमध्ये) दिलेल्या निर्देशांनुसार पथदर्शी प्रकल्प / त्रोटक सारांश मंजुरीसाठी पाठवला. नागपूर शहर व नाशिक शहराच्या योजनांना भारत सरकारने त्याच्या पत्र क्रं.७/१८/२००२ - एपीडीआरपी, दिनांक ०५ जून २००३ अन्वये मंजुरी दिली. आणि तसे या कार्यालयाच्या पत्र क्र. सीई / आयआर/ एपीडीआरपी / ३/२८८/२२/९९४, दिनांक १० जुलै २००३ अन्वये मुख्य अभियंता (नाशप) आणि मुख्य अभियंता (ना. प.) यांना कळविण्यात आले. आदेश देण्यातील विलंबामुळे देकाराचा वैधता कालावधी उलटून गेल्यामुळे नागपूर शहर परिमंडलात एल-एक या बोलीदाराने आदेश स्वीकारला नाही. तसेच अन्य निविदेमध्ये बोलीदाराने अर्हतेच्या प्रकरणी उच्च न्यायालयात विनंती याचिका दाखल केली. म्हणून न्यायालयाच्या निवाड्यानंतर आदेश दिले. म्हणून प्रकल्प रखडला.

नाशिक शहर परिमंडलात देऊ केलेले दर जास्त होते. स्नॅप विडिंगनंतरही मिळालेले दर जास्तच होते. म्हणून पुन्हा नव्याने निविदा मागविण्याचे ठरवले. परंतु त्यानंतर देऊ केलेले दरही जास्तच होते. त्यामुळे कामास विलंब झाला व शेवटी ते खातेनिहाय पद्धतीने केले.

मीटर बॉक्स आणि उभारणीच्या खर्च सहित त्री-प्रावस्था मीटरचा खर्च ४००० रुपये आहे. मीटर बॉक्स व उभारणीच्या खर्चासहित एकल प्रावस्था मीटरचा खर्च २५०० रूपये आहे. परंतु त्री-प्रावस्था व एकल प्रावस्था मीटरचा खर्च अनुक्रमे २२५० रूपये व १००० रूपये असा आहे.

पुणे/पिंपरी-चिंचवडसाठी प्रकल्प अहवाल बनवते वेळी स्काडा व जीआयएस मॅपींगची पद्धत अस्तित्वात आली नव्हती भारत सरकारला १५ ते २० दिवसांत योजना सादर करावयाची असल्याने ती घाईघाईने बनविली. योजनेमध्ये माहिती तंत्रज्ञानविषयक बाबी जसे आयव्हीआरएस प्रणाली माहिती प्रणालीच्या व्यवस्थापनासाठी संगणकीकरण व माहिती तंत्रज्ञान कॉल सेंटर्स उपकेंद्रासाठी स्काडा प्रणाली यांचा समावेश केला. दिनांक २८ एप्रिल २००४ च्या मंडळ बैठकीत मंडळ ठराव क्रं. १२ अन्वये म.रा.वि. मंडळाने रस्ता यथा पूर्वकरण शुल्काबाबत निर्णय घेतला व ए.पी.डी.आर.पी. योजनेत समाविष्ट केला.

जळगाव एपीडीआरपी योजनेस ऑक्टोबर, २००२ मध्ये मान्यता मिळाली. जळगाव रिंग रोड उपकेंद्रांच्या निविदेत ३३ किव्होचा १३ कि.मी. तारमार्गाचा विचार नजरचुकीने केला होता. जो मंडळाने दिनांक १६ जून २००३ मध्ये मंजूर केला. सुधारणेनंतर उपकेंद्र इनलाईन उपकेंद्र असल्याचे ठरविण्यात आले. त्यासही मंडळाने दिनांक १६ सप्टेंबर २००३ रोजी मंजुरी दिली. परंतु यथोचित जागा न मिळाल्याने ३३ किव्हो तारमार्गाचे आतील ३ कि.मीटर अंतर वाढले. त्याची तरतूद अन्य प्रकल्पात करण्यात आली. उपकेंद्र दिनांक ०२ सप्टेंबर २००५ रोजी कार्यान्वित झाले व आता ते चालू आहे.

८.३ शासन कंपनीच्या उत्तराशी सहमत आहे.

८.४ त्वरित विद्युत विकास सुधारणा कार्यक्रम (एपीडीआरपी) च्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे प्रत्येक उच्च घनता क्षेत्रासाठी प्राधान्यतेच्या क्रमाने सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करावयाचे होते. सदर प्रकल्प



अहवालांची चिकित्सा करून केंद्राच्या ऊर्जा मंत्रालयाकडे मंजुरीसाठी पाठवावयाचे होते. परंतु त्यादृष्टीने काम प्रस्तावित न केल्यामुळे काही महत्त्वाच्या कामांना उशिर झाला असा महालेखाकारांनी आक्षेप नोंदविला होता. याबाबत विद्युत वितरण कंपनी व ऊर्जा विभाग यांनी सादर केलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने विद्युत वितरण कंपनीचे अधिकारी व ऊर्जा विभागाचे अधिकारी यांची दिनांक १२ सप्टेंबर २०१२ रोजी समितीने साक्ष घेतली. याविषयी अधिक स्पष्टीकरण करण्याविषयी समितीने सांगितले असता विद्युत पारेषण कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की, लेखापरिक्षण करतांना असा मुद्दा उपस्थित केला गेला की, दोन तीन कार्यप्रणालीमध्ये अंदाजित करावयाच्या रकमेमध्ये तफावत झाली व सदर तफावतीमुळे सदर चूक निर्माण झाली याबाबत पारेषणचेच कर्मचारी योग्य त्यादृष्टीने कार्यवाही करत नसल्याने त्यांच्यावर कारवाई केल्याशिवाय सुधारणा होणार नाही. हे त्यांनी मान्य केले. ज्यांनी चूका केलेल्या आहेत. त्यांच्यावर काय कारवाई करण्यात आली असे समितीने विचारले असता विद्युत पारेषण कंपनीच्या व्यवस्थापकीय यांनी सांगितले की, ज्यांनी चूका केल्या आहेत त्यांच्यावर आपण जबाबदारी निश्चित करतो यापूर्वी अशा कार्यानुभवाचा अनुभव नसल्याने संबंधितांकडून निष्काळजीपणातून चूका झाल्या आहेत. प्रत्येक वस्तूचे दरपत्रक ठरविलेले असते. त्याप्रमाणे विद्युत पारेषण कंपनीच्या ज्या वस्तुचे दरपत्रक ठरविण्यात आलेले आहेत काय असे समितीने विचारले असता विद्युत पारेषण कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की, पारेषण विभागामध्ये देखील वस्तुंचे दर ठरविलेले आहेत. यापूर्वी देखील ते ठरविलेले होते. याबाबत महालेखाकारांच्या आक्षेपामधील वस्तूंबाबत दर ठरविण्यामध्ये सुसूत्रता नव्हती हे देखील त्यांनी मान्य केले. महाराष्ट्रातील काही विद्युत विभागाकरिता एकच निविदा काढण्यात आली ही देखील पद्धत बरोबर नसून यामध्ये यापुढील काळात सुधारणा करण्याची काळजी घेण्यात येईल हे देखील त्यांनी स्पष्ट केले. केंद्राला सादर करावयाचा प्रस्ताव सादर करताना विलंब झाल्याने घाईघाईने सादर केला गेला, ही वस्तुस्थिती आहे काय असे समितीने विचारले असता सदर वस्तुस्थिती त्यांनी मान्य केली व सादर केलेल्या प्रस्तावाचा दर्जा योग्य नव्हता हे देखील त्यांनी स्पष्ट केले. केंद्राकडे सादर करण्यात येणारे प्रस्ताव कोणाच्या सहिने पुढे पाठविले जातात. असे समितीने विचारले असता विद्युत पारेषण कंपनीच्या व्यवस्थापक यांनी सांगितले की, सर्व प्रस्ताव बोर्डापुढे सादर करण्यात येवून त्यांच्या मंजुरीनंतर मुख्य अभियंता (एपीडीआरपी) यांच्यामार्फत पुढे पाठविले जातात असेही त्यांनी स्पष्ट केले.

**८.५ अभिप्राय व शिफारशी**

**त्वरित विद्युत विकास सुधारणा कार्यक्रम (एपीडीआरपी) च्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे प्रत्येक उच्च घनता क्षेत्रासाठी प्राधान्यतेच्या क्रमाने सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करावयाचे होते. सदर प्रकल्प अहवालांची चिकित्सा करून केंद्राच्या ऊर्जा मंत्रालयाकडे मंजुरीसाठी पाठवावयाचे होते. सोलापूर, लातूर, उस्मानाबाद, कोल्हापूर, नागपूर जिल्हा, नागपूर शहर व नाशिक शहर या सात प्रकल्पाचे सविस्तर प्रकल्प**

अहवाल तयार केले नव्हते तसेच अमरावती, लातूर, मालेगाव, सिंधुदुर्ग या प्रकल्पाच्या सविस्तर अहवालामध्ये अनेक त्रुटी आढळून आल्या, असे समितीसमोर झालेल्या साक्षीपुराव्यावरून स्पष्ट झाले. केंद्रशासनाकडे वित्तलब्धी मिळण्याच्या दृष्टीने सादर करावयाचे प्रकल्प अहवाल सुनिश्चित पद्धतीने करणे आवश्यक होते. सदर प्रकल्प अहवाल तयार करण्यास विलंब झाल्याने घाईघाईने अहवाल तयार करून सादर केले गेले. व त्यामध्ये अपूर्ण व अनेक त्रुटीयुक्त अहवाल असल्यामुळे केंद्राने त्यास मान्यता दिली नाही. यामुळे प्रकल्पाचे काम महालेखाकारांच्या आक्षेपानुसार विलंबाने सुरू झाले. हा मुख्य मुद्दा ग्राह्य धरण्यासारखा आहे असे समितीचे मत आहे. असे प्रकल्प अहवाल सादर करताना, प्रकल्प अहवाल सादर करणाऱ्या तत्कालिन अधिकाऱ्यांनी त्यामध्ये कार्यकुशलता दाखविली नाही हे देखील स्पष्ट होते. त्यामुळे अशा अकार्यक्षम असणाऱ्या अधिकाऱ्यांच्यामुळे प्रकल्पाच्या कामात विलंब झाला. त्यामुळे अशा संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कडक कारवाई करण्यात यावी. व यापुढील काळात विहित मुदतीत करावयाच्या कामाच्या दृष्टीने वेळ निश्चित करून सूत्रबद्ध पद्धतीने कामाची आखणी करावी. अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे. याप्रकरणी करण्यात येणाऱ्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत कळविण्यात यावी.

**नऊ "कामाची अंमलबजावणी"**

९.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक २ मधील परिच्छेद क्रमांक २.२.२१ मध्ये **"कामाची अंमलबजावणी"** यांचे संबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, प्रत्येक घटकांचा वेगवेगळा पुरवठा आदेश काढणारी आदेश काढणारी संकेत मान्य व्यवस्था वेळ काढण्याची असते फक्त एकाच घटकांची व्यवस्था झाली नसेल तर कामाच्या कार्यान्वयनांत सर्वंकष विलंब होतो म्हणून एपीडीआरपी प्रकल्पांची टर्न की आधारावर अंमलबजावणी करायची होती. याकरता (अ) ३३ केव्ही वीजवाहिन्या व उपकेंद्राचे काम (ब) एचटी/ एलटी वीजवाहिन्या व वितरण ट्रॅन्सफॉर्मर केंद्राचे (डीटीसी) काम आणि (क) मीटरिंगची कामे अशी प्रकल्पाची विल्हेवारी केली होती. अशातऱ्हेने विल्हेवारी केलेल्या प्रकल्पाच्या कामाच्या निविदा मागवून ते काम टर्न की आधारावर प्रदान केले होते.

**एकही प्रकल्प नियोजित २४ महिन्यांच्या कालावधीत पूर्ण झाला नाही.**

प्रकल्प मंजूर केलेल्या तारखेपासून २४ महिन्यांचा आत पूर्ण करायचे होते. परंतु असे दिसून आले की, भारत सरकारने वर्ष २००२-०३ व २००३-०४ मंजूर केलेल्या रूपये १,१३६.५४ कोटी खर्चाच्या २० प्रकल्पांपैकी एकही प्रकल्प जुलै, २००७ पर्यंत पूर्ण झाला नव्हता. मीटरिंगची काम पूर्ण करण्यात कंपनीतर्फे झालेला विलंब हे प्रकल्प पूर्ण न होण्याचे मुख्य कारण होते. तसेच ह्या २०* प्रकल्पाच्या प्रत्यक्ष प्रगती अहवालात असे आढळले की प्रमुख कामे जुलै, २००७ जसे ३३/११ केव्ही उपकेंद्राची स्थापना, एचटी/ एलटी वीजवाहिन्यांची उभारणी, नवीन ट्रान्सफॉर्मरर्सची स्थापना, उपकेंद्राची डागडूजी इत्यादी ९१ टक्के पूर्ण



झाली होती तर ग्राहकांच्या मीटररिंगची काम ५० टक्क्यांपर्यंत पूर्ण झाले होते.

त्याचप्रमाणे, भारत सरकारने वर्ष २००४-०५ मध्ये मंजूर केलेल्या रुपये ३८.१६ कोटी खर्चाच्या नऊ** प्रकल्पापैकी एकही प्रकल्प जुलै, २००७ पर्यंत पूर्ण झालेला नव्हता. भारत सरकारने वर्ष २००४-०५ मध्ये मंजूर केलेल्या नऊ प्रकल्पांच्या प्रत्यक्ष प्रगती अहवालात असे आढळून आले, की महत्त्वाची कामे, जसे उपकेंद्राची स्थापना, एचटी/एलटी वीजवाहिन्यांची उभारणी, नवीन डीटीसीची स्थापना इत्यादी जुलै, २००७ पर्यंत फक्त २३ टक्केच पूर्ण झाली होती. मागील परिच्छेद २.२.१६ मध्ये दर्शविल्याप्रमाणे कर्ज करार करण्यात विलंब झाल्यामुळे ही कामे सुरू व्हायला उशीर झाला, हे या प्रकल्पाबाबत विलंबाचे मुख्य कारण होते.

९.२ या प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करतांना असे नमूद केले की, भारत सरकारने २००२-२००३ आणि २००३-०४ मध्ये मंजूर केलेल्या २० प्रकल्पांची (मार्च, २००९ अनुसारची) प्रगती खालीलप्रमाणे आहे :

| | लक्ष्य | साध्य | % |
|---|---|---|---|
| उपकेंद्र | ६४ | ६३ | ९८.४ |
| ३३ किव्ही तारमार्ग | ७०६.१ | ६८७.८६ | ९७.४२ |
| ११ किव्ही तारमार्ग | ४७५७.१३ | ४५६९.८९ | ९६.०६ |
| ल.दा. तारमार्ग | १२०५.४५ | १०३८.८९ | ८६.१८ |
| उपकेंद्र रिव्हँपिंग | २३७ | २३७ | १०० |
| नवीन विपके | ७१७२ | ६८६५ | ९५.७१ |

जवळ जवळ ९५.६२ % काम पूर्ण झाले आहे. तर मीटर्स बसविण्याचे काम खालीलप्रमाणे पूर्ण झाले आहे :

| मीटर | लक्ष्य | साध्य | % |
|---|---|---|---|
| एकल प्रावस्था | १६८६८८२ | ११४९६३५ | ६८.१५ % |
| त्री प्रावस्था | ७३३६० | ६५४१२ | ८९.१६ % |
| विपके मीटर्स | ३०५१४ | २७४९४ | ९०.१० % |

**एकूण ८२.४७ % लक्ष्य साध्य केले.**

त्याचप्रमाणे २००४-०५ मध्ये मंजूर झालेल्या प्रकल्पांच्या मार्च २००९ नुसारची प्रगती खालीलप्रमाणे आहे :—

| | लक्ष्य | साध्य | % |
|---|---|---|---|
| उपकेंद्र | ५ | ५ | १००% |
| उ.दा.तारमार्ग (३३ व ११ केव्ही) | २५०.१ | १४१.६३ | ५६.६२% |
| नवीन विपकेंद्र | ४५२ | ९९८ | २२०.७९% |
| विपकेंद्र रिव्हॅपिंग | ३३९ | २०७ | ६१.०६% |

अशा रितीने साध्य केलेले एकूण लक्ष्य १०९.६१ % इतके आहे.

योजना मध्येच बंद झाल्या, भारत सरकारच्या (ऊर्जा मंत्रालय ) निर्देशानुसार सर्व प्रकल्प दि. ३१ मार्च २००९ रोजी बंद करण्यात आले.

९.३ शासन कंपनीच्या उत्तराशी सहमत आहे.

९.४ त्वरित विद्युत विकास सुधारणा कार्यक्रम (एपीडीआरपी) च्या अंतर्गत केंद्राने मंजूर केलेले प्रकल्प २४ महिन्याच्याआत पूर्ण करावयाचे होते. यासाठी केंद्राने मंजूर केलेला वित्तलब्धी एकूण २० प्रकल्पासाठी होता. व त्यांतील एकही प्रकल्प जुलै, २००७ पर्यंत पूर्ण झाला नव्हता. असा महालेखाकारांनी आक्षेप नोंदविला होता. याबाबत विद्युत वितरण कंपनी व ऊर्जा विभाग यांनी सादर केलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने विद्युत वितरण कंपनीचे अधिकारी व ऊर्जा विभागाचे अधिकारी यांची दिनांक १२ सप्टेंबर २०१२ रोजी समितीने साक्ष घेतली. त्यावेळी विद्युत पारेषण कंपनीच्या व्यवस्थापक यांनी सांगितले की, विद्युत विकास सुधारणा कार्यक्रम (एपीडीआरपी) च्या अंतर्गत पूर्ण झालेल्या कामासाठी मीटर खरेदी करून लावावयाची होती. परंतु सन २००५ मध्ये आलेल्या महापुरामुळे मुंबई, कल्याण, कोल्हापूर इत्यादी ठिकाणी विजपुरवठा खंडीत झाला होता. हा वीजपुरवठा सुरू करण्यासाठी प्राथमिकतेमध्ये बदल केला गेला. आज पूर्वीच्या मीटर पद्धतीमध्ये बदल केलेला असून आता नवीन पद्धतीनुसार झीरो व्हॅटच्या बल्बचीदेखील वीज वापराची नोंद होत असते. महाराष्ट्रात ४५ लाख मीटर आहेत त्यातील ३० लाख मीटर बदलावायाची आहेत. व त्यामध्ये आधुनिक पद्धतीचा वापर करून आटोरिडर पद्धत आणून आय आर किंवा आरएफ तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा विचार सुरू आहे. मोठमोठ्या शहरामध्ये उंच इमारतीमधील मीटर रिडींगसाठी नवीन तंत्रज्ञानानुसार आधुनिक पद्धतीने मीटरचे रिडींग इमारतीच्या बाहेर राहून देखील घेता येईल. उद्योग क्षेत्रातील ग्राहकांसाठी मीटरवर मॉडेम बसवून ते विद्युत पारेषण कंपनीच्या कार्यालयामार्फत देखील त्याचे रिडींग घेता येईल. व किती विद्युत वापरली जात आहे. याचा देखील दर १५ मिनिटांनी आढावा घेता येईल असे स्पष्ट केले. काही लोकांकडून वीज कनेक्शनसाठी अर्ज केल्यानंतर बराच कालावधीत कनेक्शन दिले जात नाही. त्यामुळे वीज चोरीसारख्या घटना अधिक घडत आहेत. याकडे समितीने लक्ष वेधले असता विद्युत पारेषण विभागाच्या व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की विद्युत



मीटरचा पुरवठा सद्या चांगल्याप्रकारे होत असून आगामी नजीकच्या काळात सर्व ग्राहकांना मागणीनुसार त्वरित विद्युत जोडणी दिली जाईल यासाठी आधुनिक प्रणालीनुसार संगणकाद्वारे ऑनलाईन पद्धतीनेसुद्धा अर्ज स्विकारण्याची कार्यवाही केली जात आहे. यावर समितीने सुचविले की ऑनलाईन पद्धतीद्वारे तक्रारीसुद्धा स्वीकारण्यात याव्यात जेणेकरून अधिकारी व कर्मचाऱ्यांवरती अंकुश निर्माण होऊ शकेल.

**९.५ अभिप्राय व शिफारशी**

**त्वरित विद्युत विकास सुधारणा कार्यक्रम (एपीडीआरपी) च्या अंतर्गत केंद्राने मंजूर केलेले प्रकल्प २४ महिन्याच्याआत पूर्ण करावायाचे होते. यासाठी केंद्राने मंजूर केलेला वित्तलब्धी एकूण २० प्रकल्पासाठी होता. व त्यांतील एकही प्रकल्प जुलै, २००७ पर्यंत पूर्ण झाला नव्हता. याबाबत साक्षीच्या वेळी समितीसमोर आलेल्या माहितीनुसार विद्युत मीटर बदलणे व लावणे व त्यासाठी आवश्यक असलेली मीटर खरेदी यामुळे मुख्यतः विलंब लागला होता. आकस्मिक कारणांमुळे प्राप्त झालेले वीज मीटरर्स देखील प्राथम्यक्रम बदलून अशा ठिकाणी लावणे क्रमप्राप्त होते. याची समितीने नोंद घेतलेली आहे. विद्युत पारेषण मधील वीजचोरी टाळण्यासाठी वीज वापरासाठी अर्ज करणाऱ्या ग्राहकाला त्वरित विद्युत जोडणी मिळण्याच्या दृष्टीने आखलेल्या कालबद्ध कार्यक्रमाबद्दल समिती समाधान व्यक्त करते. नवीन संगणक प्रणालीनुसार नवीन वीजजोडणीसाठी संगणकाद्वारे अर्ज स्वीकारण्यात येत आहेत, त्याप्रमाणे ग्राहकाच्या तक्रारीची नोंददेखील संगणकाद्वारे प्राप्त करण्यासाठी कार्यप्रणाली विकसित करावी व अशा प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी मुख्य कार्यालयामध्ये एक स्वतंत्र कक्ष निर्माण करावा. तसेच शक्य असल्यास वीज जोडणीसाठी अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्या ग्राहकाला वीज जोडणी किती दिवसांत दिली जाईल हे लेखी अर्ज सादर केल्यानंतर त्याचवेळी नमूद करून कळविण्यात यावे. अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे. याप्रकरणी करण्यात येणाऱ्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत कळविण्यात यावी.**

**दहा "निविदांना अंतिमरुप देण्यात विलंब"**

**१०.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००६-२००७ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक २ मधील परिच्छेद क्रमांक २.२.२३ मध्ये **"निविदांना अंतिमरुप देण्यात विलंब"** यांचे संबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, लातूर विभागाकरिता एचटी/एलटी वीजवाहिन्या व डीटीसीच्या कामाच्या निविदा रूपये ९.५० कोटी करिता मिळाल्या होत्या (मार्च, २००३). पण निविदेत मिळालेले दर फारच जास्त होते त्यामुळे निविदांना अंतिमरुप दिले नाही व निविदा परत मागवल्या (जुलै, २००४). तांत्रिक व वित्तीय बोल्या अनुक्रमे २४ ऑगस्ट २००४ आणि १४ ऑक्टोबर २००४ मध्ये उघडल्या. बोल्या २० फेब्रुवारी २००५ पर्यंत वैध होत्या. निविदा स्वीकृतीचा प्रस्ताव परिमंडळ कार्यालयाने मुख्यालयास सादर केला (१७ नोव्हेंबर २००४) मुख्यालयाने त्यास मंजुरी दिली (२२ फेब्रुवारी २००५). या कामाचे कंत्राट, जी.व्ही.पी.आर इंजिनिअरिंग, हैद्राबाद (सर्वात कमी दराचे कंत्राटदार) यांना

प्रदान करण्यांत आले, त्यांनी ह्या कामाकरता अंदाजित खर्चाच्या (रूपये १२.२४ कोटी) वरती २८.८१ टक्के दर मागितले होते. परंतु वैध तारखेच्या (२० फेब्रुवारी २००५) समाप्तीनंतर, स्वीकृती पत्र देण्यात आल्यामुळे (४ मार्च २००५) कंत्राटदाराने निविदेत दर्शविलेल्या दराने काम करण्यास नकार दिला (१० मार्च २००५) आणि खांब, ट्रान्सफॉर्मर इत्यादी महत्त्वाच्या सामग्रीचे दर वाढवून देण्याची मागणी केली. परंतु कंपनीने मागणी मान्य केली नाही. दरम्यान मुख्यालयाने, हे काम (१९ मे २००५) परिमंडळ कार्यालयास विभागीय पातळीवर घेण्यास सांगितले. परिमंडळ कार्यालयाने (१६ सप्टेंबर २००५) इतर कामातील व्यस्ततेमुळे हे काम विभागीय पातळीवर करण्यात असमर्थता दर्शविली आणि दुसऱ्या क्रमांकाच्या सर्वात खालचा देकार देणाऱ्या कंत्राटदाराला हे काम प्रदान करण्याचा प्रस्ताव दिला या कंत्राटदाराने प्रथम क्रमांकाच्या सर्वात खालच्या कंत्राटदाराच्यादराएवढे दर घेण्याचे मान्य केले होते.

दुसऱ्या क्रमांकाच्या सर्वात कमी बोलीदाराच्या निविदेस मान्यता दिल्याने करण्याचा प्रस्ताव मुख्यालयाने कळविले (१० ऑक्टोबर २००५). परंतु कंत्राटदाराने मागणी केल्याप्रमाणे वितरण ट्रान्सफॉर्मरचा पुरवठा करण्यास कंपनीने होकार दिल्याने हे काम कंत्राटाच्या व्याप्तीमधून कमी करण्यात आले व कंत्राटदाराला रूपये १० कोटीच्या कामाकरता स्वीकृती पत्र दिले. (३१ ऑक्टोबर २००५). काम ३० ऑक्टोबर २००६ ला पूर्ण करण्याचे ठरले होते. तरी मार्च २००७ पर्यंत फक्त ९१ टक्के काम पूर्ण झाले होतें.

**वैध कालावधी संपण्याच्या आधी निविदेला अंतिमरूप न दिल्यामुळे लातूर प्रकल्पास रूपये २.१६ कोटीचा अतिरिक्त खर्च आला.** असे निदर्शनास आले की, क्षेत्रीय कार्यालयांनी वाणिज्यीक बोल्या उघडण्यापासून ते मुख्यालयाने प्रस्तावास अंतिम मान्यता देण्यापर्यंतच्या प्रत्येक टप्प्यात निविदा प्रक्रिया व अंतिमरुप देण्याच्या कामात अवाजवी विलंब झाला. ह्याचा परिणाम वैधता कालावधी समाप्त होण्यात झाला व कंत्राटदारांनी हे काम दिलेल्या दरात करण्यास नकार दिला. देकाराचा वैधता कालावधी संपण्याआधीच तो वाढवून घेण्याची बाब कंत्राटदाराकडे नेण्यास कंपनीला अपयश आले. दुसऱ्या क्रमांकाच्या सर्वात कमी कंत्राटदाराच्या मागणीप्रमाणे कंपनीने वितरण ट्रान्सफॉर्मर पुरवण्याचे मान्य करणे हे टर्न की कराराच्या संकल्पनेचे उल्लंघन आहे व त्यामुळे कंपनीस ट्रान्सफॉर्मरवर रूपये २.१६$ कोटीचा अतिरिक्त खर्च करावा लागला.

व्यवस्थापनाने असे म्हटले होते (ऑगस्ट २००७) की, सर्वात कमी बोलीदाराने काम हाती घेण्यास नकार दिला व बोलीदारांची बँक गॅरंटी वटविण्याच्या कारवाईस आरंभ केला होता. परंतु बोलीदाराने कोर्टातून बंदी हुकूम मिळविल्यामुळे बँक गॅरंटी वटू शकली नाही. हे उत्तर समर्थनीय नाही कारण की, कंपनी वैध कालावधीत निविदेस अंतिमरुप देण्यात अपयशी ठरली आणि ह्या देकारात कंत्राटदाराने वितरण ट्रान्सफॉर्मरचा पुरवठा करण्याचा समावेश होता. तसेच दुसऱ्या क्रमांकाच्या सर्वात कमी बोलीदाराच्या दराशी दर जुळविणारा देकार सशर्थ होता व तो कंपनीने रूपये २.१६ कोटीच्या अतिरिक्त खर्चात मान्य केला.



**१०.२** या प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करतांना असे नमूद केले की, लातूर विभागातील पुरवठा उभारणी चाचणी व ऊ.दा./ ल.दा. तारमार्ग विपके ल.दा. संधारित्र इत्यादीच्या क्रियान्वयनाच्या कामांची निविदा २८.८१ टक्के व त्यावरील दराने दि. ०४ मार्च २००५ रोजी काढण्यात आली. किंमतीतील वृद्धीमुळे एल १ या बोली दराने काम घेण्यातील असमर्थता व्यक्त केली.

एल २ या बोलीदाराने एल १ च्या दराने काम करण्याचा देकार स्वाधिकारात दिला. म.रा.वि.कं. ने वितरण परिवर्तीत्र उपलब्ध करून द्यायचे असल्याने त्यांच्या कामात वितरण परिवर्तीत्राच्या पुरवठ्याचा समावेश केला नाही. निविदेचा त्रोटक सारांश खालीलप्रमाणे आहे :—

| | | |
|---|---|---|
| १. | निविदेचा अंदाजे खर्च | ९.४४५७ कोटी रुपये |
| २. | ३२८४४ रुपये५०२ टी/एफ दराने ६३ किंवा ॲ टी/एफ चे मूल्य | १.६४८७ कोटी रुपये |
| ३. | टी एफ वगळून निविदेचा अंदाजे खर्च | ७.७९६९ कोटी रुपये |
| ४. | ६३ किवा ॲ टी/एफ वगळून २८.८१% अनूसूचित दराच्या वर निविदेचे कंत्राट मूल्य | १०,१४२५ कोटी रुपये |

वरील बाब विचारात घेऊन व एपीडीआरपी कामे कालबद्ध स्वरूपाची असल्याने २ महिन्यांचा कालावधी घेणारे पुन्हा निविदा काढण्याचे काम न करता २८.८१% पेक्षा वरील दर स्वीकारण्याचे ठरविले.

त्याखेरीज असे की, प्रथम व द्वितीय किमान बोलीदारांना जारी झालेल्या वाटपाच्या पत्राच्या दरम्यान म्हणजे मार्च २००५ ते ऑक्टोंबर २००५ च्या दरम्यान परिवर्तित्रांची किंमतही वाढली होती. वरील बाब विचारात घेता,कंपनीने द्वितीय किमान दराची बोली स्वीकारली.

म्हणून कामाचे व्यापक हित लक्षात घेऊन या अटी स्वीकारण्यात आल्या. दिनांक २२ सप्टेंबर २००५ च्या नं. १६ च्या मंडळ ठरावानुसार दिनांक १ ऑक्टोबर २००५ रोजी एल.ओ.ए जारी केलो. निविदेतील अपरिहार्य प्रक्रियेमुळे विलंब लागला. मार्च, २००९ रोजी प्रगती खालीलप्रमाणे :—

| | लक्ष्य | साध्य | टक्केवारी |
|---|---|---|---|
| उ.दा.तारमार्ग | ९७० | ९३७.४६ | ९६.६५ |
| ल.दा. तारमार्ग | २५५ | २६३.६७ | १०३.४ |
| विपकें | १४९८ | १४९७ | ९९.९३ |

भारत सरकारच्या (ऊर्जा मंत्रालय) निर्देशानुसार सर्व प्रकल्प दि. ३१ मार्च २००९ रोजी बंद करण्यात आले.

रुपये ९.४१ लाखांची बँक हमीच्या रोखीकरणाची प्रक्रिया चालू आहे. सदर प्रकरण लातुरच्या नागरी कोर्टात असुन नंतरची सुनावणी दि. ३० एप्रिल २०१० रोजी आहे.

**१०.३** शासन कंपनीच्या उत्तराशी सहमत आहे.

**१०.४** लातूर विभागाकरिता उच्च दाब व कमी दाबाच्या वीजवाहिन्या व त्याच्या कामासाठी निविदा मागविल्या होत्या. प्राप्त झालेल्या निविदेतील दर जास्तीचे असल्याने त्यांना अतिमरूप न देता फेरनिविदा मागविल्या गेल्या. निविदा स्वीकृतीचा प्रस्ताव परिमंडळ कार्यालयाने मुख्यालयास सादर केल्यानंतर त्यास मंजुरी दिली व त्यानुसार संबंधित ठेकेदाराला काम प्रदान करण्यात आले. यामध्ये निविदेचा वैधता कालावधी निघून गेल्यामुळे कंत्राटदाराने निविदेतील तरतूदीनुसार काम करण्यास नकार देऊन जास्तीच्या दराची मागणी केली. यामुळे मंडळ कार्यालयाकडून पुन्हा याबाबत बदल करून दुसऱ्या क्रमांकाच्या निविदाकाराला कंत्राट प्रदान करण्याचा प्रस्ताव दिला. वैध कालावधी संपण्याच्या आधी निविदेला अंतिमरुप न दिल्यामुळे जास्तीचा २.१६ कोटी इतका अतिरिक्त खर्च करावा लागला, असा महालेखाकारांनी आक्षेप नोंदविला होता. याबाबत विद्युत वितरण कंपनी व ऊर्जा विभाग यांनी सादर केलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने विद्युत वितरण कंपनीचे अधिकारी व ऊर्जा विभागाचे अधिकारी यांची दि. १२ सप्टेंबर २०१२ रोजी समितीने साक्ष घेतली. त्यावेळी विद्युत पारेषण कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की, याबाबत कामाची निविदा काढल्यानंतर वैध कालावधी संपल्यामुळे प्रथम कंत्राटदाराने वाढीव कामाचा मोबदला न देण्याचे विद्युत पारेषण कंपनीने मान्य न केल्याने त्यांनी काम करण्यास असमर्थता दर्शविली तेव्हा दुसऱ्या निविदाकारास काम करण्यास सांगितले व वितरण परिवर्तीत (ट्रान्सफार्मर) वीज कंपनीकडून उपलब्ध करून देणार असल्याने त्याचा समावेश न करता दुसऱ्या पुरवठा दाराने सदर काम केले. याबाबत या कामाचा आढावा घेतला असता ही बाब माझ्या निदर्शनास आली असे त्यांनी स्पष्ट केले.

**१०.५ अभिप्राय व शिफारशी**

**लातूर विभागाकरिता उच्च दाब व कमी दाबाच्या वीजवाहिन्या व त्याच्या कामासाठी निविदा मागविल्या होत्या. प्राप्त झालेल्या निविदेतील दर जास्तीचे असल्याने त्यांना अंतिम रूप न देता फेरनिविदा मागविल्या गेल्या. निविदा स्वीकृतीचा प्रस्ताव परिमंडळ कार्यालयाने मुख्यालयास सादर केल्यानंतर त्यास मंजुरी दिली व त्यानुसार संबंधित ठेकेदाराला काम प्रदान करण्यात आले. यामध्ये निविदेचा वैधता कालावधी निघून गेल्यामुळे कंत्राटदाराने निविदेतील तरतुदीनुसार काम करण्यास नकार देऊन जास्तीच्या दराची मागणी केली. यामुळे मंडळ कार्यालयाकडून पुन्हा याबाबत बदल करून दुसऱ्या क्रमांकाच्या निविदाकाराला कंत्राट प्रदान करण्याचा प्रस्ताव दिला. वैध कालावधी संपण्याच्या आधी निविदेला अंतिमरुप न दिल्यामुळे जास्तीचा २.१६ कोटी इतका अतिरिक्त खर्च करावा लागला हा महालेखाकारांनी घेतलेला आक्षेप बरोबर असल्याचे समितीला दिसून आले. यामध्ये क्षेत्रीय कार्यालयाकडून प्रत्येक टप्प्यांतील प्रक्रियेसाठी अवाजवी विलंब झाला ही गोष्ट स्पष्ट झाली. दुसऱ्या ठेकेदारांनी काम पूर्ण करताना त्यातील काही समावेश**



**असलेली कामे वगळण्यामुळे काम पूर्ण झाले असले तरी क्षेत्रीय कार्यालयातील अधिकाऱ्यांच्या गैरकारभारमुळे अवाजवी विलंबाबाबत विद्युत पारेषण कंपनीला जवळ जवळ २.१६ कोटी इतक्या आर्थिक संकटास सामोरे जावे लागले. वाणिज्यिक प्रथांचा अनुसर न करणाऱ्या व कंपनीचे हित न जपणाऱ्या तत्कालिन क्षेत्रीय अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून सदर आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करावे अशी समितीची शिफारस आहे. याप्रकरणी करण्यात येणाऱ्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत कळविण्यात यावी.**

## अकरा "ऊर्जा लेखांकन व ऊर्जा लेखापरीक्षण"

**११.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक २ मधील परिच्छेद क्रमांक २.२.२७ मध्ये **"ऊर्जा लेखांकन व ऊर्जा लेखापरीक्षण"** यांचे संबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, कमी भांडवलाची गुंतवणूक करून वाणिज्यिक वीजहानीत खात्रीशीर कपात करणाऱ्या अतिमहत्वाच्या उपायांपैकी व्यापक ऊर्जा लेखांकन हा एक उपाय आहे. अशा व्यापक ऊर्जा लेखांकनामुळे विद्युत प्रणालीच्या विविध खण्डातील वीजहानीचे परिणाम काढण्यास सहाय्यभूत ठरते. ऊर्जा लेखांकन व ऊर्जा लेखापरीक्षणाकरिता, फिडर व डीटीसी वर मीटरची स्थापना करणे आवश्यक आहे. त्यामुळे वीजहानीचा तपास करण्यात व त्यात कपात करण्यास मदत मिळते लेखापरीक्षा छाननीत खालील बाबी उघडकीस आल्या:

- वर्षे २००२-०३ व २००३-०४ मध्ये भारत सरकारने मंजूर केलेल्या २० प्रकल्पात ३०५१४ डीटीसी वर मीटर स्थापित करण्याचे लक्ष होते. परंतु एकूण साध्यता ८४ टक्के एवढी होती (जुलै, २००७).
- लातूर जिल्ह्यात, २९२० मीटरच्या तुलनेत डीटीसीवर फक्त ७५० मीटर (२६ टक्के) स्थापित करण्यात आले.
- शहरी व ग्रामीण क्षेत्रात डीटीसी वीजहानी अनुक्रमे १५ व २५ टक्क्यांपेक्षा जास्त नसावी असे कंपनीने निर्धारित केले होते. पण असे दिसून आले कि पाच* प्रकल्पाच्या बाबतीत ४५ टक्के डीटीसीनी निर्धारित केलेल्या वीजहानीपेक्षा जास्त वीजहानी दाखवली होती.
- जानेवारी २००५ ते डिसेंबर २००६ दरम्यान डीटीसीवर मीटर स्थापित केले असून सुद्धा, नागपूर ग्रामीण, नागपूर शहर व सोलापूर मध्ये २७६ डीटीसीचे ऊर्जा लेखापरीक्षण कधीही झाले नव्हते.

व्यवस्थापनाने असे म्हटले (सप्टेंबर, २००७), की कृषी ग्राहकांच्या त्रैमासिक बिलिंग चक्रामुळे २७६ डीटीसीचे लेखापरीक्षण केले नव्हते. हे उत्तर समर्थनीय नाही कारण, की ह्या डीटीसी वर डिसेंबर २००३-०६ दरम्यान मीटर स्थापित केले होते.

- नागपूर ग्रामीणमध्ये ५५ डीटीसी आणि १९१ डीटीसीचे ऊर्जा लेखापरीक्षण अनुक्रमे मार्च २००५ व मार्च २००६ पासून केले नव्हते.

व्यवस्थापनाने असे म्हटले (सप्टेंबर, २००७), की डीटीसी मीटर सदोष असल्यामुळे ऊर्जा लेखापरिक्षण झाले नव्हते. सदोष मीटर न बदलल्यामुळे ऊर्जा लेखापरिक्षण लेखांकन व ऊर्जा लेखापरिक्षणाच्या अभावी, उपाय योजनेची आवश्यकता असलेली क्षेत्रे उघडकीस येऊ शकली नाही.

**११.२** या प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करतांना असे नमूद केले की, २००२-०३ आणि २००३-०४ करिता भारत सरकारने मंजूर केलेल्या २० प्रकल्पांत विपकेंच्या ३०५१४ मीटरच्या लक्ष्यापैकी मार्च २००९ पर्यंत २७४५४ मीटर्स बसविण्यात आली. टक्केवारीत एकूण साध्य लक्ष्य साध्य ९०.१० टक्के झाले.

लातूर जिल्ह्यात २९२० मीटर्सपैकी ७५० मीटर्स बसविली.

कोल्हापूर व सोलापूर मध्ये विपकेंद्रांतील नुकसानाच्या टक्केवारीचे प्रमाण २५ टक्क्यांपेक्षा अधिक व ३४ % व ३१ % च्या आसपास होते. तर नागपूर (ग्रामीण), नागपूर (शहर) मध्ये एकूण विपकेंच्या ते ३४% व २७% होते. त्याचे ऊर्जा लेखांकन डिसें., २००९ मध्ये करण्यात आले.

त्रैमासिक देयक दिले जाते अशा कृषी उपभोक्त्यांच्या बहुतांश विपकेंद्रांचे ऊर्जा लेखांकन दर तीन महिन्यांनी केले जाते, तसेच ऊर्जा लेखांकन विपकेंच्या बृहत आधारसामग्रीची नोंद करण्यास किमान ३ महिन्यांचा कालावधी लागतो. त्यामुळे २७६ विपकेंचे ऊर्जा लेखांकन केले गेले नाही.

डिसें., २००९ अनुसार नागपूर (ग्रामीण) मध्ये २९४६ विपकेंपैकी २५५० विपकेंचे ऊर्जा लेखांकन करण्यात आले आणि नागपूर (शहर) मध्ये ३४५० विपकेंपैकी ३४१० विपकेंचे ऊर्जा लेखांकन करण्यात आले.

**११.३** शासन कंपनीच्या उत्तराशी सहमत आहे.

**११.४** वाणिज्यिक वीज हानीत खात्रीशीर कपात करणाऱ्या उपयांपैकी ऊर्जा लेखांकन हा एक उपाय असून अशा लेखांकनामुळे विद्युत प्रणालीच्या विविध खंडातील वीजहानीचे परिणाम काढण्यास सहाय्यक होते यासाठी फिडर व डिटीसी यावर मीटरची स्थापना करणे आवश्यक आहे. त्यामुळे वीजहानीचा तपास करून त्यामध्ये कपात करण्यास मदत होत असते अशी यंत्रणा न उभारल्यामुळे वीजहानीचे प्रमाण मिळू शकले नाही.असा महालेखाकारांचा आक्षेप होता. याबाबत विद्युत वितरण कंपनी व ऊर्जा विभाग यांनी सादर केलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने विद्युत वितरण कंपनीचे अधिकारी व ऊर्जा विभागाचे अधिकारी यांची दि. १२ सप्टेंबर २०१२ रोजी समितीने साक्ष घेतली. त्यावेळी विद्युत पारेषण कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की, डीटीसीवर मीटर बसविण्यात आले होते. परंतु ग्राहकांची नोंद व्यवस्थित न झाल्याने कार्यपद्धती सफल होऊ शकली नाही. ग्राहकाला डीटीसीवरून, डीटीसीला सबस्टेशनमधून व सबस्टेशनला पारेषण मधून जोडणी दिली गेलेली असते. या सर्वांचे मीटर रिडींग मॅच झाले पाहिजेत. सद्या १३० शहरांमध्ये डीटीसी मॅपींग पद्धत अवलंबिली आहे. यावर आधुनिक पद्धतीनुसार गुगल अर्थवर सर्च करून ऑनलाईन आपले नाव व ठिकाण त्यामध्ये दर्शविल्यानंतर डीटीसीची माहिती मिळते. सध्या ८५ लाख ग्राहकांचे डीटीसी मॅपिंग पूर्ण झाले आहे. सद्या ज्या गावची लोकसंख्या ३० हजारापेक्षा जास्त आहे त्याठिकाणी पहिल्या टप्प्यांमध्ये व तद्नंतर दुसऱ्या टप्प्यांत अशी कारवाई करण्यात येईल.



**११.५ अभिप्राय व शिफारशी**

**वाणिज्यिक वीजहानीत खात्रीशीर कपात करणाऱ्या उपयांपैकी ऊर्जा लेखांकन हा एक उपाय असून अशा लेखांकनामुळे विद्युत प्रणालीच्या विविध खंडातील वीजहानीचे परिणाम काढण्यास सहाय्यक होते यासाठी फिडर व डिटीसी यावर मीटरची स्थापना करणे आवश्यक आहे. त्यामुळे वीजहानीचा तपास करून त्यामध्ये कपात करण्यास मदत होत असते अशी यंत्रणा न उभारल्यामुळे वीजहानीचे प्रमाण मिळू शकले नाही. याबाबत समितीला साक्ष देताना समितीला मिळालेल्या माहितीनुसार याबाबत ग्राहक नोंद झाल्यामुळे माहिती मिळू शकली नाही ही विशद केलेली वस्तुस्थिती विसंगत वाटते. पारेषण विभागाकडून आधुनिक प्रणालीचा वापर करण्यात येवून गुगल अर्थद्वारे मिळणारी माहिती लक्षात घेता एकंदर डीटीसीच्या स्थापनेनंतर त्यामधील वीजहानी कळणे आवश्यक होते. व अशा स्थापनेमध्ये दिरंगाई केली गेली. याचे समितीला आश्चर्य वाटते. होणारी वीजहानी लक्षात घेवून त्याची वसुली नियमित देयक भरणाऱ्या ग्राहकाकडून वसूल केली जाते, परंतु वीज चोरी करणाऱ्या व्यक्तींचा शोध न घेता कर्तव्य दक्ष असणाऱ्या ग्राहकावर विनाकारण आर्थिक बोजा लादला जातो. ही कार्यपद्धती बदलणे आवश्यक असून वीज चोरी करणाऱ्या व्यक्तींना वीज पारेषण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी पकडून कार्यवाही करावी. अशी कार्यवाही न करणाऱ्या अधिकाऱ्याविरूद्ध पारेषण विभागाकडून कडक कारवाई करण्याचे धोरण अवलंबिण्यात यावे . अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे. याप्रकरणी करण्यात येणाऱ्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत कळविण्यात यावी.**

**बारा "विद्युत आकाराची कमी वसुली"**

**१२.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक चार मधील परिच्छेद क्रमांक ४.९ मध्ये **"अतिरिक्त पाणी आकाराचे टाळता येण्या जोगे प्रदान"** यांचे संबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, **वाणिज्यिक ग्राहकाचे औद्योगिक ग्राहक म्हणून चुकीचे वर्गीकरण केल्यामुळे कंपनीने रुपये ९३.३८ लाख विद्युत आकाराची कमी वसूली केली होती.**

महाराष्ट्र विद्युत नियमन आयोगाने वेळोवेळी मंजूर केलेल्या उच्चदाब ग्राहक दर सूचीनुसार दरपत्रक लागू करून कंपनी उच्चदाब ग्राहकांकडून त्यांनी वापर केलेल्या वीजेबाबतचे बील पाठवित होती. उच्चदाब दरसूचीनुसार$ निवासी व वाणिज्य संकुले ज्यामध्ये विद्युत पुरवठा एका बिदुंवर घेण्यात येऊन वेगवेगळ्या एककांत/ दुकानांना वीज संवितरित केली जाते त्यांना एचटीपी-VI हे दरपत्रक लागू असते व औद्योगिक ग्राहकांना एचटीपी- I दरपत्रक लागू असते.

असे निदर्शनास आले की कंपनीच्या वाशी परिमंडळामध्ये फॅशन लाईफ स्टाईल (इन्डीया) *मर्यादित या एका उच्चदाब ग्राहकाला जो "सेंटर वन मॉल" वाशी चालवित होता त्याला "वाणिज्यिक ग्राहक" असे वर्गीकृत करण्याऐवजी "औद्योगिक ग्राहक" असे वर्गीकृत करण्यात आले होते. ग्राहकाला एचटीपी-VI दरपत्रक लागू करण्याऐवजी (मागणी आकार रूपये १००/१२५ प्रति केव्हीए व विद्युत आकार रूपये ३.५० प्रति युनिट) एचटीपी-I दरपत्रक लागू करून मागणी आकार (रूपये ३२५/३५० प्रति केव्हीए व विद्युत आकार रूपये २.१५/२.८५ प्रति युनिट) बील करण्यात आले होते. अशारितीने ग्राहकाला जुलै २००३ ते मार्च, २००७ या कालावधीत चुकीचे बील पाठविण्यात आले होते व परिणामस्वरूप त्या कालावधीसाठी रुपये ९३.३८ लाखाची कमी वसुली ग्राहकाकडून नाही तो पर्यंत चुकीचे बील देणे चालूच राहणार होते.

ही बाब शासनाला/व्यवस्थापनाला कळविण्यात (मे/ऑगस्ट, २००७) आली होती: त्यांचे उत्तर प्रलंबित आहे (नोव्हेंबर २००७).

**१२.२** दि. १ डिसेंबर २००३ पासून ज्या उच्चदाब ग्राहकाने विद्युत पुरवठा एका बिंदुंवर घेण्यात येऊन वेगवेगळ्या घरगुती आणि व्यापारी गाळ्यांना विज वितरीत केली तर अशा ग्राहकांना एच.टी.पी.- VI दर लागु शकतो. फॅशन लाईफ स्टाईल या ग्राहकाला डिसेंबर, २००३ ते एप्रिल, २००७ पर्यंत एच.टी.पी. - VI या दराने आकारणी करणे आवश्यक होते. मात्र या ग्राहकाला एच.टी.पी.-I प्रमाणे आकारणी केली त्यामुळे पुढीलप्रमाणे येणे रक्कम काढलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| १. एच. टी. पी. -VI दरानुसार वरील कालावधीचे करावयाच्या बिलाची रक्कम | | ८,७०,३२,५५१.५४ |
| वजा : एच. टी. पी. I दराप्रमाणे आर. एल. सी. चार्ज मिळवून केलेली बिले | ९,०४,६५,५९८.५६ | |
| वजा : आर. एल. सी. ची रक्कम | - ६९,१६,२८५.०० | |
| | (-) ८,३५,४९,३१३.५६ | |
| निव्वळ वसुली करावयाची रक्कम | ३४,८३,२३७.९८ | |

म्हणून आरएलसीची एकूण रक्कम रुपये ६९,१६,२८५ मधून ३४,८३,२३७ ही रक्कम वजा करूनच उरलेली रक्कम रुपये ३४,३३,०४८ आर. एल. सी. पोटी परत देण्यात येईल.

**१२.३** शासन कंपनीच्या उत्तराशी सहमत आहे.

**१२.४** वाणिज्यिक ग्राहकाचे औद्योगिक ग्राहक चुकीचे वर्गीकरण केल्यामुळे कंपनीने रूपये ९३.३८ लाख विद्युत आकाराची कमी वसुली केली होती. असा महालेखाकारांनी आक्षेप घेतला होता. याबाबत विद्युत वितरण कंपनी व ऊर्जा विभाग यांनी सादर केलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने विद्युत वितरण कंपनीचे अधिकारी व ऊर्जा विभागाचे अधिकारी यांची दि. १२ सप्टेंबर २०१२ रोजी समितीने साक्ष घेतली.



याबाबत अधिक स्पष्टीकरण करण्याविषयी समितीने सांगितले असता विद्युत वितरण कंपनीच्या संचालक कार्यचलन यांनी सांगितले की या प्रकरणी आमची चूक झाली होती. संबंधित ग्राहकाला याबाबत सांगितले असल्यामुळे याबाबतीतील देयक आता भरले जाणार आहे. या मुद्याला अनुसरून अधिक स्पष्टीकरण देताना विद्युत वितरण कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की याबाबत विद्युत वितरण कंपनीकडून चूक झाली असून याप्रकरणी ग्राहकाला दंड भरावा लागणार नाही. परंतु कंपनीच्या अधिकाऱ्यांवर या संबंधामध्ये कारवाई करण्यात येईल. ग्राहकांच्या तक्रारीबाबत अधिक स्पष्टीकरण देताना त्यांनी सांगितले की, ग्राहकांच्या तक्रारीची दखल घेण्यासाठी महावितरणचे नोडल ऑफिसर आहेत. बसविलेले मीटर चुकीचे असेल तर ग्राहकांनी नोडल ऑफिसरकडे तक्रार करावी, ते नोडल ऑफिसर मीटर व्यवस्थित आहे का, याची खात्री करतात. मीटर व्यवस्थित नाही, अशी शंका आली तर, मीटर टेस्टिंगसाठी टेस्ट लॅबमध्ये पाठविले जाते. मीटर व्यवस्थित असताना, चुकीचे देयक पाठविण्यात येत असेल तर संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल.

**१२.५ अभिप्राय व शिफारस**

**वाणिज्यिक ग्राहकाचे औद्योगिक ग्राहक असे चुकीचे वर्गीकरण केल्यामुळे कंपनीने रूपये ९३.३८ लाख विद्युत आकाराची कमी वसुली केली होती, असा महालेखाकारांनी लेखापरिक्षण करताना सन २००७ मध्ये आक्षेप घेतला होता. समितीची बैठक होईपर्यंत म्हणजे सप्टेंबर, २०१२ पर्यंत संबंधित ग्राहकाकडून कमी वसूल केलेल्या रकमेबाबत क्षेत्रीय कार्यालयाने काहीही कार्यवाही केली नाही. याचे समितीला आश्चर्य वाटते. विद्युत पारेषण कंपनीच्या संचालकांनी देयक चुकीचे देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीसाठी क्षेत्रीय कार्यालयाकडून झालेली चूक मान्य केलेली असून संबंधित अधिकाऱ्यांवर यासंदर्भात कारवाई करण्यात येईल असे बैठकीमध्ये नमूद केले होते. त्यानुसार सन २००७ ते सप्टेंबर, २०१२ या कालावधीपर्यंत देयकाचा वसुली वसूल न करण्यासाठी यासंबंधात जबाबदार असणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी. व याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत कळवावी.**

---

## महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

**तेरा "अतिरिक्त पाणी आकाराचे टाळता येण्या जोगे प्रदान"**

**१३.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक चार मधील परिच्छेद क्रमांक ४.१० मध्ये **"अतिरिक्त पाणी आकाराचे टाळता येण्या जोगे प्रदान"** यांचे संबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, **कराराच्या शर्तीनुसार इलेक्ट्रॉनिक मोजमाप सयंत्र बसवून प्रत्यक्ष उचललेल्या पाण्याच्या मात्रेच्या नुसार कंपनीने पाण्याच्या आकाराचे प्रदान केले नव्हते परिणाम स्वरूप रूपये १०.५२ कोटी जादा पाणी आकाराचे टाळता येण्याजोगे प्रदान झाले होते.**

गोदावरी नदीमधून पाणी उचलण्यासाठी एकलहरे नाशिक औष्णिक विद्युत केंद्राने सिंचन विभाग बरोबर करार केला (फेब्रुवारी, २००५) होता. विद्युत निर्मितीसाठी आवश्यकता असलेल्या पाण्याची गरज गोदावरी नदीमधून पाणी घेऊन भागविण्यात येत होती व त्यासाठी सिंचन विभागाला मंजूर केलेल्या पाण्याच्या वाट्याच्या ९० टक्के मात्रेचे प्रदान करण्यात येत होते. प्रत्यक्ष केलेल्या पाण्याच्या वापर कंपनीने उचलण्यासाठी बसविलेल्या पंपाच्या क्षमतेच्या आधारावर काढण्यात येत होते.

मंजूर करण्यात आलेला पाण्याचा वाटा (कोटा) प्रतिवर्षे १,२०० एमसीएफटी (औद्योगिक वापरासाठी १,०८० एमसीएफटी प्रति वर्षे व घरगुती वापरासाठी १२० एमसीएफटी / प्रति वर्षे) एवढा होता. स्वीकारण्यात आलेले दर औद्योगिक वापरासाठी रूपये ७१.५० प्रति १०,००० लिटर्स व घरगुती वापरासाठी रुपये पाच प्रति १०,००० लिटर्स व अधिक २० टक्के स्थानिक कर एवढा होता. मंजूर केलेला मासिक कोटा औद्यागिक कारणासाठी व घरगुती कारणासाठी अनुक्रमे २७,८६,८१,२०० व ४,५६,१८,८०० लिटर्स एवढा होता (त्याचा ९० टक्के २५,०८,१३,०८० व ४,१०,५६,९२० लिटर्स एवढा काढण्यात येत होता).

लेखापरीक्षण छाननीत असे निदर्शनास आले की, कंपनीला प्रत्यक्ष पाण्याच्या वापराची मात्रा ठरविण्यासाठी इलेक्ट्रॉनिक्स मीटर्स बसवायचे होते व तसे न केल्यास पाण्याचा आकार मंजूर कोट्याच्या ९० टक्के मात्रेच्या आधारावर पाण्याचा आकार देय होता. औष्णिक विद्युत केंद्राने इलेक्ट्रॉनिक्स मीटर्स करारानुसार स्थापित केले नव्हते (सप्टेंबर, २००७)

जून, २००५ ते जानेवारी, २००७ या कालावधीत ९० टक्के मंजूर कोटयाच्या आधारावर औद्योगिक वापराच्या पाण्याचा आकाराचे रूपये ४२.३२ कोटीचे प्रदान औष्णिक विद्युत केंद्राने सिंचन विभागाला केले होते तर बसविण्यात आलेल्या पंपाच्या क्षमतेच्या आधारावर काढण्यात आलेल्या प्रत्यक्ष पाणी वापराचा आकार रूपये ३१.८० कोटी एवढी काढण्यात येत होता (३,७०६.२४ कोटी लिटर्स रूपये ७१.५० प्रति १०,००० लिटर्स अधिक २० टक्के स्थानिक कर).

अशारितीने कंपनीने इलेक्ट्रॉनिक मिटर्स न बसविल्यामुळे रुपये १०.५२ कोटी अतिरिक्त पाणी आकाराचे टाळता येण्याजोगे प्रदान केले होते.



त्याशिवाय, करारामध्ये पावसाळ्यात उचलल्या जाणाऱ्या पाण्यासाठी सवलतीच्या दराची तरतूद होती. परंतु असे निदर्शनास आले की कंपनीने कोणत्याही सवलतीच्या दराचा लाभ घेतला नव्हता (जून, २००५ ते जानेवारी, २००७).

ही बाब शासनाला/व्यवस्थापनाला कळविण्यात (ऑगस्ट, २००७) आली होती, त्यांचे उत्तर प्रलंबित आहे (नोव्हेंबर, २००७).

**१३.२** या प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करतांना असे नमूद केले की, ना.औ.वि.के. एकलहरे यानी २००५ ते २०११ या कालावधीसाठी पाटबंधारे खात्याशी गोदावरी नदीतून १२०० एम. सी. एफ. टी (मिलियन क्यू फिट) पाणी प्रतीवर्षासाठी (१०८० मिलियन क्यू फूट औद्योगिक वापरासाठी + १२० एम.सी.एफ.टी. घरगुती वापरासाठी) घेण्यासाठी करार केला होता.

सदर करारातील पोट-नियम ८ (अ) नुसार ना.औ.वि.के.ने. नदीतून किती पाणी काढले गेले हे ठरविण्यासाठी स्वतंत्र मोजमाप संयंत्र बसविणे आवश्यक होते.

ना.औ.वि.के. एकलहरे सध्या गोदावरी नदीच्या नाशिक शहराच्या दिशेने वाहणाऱ्या प्रवाहावर बांधलेल्या बांधातून पाणी घेत आहे. गंगापूर धरणातून जे पाणी सोडले जाते ते गोदावरी नदीला येऊन मिळते. गंगापूर धरणापासून ते एकलहरे बांधापर्यंत येणाऱ्या पाण्याचा प्रवाहादरम्यान नाशिक शहरातील सांडपाणी गोदावरी नदीच्या शहरी भागातून वाहणाऱ्या प्रवाहात येऊन मिळते. त्यामुळे ना.औ.वि.के. ला स्वच्छ पाणी मिळत नाही. बायपास लाईनवर बसविलेले पाण्याचे मिटर अस्वच्छ पाणी मिळाल्यामुळे व्यवस्थित कार्य करीत नाही.

तसेच सदर करारातील पोट नियम ११ अन्वये ठरवल्याप्रमाणे जर कोणत्याही महिन्यांत ना.औ.वि.के ने पोट नियम १ नुसार मान्यता दिलेल्या प्रमाणाच्या ९०%पेक्षा कमी पाणी घेतल्यास ना.औ.वि.के ला शासनाला कराराच्या पोट नियम (१) मध्ये नमुद केलेल्या प्रमाणाच्या ९०% किंवा त्या महिन्यात घेतलेल्या पाण्याच्या सरासरी एवढी ह्या दोघांत जे जास्त असेल तेवढी रक्कम द्यावी लागेल.

यावरून असे समजते की, सततच्या चांगल्या देखभालीमुळे मीटर चांगल्या स्थितीत जरी असते तरी आणि खरा पाण्याचा वापर कितीही असता तरी महानिर्मितीला मंजूर झालेल्या पाण्याच्या प्रमाणाच्या ९०% भागानुसारच प्रदान करावे लागले असते. त्यामुळे महानिर्मितीला जो आर्थिक बोजा सहन करावा लागला त्याचे कारण मीटर न बसवणे किंवा मीटर चांगल्या स्थितीत नसणे हे अजिबात नाही. कारण कराराच्या अटीनुसार माहनिर्मितीला कमीत कमी मंजूर झालेल्या पाण्याच्या प्रमाणाच्या ९०% भागावर प्रदान करावेच लागले असते.

त्यामुळे कंपनीने रुपये १०.५२ कोटी टाळण्याजोगे अतिरिक्त प्रदान पाटबंधारे खात्यास इलेक्ट्रॉनिक मीटर न बसविल्यामुळे केले असे लेखा परिक्षणाचे जे म्हणणे आहे ते बरोबर नाही.

पुढे असे निवेदन करण्यात येते की, ना.औ.वि.के. एकलहरे यांनी हायड्रोव्हिजनचे सॉनिक प्रवाह मीटर रिव्हर वॉटर पंप हाऊसच्या दोन लाईनसाठी बसविले आहे.

तसेच, कराराच्या पोटनियम ११ मध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, पावसाळ्यात जेथे पाटबंधारे खात्याने पाणी सोडलेले नाही तेथून जर वापरदारांनी पाणी घेतले तर पाटबंधारे विभाग त्यासाठी सवलतीचा दर आकारेल. या संदर्भात असे नमूद करावयाचे आहे की, पाणी वापरासाठी सवलतीच्या दराचे प्रकरण पाटबंधारे विभागासमोर या आधी ठेवले गेले होते. परंतु, जलसंपदा विभागाने मराठी पत्र क्र. ५०६९, दि. २४ जून २००८ द्वारे कळविले की, महानिर्मितीची विनंती स्वीकारण्यात आलेली नाही. पत्राची प्रत संदर्भासाठी जोडण्यात आलेली आहे. परंतु, सवलतीच्या दराचे प्रकरण पावसाळ्यात पुन्हा पाटबंधारे खात्यासमोर ठेवण्यात येईल.

त्यामुळे असे नमूद करण्यात येते की, लेखापरिक्षणाचे निरिक्षण ज्यात असे म्हटले आहे की, करारानुसार मिळणाऱ्या सवलतीच्या दराबाबत कंपनी आग्रही नव्हती. ते निरिक्षण बरोबर नाही.

वरील परिस्थितीचा विचार करता महालेखापाल (वाणिज्य) यांना विनंती करण्यात येते की त्यांनी ह्या उत्तराचा स्वीकार करावा आणि ह्या परिच्छेदाचा पुढे पाठपुरावा करू नये.

१३.३ शासन महाजनकोच्या उत्तराशी सहमत आहे.

१३.४ अतिरिक्त पाणी आकाराचे टाळता येण्याजोगे प्रदान याबाबत महालेखाकारांनी आक्षेप घेताना कराराच्या शर्तीनुसार गोदावरी नदीमधून पाणी उचलण्यासाठी एकलहरे नाशिक येथील औष्णिक विद्युत केंद्रासाठी पाण्याची आवश्यकता असल्याने इलेक्ट्रॉनिक मोजमाप यंत्र बसवून प्रत्यक्ष उचललेल्या पाण्याच्या मात्रेनुसार कंपनीने पाण्याच्या आकाराचे प्रदान केले नव्हते. परिणामी १०.५२ कोटी अतिरिक्त खर्च झाला होता. याबाबत महाराष्ट्र राज्य ऊर्जा निर्मिती कंपनी व ऊर्जा विभाग यांनी दिलेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने ऊर्जा निर्मिती कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक तसेच विभागाचे अधिकारी यांची समितीने दि. १२ सप्टेंबर २०१२ रोजी साक्ष घेतली. त्यावेळी महालेखाकारांच्या आक्षेपाबाबत अधिक स्पष्टीकरण करण्याविषयी समितीने सांगितले असता ऊर्जानिर्मिती चे व्यवस्थापकीय संचालक यांनी सागितले की, नाशिक येथील ऊर्जानिर्मिती कंपनीसाठी पाटबंधारे विभागाशी करार करून पाण्याचा पुरवठा केला जात होता. त्यासाठी करण्यात आलेल्या करारामध्ये पाण्यासाठी मीटर बसविणे. तसेच करार झाल्यानंतर दोन वर्षानंतरही मीटर बसविले नसले तर कोट्याच्या आधारावर पाण्याची आकारणी करणे ह्या मुद्दयांचा समावेश होता. परंतु तेथील प्रकल्पासाठी जेवढी पाण्याची मागणी होती तेवढे पाणी लागले नाही. कराराप्रमाणे मीटर बसविले अगर बसविले नाही तरी ९०% पाण्याचे प्रदान केले जात असते. सद्यस्थितीत त्याठिकाणी मीटर बसविले आहे परंतु ज्यावेळी लेखापरिक्षण केले गेले त्यावेळी त्याठिकाणी मीटर नव्हते. त्यामुळे जो पाण्याचा कोटा प्रकल्पासाठी ठरवून दिला होता त्याप्रमाणे बिलाचे प्रदान करण्यात आले. परंतु सुरवातीच्या २ वर्षाच्या कालावधीमध्ये मीटर बसविले नव्हते हे त्यांनी मान्य केले. याबाबत मीटर न



बसविण्यात आलेल्या अधिकाऱ्यांवर काय कारवाई करण्यात आली आहे? असे समितीने विचारले असता याबाबत ज्या अधिकाऱ्यांनी कर्तव्यात कसूर केला आहे त्यांच्यावर अंतर्गत चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्यात येईल असे व्यवस्थापकीय संचालक यांनी नमूद केले. व समितीमध्ये विशद केल्यानुसार अधिक माहिती सादर करताना याबाबत अधिकाऱ्यांवर करण्यात आलेल्या कार्यवाही निमित्ताने एक समिती नेमण्यात येऊन सदर समितीने अहवाल सादर केलेला आहे व ज्यांच्यावर जबाबदारी निश्चित केली आहे ते अधिकारी आता निवृत्त झाले असल्याने याबाबत ठरवून निर्णय घेतला जाईल असे त्यांनी समितीला पत्राद्वारे लेखी कळविले आहे. समितीने मीटर न बसविल्यामुळे ५२ कोटी रूपयांचे नुकसान झाले आहे. हे मोजमाप कसे काढण्यात आले आहे असे विचारले असता याबाबत स्पष्टीकरण देताना ऊर्जानिर्मिती कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की मीटर न बसविल्यामुळे संबंधितांनी जे कॅलक्युलेशन केले आहे त्याबाबत अंदाजे रक्कम काढण्यात आलेली आहे. या प्रश्नाची अधिक माहिती समितीमध्ये विशद केल्यानुसार लेखी सादर करताना कळविले की सन २००६-०७ या लेखापरिक्षण काळामध्ये पाण्याचा किती वापर कैला. त्याचा उल्लेख करताना शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे जलसंपदा विभागाने आकारणी मागणी केली व ऊर्जानिर्मिती कंपनीने भूगतान केल्यानुसार ४५१६०२९६.०० इतकी रक्कम अदा करण्यात आलेली आहे असे कळविले. व याप्रकरणी चौकशी अहवालानुसार नुकसानीस जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे असेही कळविले. करारामध्ये पावसाच्या कालावधीत उचलल्या जाणाऱ्या पाण्यासाठी सवलतीच्या दराची तरतूद होती काय, असे समितीने विचारले असता ऊर्जानिर्मितीचे व्यवस्थापकीय संचालक यांनी तसे शब्द करारात असून जलसंपदा विभाग जे पाणी सोडेल त्याबाबत जलसंपदा विभाग निर्णय घेऊन आकार लावील अशी तरतूद होती. ते आकार किती असावेत यासाठी जलसंपदा विभागाशी पत्रव्यवहार केलेले आहेत परंतु सवलतीचा दर त्यांनी तसा कळविला नाही. असेही त्यांनी स्पष्ट केले. व दिनांक २४ जून २००८ च्या पत्रान्वये महानिर्मितीची विनंती स्वीकारण्यासारखी नाही असे जलसंपदा विभागाने लेखी कळविले. करारातील अटीनुसार सवलतीच्या दराबाबत जलसंपदा विभागाने दुर्लक्ष केल्याप्रकरणी लवादाकडे जाण्याची तरतूद करारामध्ये होती काय? व त्यानुसार ऊर्जानिर्मिती कंपनीने कार्यवाहीसाठी त्यावेळी काय कार्यवाही केली होती? असे समितीने विचारले असता ऊर्जानिर्मिती कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालक यांनी याबाबत तपासून माहिती सादर केली जाईल असे नमूद केले. महाजनकोने सादर केलेल्या लेखी माहितीशी ऊर्जा विभाग यांनी सहमती दर्शविली आहे त्यानुसार ऊर्जा विभागाने हा अहवाल वाचला आहे काय? असे समितीने विचारले असता विभागाचे उपसचिव यानी सांगितले की मीटर का बसविण्यात आले नाही? त्यास जबाबदार कोण होते? यासंबंधी अहवाल घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही केली जाईल असे स्पष्ट केले. सध्या राज्यास किती विजेची आवश्यकता आहे असे समितीने विचारले असता ऊर्जानिर्मिती कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की थर्मल पॉवरची कॅपॅसिटी ६९८० मेगावॅट आहे तर हायड्रो पॉवरची कॅपॅसिटी २५८५ मेगावॅट आहे. विजेची गरज असेल तेव्हाच कोयना प्रकल्पातून वीज जनरेट

करण्यात येते. कारण आपणास पाण्याचा कोटा ठरवून दिलेला आहे. त्यामुळे हायड्रो पॉवर प्रोजेक्टमधून कमी वीज निर्माण होते. आपणास १०५ टीएमसी पाणी मिळते त्यातून ६५.०५ मेगावॅट वीज निर्मिती होते. कोराडी येथे २०० आणि २१० मेगावॅट दोन युनिट्स आहेत. खापरखेडा येथे २१० मेगावॅटचे चार युनिट्स आहेत आणि ५०० मेगावॅटचे एक युनिट आहे. कोराडी येथे ६६० मेगावॅटच्या तीन युनिटसचे काम सुरू आहे. कोराडी येथील युनिटस फार जूनी झालेली आहेत. त्यांचे अत्याधुनिकीकरण करणे आवश्यक आहे. ज्या युनिटस्‌ची लाईफ संपते ती युनिटस् बाद करावी लागतात. कोराडी येथील बंद असलेली युनिटस रिपेअर करण्यासाठी एक ते दीड वर्ष लागतील. असे त्यांनी बैठकीच्या शेवटी स्पष्ट केले.

**१३.५ अभिप्राय व शिफारशी**

**अतिरिक्त पाणी आकाराचे टाळता येण्याजोगे प्रदान याबाबत महालेखाकारांनी आक्षेप घेताना कराराच्या शर्तीनुसार गोदावरी नदीमधून पाणी उचलण्यासाठी एकलहरे नाशिक येथील औष्णिक विद्युत केंद्रासाठी पाण्याची आवश्यकता असल्याने इलेक्ट्रॉनिक मोजमाप यंत्र बसवून प्रत्यक्ष उचललेल्या पाण्याच्या मात्रेनुसार कंपनीने पाण्याच्या आकाराचे प्रदान केले नव्हते. परिणामी १०.५२ कोटी अतिरिक्त खर्च झाला होता. हा महालेखाकारांनी घेतलेला आक्षेप बरोबर होता हे समिती समोर झालेल्या साक्षीवरून स्पष्ट झाले. सन २००६-०७ या आर्थिक वर्षात एकलहरे विद्युत प्रकल्पासाठी जलसंपदा विभागाकडून आवश्यक असलेल्या पाण्याचा साठा घेताना त्यावरील आकारणी भूगतान करण्यासाठी प्रथम दोन वर्षामध्ये पाण्याच्या वापराचे मीटर बंधनकारक होते. त्यावर तत्कालीन कार्यरत असलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले. हे समितीमध्ये झालेल्या साक्षीनंतर ऊर्जानिर्मिती कंपनीकडून नेमण्यात आलेल्या एक सदस्यीय चौकशी समितीने चौकशी करून जबाबदारी निश्चित केलेल्या अधिकाऱ्यांवरील कार्यवाहीसाठी अहवाल सादर केला यावरून दिसून येते. त्या अहवालामध्ये जबाबदार असणारे अधिकारी हे सेवानिवृत्त झाले असल्याचे नमूद केले असले तरी कर्तव्यात कसूर करून ऊर्जा निर्मिती कंपनीच्या आर्थिक नुकसानीस जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करून झालेल्या नुकसानीची जबाबदारी संबंधितांकडून वसूल करण्यात यावी. प्रकल्पासाठी लागणारे पाणी पावसाच्या कालावधीत घेताना करारामध्ये असलेल्या तरतूदीनुसार सवलतीच्या दराबाबत ऊर्जानिर्मिती कंपनीने आग्रह धरला नाही. व जलसंपदा विभागाने देखील त्यावर योग्य ती कार्यवाही केली नाही याचे समितीला सखेद आश्चर्य वाटते. यापुढील काळात असे करार करताना करारातील तरतुदीचे पालन न झाल्यास निर्माण होणाऱ्या समस्येसाठी लवादाची तरतूद करण्यात यावी व याबाबत शासनाच्या उभय विभागाने त्यावर निर्णय घ्यावा. अशी समितीची शिफारस आहे. राज्याची ऊर्जेची समस्या दूर करण्यासाठी ऊर्जानिर्मितीकडून योजनाबद्ध कार्यवाही करण्यात यावी अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे. याप्रकरणी करण्यात येणाऱ्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत कळविण्यात यावी.**

---



## "महाराष्ट्र शेती विकास महामंडळ मर्यादित"

**चौदा "भाड्याची वसुली न करणे व अनधिकृत कब्जा"**

**१४.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.४ मध्ये "भाड्याची वसुली न करणे व अनधिकृत कब्जा" यांचे संबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, **संमती नि परवानगी कालावधी संपल्यानंतरही पट्टेदाराने अतिरिक्त १,०२० चौ. फूट जागा अनधिकृतपणे व्यापली होती व रुपये ३२.४९ लाखाचे भाडे वसूल करावयाचे राहिले होते.**

महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे (कंपनी) यांनी श्री राजमाता महिला प्रतिष्ठान, पुणे यांच्या बरोबर तीन वर्षाच्या कालावधीसाठी डिसेंबर २००४ मध्ये उपहारगृह चालविण्यासाठी कंपनीच्या पुणे येथील मुख्यालयात ५०० चौ. फूट जमीन भाडेपट्ट्याने देण्यासाठी संमति नि परवानगी* करार स्वाक्षरीत (डिसेंबर, २००१) केला होता. करारामध्ये इतर तरतुदींनुसार अशी तरतूद होती की भाडेपट्टेधारकाने कोणत्याही कुल हक्काचा दावा किंवा भाडे अधिनियमानुसार इतर हक्क दावीत करायचे नव्हते व मालकाच्या लिखित पूर्व परवानगी शिवाय जागेमध्ये कोणताही फेरफार किंवा सुधारणा करावयाच्या नव्हत्या. करारामध्ये पुढे अशीही तरतूद होती की भाडेपट्टेधारकाने पुणे महानगरपालिकेकडून (पीएमटी) तात्पुरती छपरी उभारण्यासह इतर सर्व परवानग्या मिळवायच्या होत्या. भाडे रुपये १५,१०१, रुपये १७,५०१ व रुपये १९,५०१ अनुक्रमे कराराच्या प्रथम, द्वितीय व तिसऱ्या वर्षी देय होते.

लेखापरीक्षकाच्या निदर्शनास (डिसेंबर, २००७) आले की भाडेपट्टाधारकाने कराराच्या तरतुदींचे पालन केले की नाही याबाबतची कंपनीने खात्री करून घेतली नव्हती. परिणामस्वरूप पीएमसी, स्थानिक शहर नियोजन प्राधिकरणाने भाडेपट्टेधारकाने केलेले अनधिकृत बांधकाम काढून टाकण्याची कारवाई केली त्यावेळेस भाडेपट्टेधारकाने कंपनीची १,०२० चौ. फूट अतिरिक्त जागा वापरल्याचे कंपनीच्या निदर्शनास आले होते (डिसेंबर, २००४). कंपनीने भाडेपट्टा कालावधी डिसेंबर, २००४ मध्ये संपल्यानंतर एकतर भाडेपट्टा कालावधी वाढविण्याची किंवा भाडेपट्टाधारकाला त्या जागेतून काढून टाकण्याची कारवाई केली नव्हती व भाडेपट्टाधारकाने जमिनीचा वापर चालूच ठेवला होता. भाडेपट्टाधारक भाड्याचे प्रदान करीत नव्हता व शेवटच्या वर्षी देय असलेल्या भाड्याच्या आधारावर मे, २००८ पर्यंतचे थकीत येणे रुपये ५.३० लाख एवढे होते. भाडेपट्टेधारकाने अनधिकृतपणे बळकावलेल्या जमिनीचे कंपनीने स्वतः काढलेल्या आकडेमोडीनुसार वसूल करावयाचे भाडे रुपये २७.१९ लाख एवढे डिसेंबर, २००७ पर्यंत काढण्यात आले होते. अशारितीने कराराच्या संनियंत्रण पद्धतीच्या अभावामुळे भाड्याची वसुली झाली नव्हती व वाढीव जागा अनधिकृतरित्या बळकवण्यात आली होती.

**१४.२** या प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले की राजमाता महिला प्रतिष्ठान, पुणे यांना ५०० चौ. फू. मोकळी जागा टेंडर

काढून वापरमूल्य तत्त्वावर उपहारगृह चालविण्यासाठी दिनांक १ जानेवारी २००२ ते ३१ डिसेंबर, २००४ या कालावधीचा करार करून पहिल्या वर्षी रु.१५,१०१ प्रतिमाह दुसऱ्या वर्षी रु.१७,५०१ प्रतिमाह व तिसऱ्या वर्षी रु. १९,५०१ प्रतिमाह या दराने दिली होती. कराराचा कालावधी संपल्यानंतर वापरमूल्याच्या रक्कमेत दर ११ महिन्यांनी १० टक्के वाढ करून करार नविनीकरण करण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतला आहे.

राजमाता महिला प्रतिष्ठान यांना दिलेल्या अधिकृत ५०० चौ.फू. जागेव्यतिरिक्त १०६२.२४ चौ.फू. जागा अनधिकृतरित्या बळकावल्याचे डिसेंबर २००४ मध्ये महामंडळाचे निदर्शनास आले. त्यामुळे पुणे महानगरपालिकेने सदर अनाधिकृत बांधकामाविरुद्ध कारवाई केली.

राजमाता महिला प्रतिष्ठान यांनी ३० नोव्हेंबर २००९ पासून महामंडळाची जागा रिक्त केली आहे (अधिकृतपणे ताबा न देता) सबब दिनांक ३० नोव्हेंबर २००९ पर्यन्त राजमाता महिला प्रतिष्ठान यांनी त्यांचेकडून येणे रक्कम महामंडळाकडे भरणा करणे आवश्यक होते. येणे रक्कमेचा तपशील खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | दिनांक १ जानेवारी २००२ ते ३० जानेवारी २००९ या कालावधीचे ५०० चौ.फू. जागा व अनधिकृत १०६२.२४ चौ.फू. जागेचे एकूण वापरमूल्य | . . | ४५,७५,०१८ |
| २. | बीज वापरमूल्य दंडनीय आकारणीसह | . . | १,६५,००१ |
| ३. | पाणी वापरमूल्य १ नोव्हेंबर २००८ ते ३० मे २००९ | . . | २५,२८४ |
| | वजा- | . . | ४७,६५,३०३ |
| १. | पुढील बाजूची ६५५.३७ चौ.फू. जागेच्या वापरमूल्य सूट दिल्यामुळे आकारलेली रक्कम कमी करण्यात आली. | . . | ३,०७,३९६ |
| २. | महामंडळास प्रतिष्ठानतर्फे मिळालेली रक्कम | . . | १२,११,७५१ |
| ३. | महामंडळाने प्रतिष्ठानचे कच्चे बांधकाम पाडले होते त्यांचे मूल्य | . . | ६५,३०५ |
| | एकूण थकीत रक्कम : | . . | ३१,८०,८५१ |

महामंडळाने वेळोवेळी तोडी व लेखी कळवूनही प्रतिष्ठानने अनधिकृत जागेचे वापरमूल्याची रक्कम महामंडळास अदा केली नाही. दि. ११ जुलै ०९ रोजी महामंडळाने राजमाता महिला प्रतिष्ठान यांना कायदेशीर नोटीस पाठविली होती. त्यास दि.३० नोव्हेंबर ०९ रोजी उत्तर पाठवून राजमाता महिला प्रतिष्ठानने थकित रक्कम देण्याचे नाकारले आहे. त्यामुळे महामंडळाने राजमाता प्रतिष्ठान यांचेविरुद्ध पुणे येथील मे.सिव्हील जज्ज, सिनियर डिव्हीजन यांचे न्यायालयात दि. ११ मार्च २०१० रोजी दिवाणी दावा दाखल केला असून थकित रक्कम १५ टक्के व्याजासह मिळण्याबाबत दाव्यात मागणी केलेली आहे. सध्या सदर दावा न्यायालयात प्रलंबित आहे (५५३/२०१०).



**१४.३** महामंडळाने केलेल्या कार्यवाहीवर शासनाने सहमती दर्शविली आहे.

**१४.४** महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित पुणे यांनी त्यांच्याकडील जागा श्री.राजमाता महिला प्रतिष्ठान पुणे, यांना उपहारगृह चालविण्यासाठी भाडेपट्टयांने दिली होती. याबाबत महसूल विभागाने व महाराष्ट्र राज्य शेती विकास महामंडळाने सादर केलेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने महसूल विभागाचे अप्पर मुख्य सचिव तसेच महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक यांची गुरुवार, दिनांक ११ ऑक्टोबर २०१२ रोजी साक्ष घेतली. महालेखाकारांनी उपस्थित केलेल्या आक्षेपाच्या अनुषंगाने अधिक माहिती स्पष्ट करण्याविषयी समितीने सांगितले असता, विभागाचे अप्पर मुख्य सचिव यांनी सांगितले की, शेती महामंडळाची स्थापना १९६३ मध्ये झाली. १९६१ मध्ये सिलींग कायदा करण्यात आला. त्यावेळी १४ खाजगी साखरकारखान्याकडे ज्या जमिनी होत्या त्या सिलिंग कायद्यानुसार अतिरिक्त ठरविण्यात आल्या. अतिरिक्त ८५,६३७ एकर इतकी जमिनीपैकी ३५,९१० एकर जमिन औद्योगिक उपक्रमाच्या मालकीची म्हणजेच साखर कारखान्यांची होती आणि ४९,७२७ एकर जमिन ही खंडकऱ्याची म्हणजेच शेतकऱ्यांची होती. त्यावेळच्या चुकीच्या अम्मलबजावणीमुळे काही शेतकरी भूमिहीन झाल्यामुळे सदर चूक सुधारण्यासाठी कायद्यामध्ये दोन वेळा बदल केला गेला व नवीन कायदयानुसार काही शेतकऱ्यांना जमिनी परत करण्यात आल्या. महामंडळाच्या स्थापनेच्यावेळी महामंडळाकडे ८५,६३७ एकर जमिन होती. आज महामंडळाकडे ७०,७२४ एकर जमिन आहे. सन २००३ मध्ये सिलिंग कायदयामध्ये पुन्हा सुधारणा करण्यात आली. त्यांस न्यायालयीन प्रकरणामुळे नवीन केलेल्या सुधारणांना स्थगिती दिल्यामुळे नवीन कायद्याची अंमलबजावणी होऊ शकली नाही. आता सन २०११ मध्ये याबाबतचा निर्णय शासनाच्या बाजूने लागला असून, आता सन २००३ मधील सिलिंग कायद्यामधील सुधारणानुसार आता जमिनी परत करण्याचा कार्यक्रम आखण्यात येत आहे. समितीने महालेखाकारांनी पुणे येथील शेती महामंडळाच्या जागेमध्ये राजमाता प्रतिष्ठानला उपहारगृह चालविण्यासाठी भाडेपट्टयाने दिलेल्या जागेविषयी महालेखाकारांनी घेतलेल्या आक्षेपासंबंधाने माहिती स्पष्ट करण्याविषयी सांगितले असता विभागाचे अप्पर मुख्य सचिव यांनी सांगितले की, शेती महामंडळाच्या कार्यालयांमध्ये असलेल्या मोकळया जागेवर उपहारगृह चालविण्याकरिता १५ ऑक्टोबर, २००१ मध्ये दैनिक सकाळ मध्ये जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यावेळी १५ निविदा प्राप्त झाल्या, त्यातील राजमाता महिला प्रतिष्ठान या संस्थेकडून सर्वात जास्त बोली प्राप्त झाल्यामुळे त्यांना तीन वर्षाच्या कराराने ५०० चौ.फूटाची जागा भाडे तत्वावर देण्यात आली. पहिल्यावर्षीसाठी प्रतिमहा रुपये १५,१०१ दुसऱ्या वर्षासाठी १७,५०१, अणि तिसऱ्या वर्षासाठी १९,५०१, प्रतिमहा भाडे असा करार करण्यात आला होता. ५०० चौरस फूटावरती त्यांना तात्पुरते बांधकाम करण्यास परवानगी देण्यात आली होती. १ जानेवारी २००२ ते ३१ डिसेंबर २००४ या तीन वर्षाच्या कालावधीसाठी सदर ५०० चौरस फूट जागा वापरण्यास दिली होती. परंतु या जागेव्यतिरिक्त त्यांनी १०६२.२४ चौरस फूट इतक्या जागेचा अनधिकृतपणे वापर केल्याचे निर्दशनास आले. याबाबत पुणे महानगरपलिकेने देखील त्यांना त्यासंबंधाने नोटीस पाठविली होती. दुसरा मुद्दा कराराची मुदत

३१ डिसेंबर, २००४ पर्यंत असताना त्यांनी ३० नोव्हेंबर, २००९ पर्यंत जागेचा वापर चालू ठेवला. या करारबाह्य कालावधीसाठी १० टक्के भाडेवाढ करून ११ महिन्याच्या मुदतीने त्यांना जागा वापरण्यास दिली. या अतिरिक्त कालावधीसाठी व अनधिकृत जागेच्या वापराबद्दल त्यांना ४५,७५,०१८ वापर मुल्य, दंडनिय आकारणीसह वीज वापर मुल्य रुपये १,६५,००१ व पाणी वापर मुल्य रुपये २५,२८४ असे एकूण ४७,६५,३०३ इतकी रक्कम महामंडळास मिळावयास पाहिजे. राजमाता महिला प्रतिष्ठानने वेळोवेळी भरलेली रक्कम वजा केल्यानंतर शेती महामंडळास अजून रुपये ३१,८०,८५१ इतकी रक्कम अद्याप मिळालेली नाही. ही थकीत रक्कम भरण्याचे त्यांनी नाकारल्यामुळे शेती महामंडळाने पुणे येथील सिव्हील न्यायालयात ११ मार्च २०१० रोजी १५ टक्के व्याजाने थकित रक्कम मिळावी म्हणून दावा दाखल केलेला आहे. प्रकरण सध्या न्यायालयात प्रलंबित आहे. याबाबत अधिक स्पष्टीकरण देताना विभागाच्या अपर मुख्य सचिवांनी सांगितले की, शेती महामंडळाच्या प्रांगणामधील जागा पासपोर्ट कार्यालयासाठी भाड्याने देण्यात आलेली आहे. पासपोर्ट कार्यालयाकडे जाण्यासाठी रस्ता आवश्यक असल्याने राजमाता महिला प्रतिष्ठान यांनी केलेले बांधकाम पाडण्यात आल्यामुळे त्यांना नुकसानीपोटी रूपये ६५,३०५ इतकी रक्कम द्यावी लागली. ही रक्कम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सल्ल्यानुसार ठरविण्यात आली होती. प्रतिष्ठानला वापर मुल्यामध्ये सूट देण्यात आल्यानंतर प्रतिष्ठानकडून येणेरक्कम एकंदरित ३१,८०,८५१ रूपये इतकी थकबाकी येते. प्रतिष्ठानचा असलेला करारनामा संपुष्टात येताना त्यांना त्यांच्याकडील थकबाकी रक्कमेसह ही बाब तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक यांनी पत्राद्वारे कळविली होती. असेही त्यांनी स्पष्ट केले होते. यावर समितीने विचारले की, करारनाम्याव्यतिरिक्त असलेल्या जागेवर अनधिकृतपणे वापर केल्याबाबत त्याचवेळी त्यांना त्यांची जाणीव महामंडळ स्तरावर अधिकाऱ्यांनी का केली नाही. व यामध्ये निष्काळजीपणा झाल्याचे दिसून येते. असे विचारले असता विभागाच्या अपर मुख्य सचिवांनी सांगितले की, त्या ठिकाणी केवळ तात्पुरत्या स्वरूपाचे बांधकाम करण्यात आले होते असे स्पष्ट केले. याबाबत महानगरपालिकेने अनधिकृत बांधकामाबाबत दिलेल्या नोटिसीनंतर अनधिकृत वापर मूल्यासाठी मोजणी करून त्यानुसार थकबाकीच्या रकमेमध्ये वाढ करण्यात आली. परंतु अनधिकृतपणे वापरण्यात येणाऱ्या जागेबाबत प्रतिष्ठानला तसे पत्र देवून त्याची जाणीव करण्यात आली नव्हती हे त्यांनी मान्य केले. समितीने अनधिकृत वापराच्या मूल्याबाबत व करार संपल्यानंतरच्या जागेच्या वापराच्या मूल्याबाबत संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयाची जाणीव संबंधितांना केली होती काय? असे समितीने विचारले असता याबाबत तत्कालीन मुख्य अधिकाऱ्यांनी संचालक राजमाता महिला प्रतिष्ठान यांना सूचित केली होती व त्यांनी ती तत्वतः मान्य केली होती. असा संचालकांच्या समवेत झालेल्या बैठकीमध्ये उल्लेख नमुद आहे. जागेचा वापर करत असल्याबाबत प्रस्ताव दिलेला नसल्याने त्याबाबत लेखी प्रस्ताव द्यावा अशा सूचना असताना देखील प्रतिष्ठानने प्रस्ताब सादर केलेला नाही असे देखील पत्रावरून दिसून येते. राजमाता प्रतिष्ठानला जागा रिक्त करण्यासाठी नोटिस दिली होती का? दिली असेल तर ती त्यांच्याकडून रिक्त का करून घेतली नाही? व याची जबाबदारी कोणावर निश्चित केली जाणार आहे ? या बाबी



उपस्थित होत असल्याचे समितीने निदर्शनास आणून याबाबत न्यायप्रविष्ट प्रकरणासंदर्भात कोर्टाची भूमिका व महामंडळाची भूमिका, याबाबत राजमाता प्रतिष्ठानला विशद करून सामोपचाराने हा विषय संपवावा असे समितीचे मत आहे. असे मा.समिती प्रमुखांनी बैठकीच्याशेवटी स्पष्ट केली. तसेच समितीच्या आलेल्या निदर्शनावरून अनधिकृत बांधकामाबाबत पुणे महानगरपालिकेने दखल घेतली असतानाही तोपर्यंत महामंडळातील अधिकाऱ्यांनी याबाबत कुठेही लेखी स्पष्ट केल्याचे कागदोपत्री दिसून येत नसल्याने यासंदर्भात विभागीय स्तरावर चौकशी करून योग्य ती कारवाई करण्यात यावी. असेही मा.समिती प्रमुखांनी स्पष्ट केले.

**१४.५ अभिप्राय व शिफारस**

**राज्य शेती महामंडळ मयादित पुणे यांनी श्री राजमाता महिला प्रतिष्ठान पुणे यांच्याबरोबर उपहार गृह चालविण्याबाबत डिसेंबर, २००१ ते डिसेंबर २००४ या तीन वर्षाच्या कालावधीसाठी पुणे येथील मुख्यालयात ५०० चौरस फुटाची जमीन भाडेपट्ट्याने देण्यासाठी समितीने परवाना करार डिसेंबर, २००१ मध्ये केला होता. सदर करारामध्ये भाडेपट्टेधारकांना पुणे महानगरपालिकेकडून तात्काळ छपरी उभारण्यासह इतर परवानग्या मिळवावयाच्या होत्या पहिल्या वर्षाचे भाडे रूपये १५,१०१, दुसऱ्या वर्षाचे भाडे रूपये १७,५०१, तिसऱ्या वर्षाचे भाडे रूपये १९,५०१ भाडेपट्टेधारकांकडून कंपनीस देय होते.**

**या संदर्भात लेखापरिक्षकांच्या डिसेंबर, २००७ मध्ये असे निदर्शनास आले की, भाडेपट्टेधारकांनी करारातील तरतूदींचे पालन केले की नाही याबाबत कंपनीने खात्री करून घेतली नव्हती त्यामुळे पुणे महानगरपालिकेने भाडेपट्टेधारकांनी सुमारे १०६२.२४ चौरस फुटाचे अनधिकृत केलेले बांधकाम काढून टाकण्याची कारवाई केली. सदरचे अनधिकृत बांधकाम भाडेपट्टेधारकांनी केले असल्याचे शेती महामंडळाच्या निदर्शनास येऊनही करार संपल्यानंतरही सदर भाडेपट्टेधारकांना त्या जागेवरून काढून टाकण्याची कारवाई केली नव्हती व भाडेपट्टेधारकांनी माहे मे, २००८ पर्यंत कंपनीने केलेल्या करारातील अटींचे उल्लंघन करून अनधिकृतपणे जागेचा वापर चालू ठेवला होता. या सर्व भाड्यापोटी शेती महामंडळास भाडेपट्टेधारकांकडून अतिरिक्त कालावधीसाठी करारपात्र जागा व अनधिकृत जागेच्या वापराबद्दल रुपये ४५,७५,०१८ (रूपये पंचेचाळीस लाख पंचाहत्तर हजार अठरा) वापर मूल्य, दंडनीय आकरणीसह वीज वापर मूल्य रुपये १,६५,००१ व पाणी वापर मूल्य २५,२८४ असे एकूण रुपये ४७,६५,३०३ इतकी रक्कम शेती महामंडळास मिळणे आवश्यक होती. राजमाता महिला प्रतिष्ठानने वेळोवेळी भरलेली रक्कम वजा केल्यानंतर शेती महामंडळास रुपये ३१,८०,८५१ इतकी रक्कम राजमाता महिला प्रतिष्ठानकडून येणे बाकी आहे. ही थकीत रक्कम भरण्याचे प्रतिष्ठानने नाकारल्यामुळे शेती महामंडळाने पुणे येथील दिवाणी न्यायालयात दिवाणी दावा दाखल केला असून उक्त दावा न्यायालयात प्रलंबित असल्याचे विभागाचे अप्पर मुख्य सचिव यांनी समितीस सांगितले. राजमाता महिला प्रतिष्ठानला कराराद्वारे ५०० चौरस फुट इतकी जागा दिली असताना उक्त प्रतिष्ठानने या जागेच्या व्यतिरिक्त १०६.२४ चौरस फुट**

इतक्या जागेचा हेतूपुरस्सरपणे व जाणीव पूर्वक अनधिकृत वापर सन २००९ पर्यंत केला असल्याचे महानगरपालिकेच्या निदर्शनास आले आहे व प्रतिष्ठानने अशा प्रकारची अनधिकृत जागा वापरल्यामुळे महा नगरपालिकेने त्यांना या संदर्भात नोटीस दिली आहे. प्रतिष्ठानने इतकी वर्षे अनधिकृत जागेचा वापर तसेच वीज व पाण्याचा वापर करूनही शेती महामंडळाच्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी या प्रतिष्ठानने वापरलेल्या जागेकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले असून सदर बाब गंभीर आहे असे समितीचे मत आहे.

उपरोक्त सर्व बाबींचा सर्वकष विचार करून तसेच समितीने घेतलेल्या निर्णयानुसार प्रतिष्ठान समवेत सामोपचाराने बैठक घेऊन प्रकरण त्वरेने निकाली काढावे अशी समितीची शिफारस आहे.

---



## "महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ"

### पंधरा "सवलतीच्या दराने भूखंड विक्रीमुळे महसुलाचे नुकसान"

**१५.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.१९ मध्ये "सवलतीच्या दराने भूखंड विक्रीमुळे महसुलाचे नुकसान" यांचे संबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, **महामंडळाने वस्त्रोद्योग उपक्रमासाठी शासकीय मान्यता न घेता सवलतीच्या दराने भूखंडाचे नियतवाटप केल्यामुळे रुपये ३.२० कोटीचे नुकसान झाले होते.**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (महामंडळ) नरढाना औद्योगिक क्षेत्र धुळे जिल्हा येथे रुपये ३० प्रति चौ.मीटर यादराने दोन लाख चौरस मीटरचा भूखंड वेरटेक्स स्पिनिंग मर्यादित (व्हीएसएल) यांना नियत वाटप केला होता (मार्च २००६). त्यानंतर व्हीएसएल ने महामंडळाला वस्त्रोद्योग उपवनच्या अंगीकृत विकासासाठी १६ लाख चौ.मीटर क्षेत्राचा भूखंड (आधीच नियत वाटप केलेले दोन लाख चौ.मीटरचे क्षेत्रधरुन) रुपये १० प्रति चौ.मीटर या सवलतीच्या दराने नियतवाटप करण्याची विनंती केली होती. व्हीएसएल ने म्हटले होते की विकसित केलेल्या वस्त्रोद्योग उपवनांत वस्त्रोद्योगातील विविध प्रक्रिया एककांना जागा देण्यात येईल व त्यामुळे त्या क्षेत्राच्या विकासामध्ये मदत होईल. व्हीएसएलच्या विनंतीचा विचार करून महामंडळाने मार्च २००६ मध्ये रुपये ३० प्रति चौ.मीटर दराने दोन लाख चौ.मीटर क्षेत्राचा या आधी नियतवाटप केलेली भूखंड धरुन १६ लाख चौ.मीटर चा भूखंड रुपये १० प्रति चौ. मीटर या सवलतीच्या दराने व्हीएसएलला नियतवाटप केला होता (नोव्हेंबर २००६). या नियत वाटप केलेल्या जमिनीचा अग्रीम ताबा डिसेंबर २००६/जानेवारी २००७ मध्ये देण्यात आला होता. या नियतवाटप केलेल्या भूखंडासाठी महामंडळाला रुपये १.६० कोटीचे अधिमूल्य मिळाले (मार्च २००६ ते सप्टेंबर २००७) होते. लेखापरीक्षण छाननीत (ऑक्टोबर २००७) असे निदर्शनास आले की शासनाने जारी केलेल्या (जुलै १९८७) अनुदेशांनुसार, भूखंड सवलतीच्या दराने नियत वाटप करण्यापूर्वी महामंडळाला शासनाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक होते. परंतु महामंडळाने शासनाची मान्यता न घेता त्या-वेळच्या औद्योगिक क्षेत्रासाठीचा प्रचलीत दर रुपये ३० प्रति चौ.मीटर असतांना रुपये १० प्रति चौ.मीटर या सवलतीच्या दराने भूखंडाचे नियतवाटप केले होते. अशारितीने महामंडळाने भाडेपट्टेधारकाला अनियमितपणे सवलत दिली होती व परिणामस्वरूप रुपये ३.२० कोटी महसूलाचे नुकसान झाले होते.

व्यवस्थापनाने म्हटले होते (जुलै २००८) की भूखंड सवलतीच्या दराने देण्यासाठी मान्यता देण्यासाठी ही बाब शासनाकडे (डिसेंबर २००६) नेली होती व सवलतीच्या दराचा प्रस्ताव राज्य शासनाच्या विचाराधीन होता. शासनाने म्हटले होते की (ऑक्टोबर २००८) महामंडळाने हे काल्पनीक नुकसान नियतवाटप करण्यासाठी शिल्लक असलेल्या भूखंडावर भारित करावे या अटीच्या अधीन विभागाने या प्रकरणाला कार्योत्तर मंजुरी दिली होती.

हे उत्तर स्वीकारण्या योग्य नव्हते कारण शासनाने निर्ममित केलेल्या अनुदेशांनुसार (जुलै १९८७) औद्योगिक क्षेत्रामध्ये जमिनिचे सवलतीच्या दराने निर्गतवाटप फक्त शासनाच्या पूर्व परवानगीनेच करण्यात यावे असे स्पष्ट विनिर्दिष्टि केले होते.

**१५.२** या प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करतांना असे नमूद केले की, नरढाणा औद्योगिक क्षेत्राकरिता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने सन १९९४ मध्ये संपादित केलेल्या एकूण ६५५.५६ हे.आर. क्षेत्रापैकी ७६.१८ हे. क्षेत्र मे.व्हर्टेक्स स्पिनिंग लि. यांना वस्त्रोद्योग पार्कसाठी वाटप करण्यात आले होते. नरढाणा औद्योगिक क्षेत्र हे देशातील वस्त्रोद्योगामध्ये आघाडीमध्ये असलेल्या सुरत औद्योगिक क्षेत्रापासून केवळ २२० कि.मी. अंतरावर आहे. यामुळे या परिसरातील जमिनीस वस्त्रोद्योजकांकडून मागणी आहे.

मे.व्हर्टेक्स स्पिनिंग लि. यांना वस्त्रोद्योग पार्कसाठी ४०० एकर क्षेत्र १० रु. प्रती मीटर या दराने देण्याबाबत व त्यास शासनाची कार्योत्तर मंजुरी घेण्याच्या अटीवर महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दि.२७ जुलै २००६ मध्ये झालेल्या ३०६ व्या बैठकीतील ठराव क्र. ४२०२ नुसार भूखंड वाटपाचा निर्णय घेण्यात आला.

तसेच मे. व्हर्टेक्स स्पिनिंग लि.यांच्याकडून जमिनीचे वाटप करताना शासन निश्चित करील ती रक्कम भरण्यास तयार असल्याचे रु. १०० च्या स्टॅम्प पेपरबर हमीपत्र ही घेण्यात आले होते. सदर प्रस्ताव महामंडळाने शासनाच्या कार्योत्तर मंजुरीकरिता पाठविला असता दि. ६ सप्टेंबर २००८ च्या पत्रान्वये त्यास कार्योत्तर मंजुरी देण्यात आली होती. शासनाने सदर मान्यता प्रकरणी महामंडळास झालेला तोटा उर्वरित शिल्लक भूखंडावर तसेच अन्य बार्बीवर लागू करून भरपाई महामंडळाने करावी या अटीवर देण्यात आली हाती. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

**१५.३** महामंडळाच्या संचालक मंडळावर मा.मंत्री (उद्योग) आणि मा.राज्यमंत्री (उद्योग) हे अनुक्रमे पदसिद्ध अध्यक्ष व उपाध्यक्ष आहेत. संचालक मंडळाने सदर निर्णय हा भविष्यामध्ये या परिसरामध्ये वस्त्रोद्योग उभारण्याबाबत असलेली क्षमता विचारात घेऊन घेण्यात आला होता. याशिवाय मे. व्हर्टेक्स स्पिनिंग लि. यांच्याकडून कार्योत्तर मंजुरीबाबत हमीपत्र घेण्यात आले होते. या प्रस्तावास शासनाने कार्योत्तर मंजुरी उक्त अटीच्या अधीन राहून दिली असल्यामुळे शासनास/महामंडळास नुकसान झालेले नाही.

**१५.४** महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने नरढाणा औद्योगिक क्षेत्र धुळे जिल्हा या ठिकाणी उद्योगासाठी क्षेत्र विकसित करताना त्यातील एक भुखंड वस्त्रोद्योग उपक्रमासाठी विकसित करण्यासाठी व्हर्टेक्स स्पिनिंग मर्यादित यांना सवलतीच्या दराने भुखंड दिल्यामुळे ३.२० कोटीचे नुकसान झाले असा महालेखाकारानी लेखा परिक्षणामध्ये आक्षेप नोंदविला होता याबाबत राज्य शासनाचा उद्योग विभाग व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी सादर केलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने प्रथम विभागाचे



अधिकारी व महामंडळाचे मुख्य विशेष कार्यकारी अधिकारी यांची पुणे येथे बुधवार, दिनांक २६ सप्टेंबर २०१२ रोजी साक्ष घेतली याबाबत अधिक स्पष्टीकरण करण्याविषयी समितीने सांगितले असता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे कार्यकार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की , व्हर्टेक्स स्पिनिंग लिमिटेड, या कंपनीस धुळे जिल्ह्यातील नरढाणा औद्योगिक क्षेत्रात ५० एकर म्हणजे २ लाख स्क्वेअर मीटर जागाचे वाटप दिनांक २२ मार्च २००६ रोजी करण्यात आले होते. त्यावेळी तेथील प्रचलित दर ३० रुपये स्क्वेअर मीटर इतका होता. सदर कंपनीला त्या ठिकाणी केंद्र शासनाच्या वस्त्रोउद्योग उपक्रमाची योजना राबवायची होती. हा भाग अविकसित असल्यामुळे व तेथील संपूर्ण औद्योगिक क्षेत्रामध्ये भूखंडाची विक्री झालेली नसल्यामुळे सवलतीच्या दराने जागा उपलब्ध करून द्यावी असे निवेदन महामंडळ स्तरावर कंपनीने दिले. महामंडळाने ३ नोव्हेंबर २००६ रोजीच्या बैठकीत निर्णय घेऊन सवलतीच्या म्हणजे १० रुपये प्रति स्क्वेअर मी. दराने ४०० एकर जागा सदर कंपनीला उपलब्ध करून देण्यात यावी असा निर्णय घेतला. त्यानुसार सदर प्रस्ताव महामंडळाने शासनाच्या कार्योत्तर मंजुरीसाठी पाठविला होता. शासनाने ६ सप्टेंबर २००८ रोजीच्या पत्रान्वये सदर प्रस्तावाला कार्योत्तर मंजुरी दिली होती व सवलतीच्या दराने भूखंड दिल्यानंतर महामंडळाचे जे नुकसान होईल ते उर्वरित भूखंडाची विक्री करताना भरून काढावे अशी अट घातलेली होती. त्यानुसार महालेखाकारांनी आक्षेप घेतलेल्या ३ कोटी २० लाख रुपयांचे नुकसान इतर भूखंडाचा दर वाटप करताना त्यावेळी प्रतिदर ५० रुपये प्रति स्क्वेअर मी. असताना त्यामध्ये १५ रुपयांनी वाढ करून ६५ रुपये प्रति स्क्वेअर मी. करून झालेल्या नुकसानीपोटी अतिरिक्त महसूल प्राप्त झालेला आहे. त्यामध्ये शासनाने दिलेल्या निदेशाचे पालन देखिल केलेले आहे असे त्यांनी स्पष्ट केले आहे. याबाबत समितीने विचारले की, महामंडळाकडून प्रथम २२ मार्च २००६ रोजी वितरण केलेली ५० एकर जागेचा दर देखील १० रुपये प्रति स्क्वेअर मी. अशा सवलतीच्या दरानेच देण्यात आला होता काय? यावर उत्तर देताना महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की लाभधारक कंपनीकडून अतिरिक्त जागेची मागणी करताना सवलतीच्या दराने भूखंड द्यावा असे त्यांनी निवेदन सादर केले होते. त्यानुसार प्रथम वितरित केलेल्या भूखंडाव्यतिरिक्त अधिकची ३५० एकर जागा एकूण ४०० एकर वितरित करण्यात आली व सर्व भूखंडासाठी सवलतीचा दर लावण्यात आलेला होता. असे स्पष्ट केले. तसेच लाभधारक कंपनीने त्यांना वितरित केलेल्या जागेत केंद्र शासनाच्या अनुदानाने वस्त्रोद्योगाशी संबंधित छोटे छोटे उद्योग उभारावयाचे होते. परंतु त्यांनी त्यांना दिलेल्या जागेचा पूर्णपणे उपयोग न करता त्याठिकाणी फक्त १ शेड उभारली असल्याचे त्यांनी समितीच्या एका प्रश्नाच्या उत्तरादाखल स्पष्ट केले. लेखापरीक्षणापूर्वी महामंडळाने सवलतीच्या दराने भूखंड वितरित करण्याच्या निर्णय घेतला ही वस्तुस्थिती आहे काय ? असे समितीने विचारले असता महामंडळाच्या मुख्य लेखाधिकारी यांनी सांगितले की ही वस्तुस्थिती असून फक्त महामंडळाच्या ठरावाला शासनाने ६ सप्टेंबर २००८ रोजी मान्यता दिलेली आहे. सदर मान्यता ही लेखापरीक्षणानंतरची असली तरी याबाबतचा प्रस्ताव प्रथम तयार करण्यात आला होता असेही त्यांनी स्पष्ट केले. लाभधारक कंपनीकडून देण्यात आलेल्या जागेचा वापर विहीत मुदतीत न केल्याबाबत मुदत

संपून गेली असल्यामुळे भूखंड परत घेण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही करण्यात आली? असे समितीने विचारले असता महामंडाळाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की प्रचलित असलेल्या नियमानुसार त्यांना त्याठिकाणी उत्पादन घेण्यासाठी ४ वर्षांची मुदत देण्यात आली होती. सन २००७ मध्ये दिलेल्या जागेवर त्यांनी सन २०११ पर्यंत युनीट उभारून उत्पादन सुरू करणे आवश्यक होते. त्यांनी विहीत मुदतीत जागेचा उपयोग न केल्यामुळे गेल्या दोन महिन्यांपासून त्यांच्याकडून सदर भूखंड परत घेण्याची कार्यवाही सुरू केलेली आहे. असे एकूण त्याठिकाणी १२०० भूखंड परत घेतलेले आहेत. त्यामधील काही उद्योजक न्यायालयात देखील गेलेले आहेत. परत घेतलेले भूखंड इतर उद्योजकांना वाटप केलेले आहेत असे त्यांनी स्पष्ट केले. शासनाची पूर्ण परवानगी न घेता सवलतीच्या दराने भूखंडाचे वाटप केल्यामुळे नुकसान झाले आहे, त्यामुळे तात्कालीन विभागीय स्तरावर सदर सवलतीच्या दराबद्दलचा ठराव रद्दबातल करण्यासाठी काही कार्यवाही विभागाने प्रस्तावीत केली होती काय ? असे समितीने विचारले असता महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याची स्पष्ट केले. याबाबत समितीने अशी धारणा व्यक्त केली की फक्त एका कंपनीला लाभ होण्याच्या दृष्टीने सदरहू ठराव केला गेला ही वस्तुस्थिती आहे काय? यावर समितीला स्पष्टीकरण मिळाले नाही. जागा परत घेण्यासाठी दिनांक ३१ जूलै २०१२ रोजी सुचनेद्वारे त्यांना कळविण्यात आले असून पुढील पाठविण्यात येणाऱ्या सुचनेमध्ये कालावधी स्पष्टपणे कळविला जाईल असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी एका प्रश्नाच्या उत्तरादाखल स्पष्ट केले. तसेच प्रकल्पाची सुरूवात करण्यासाठी असलेल्या पायाभूत सुविधा नरढाणा औद्योगिक क्षेत्रामध्ये असल्यामुळे कंपनीचा मुदतवाढीचा कोणताही प्रस्ताव मान्य करण्यात येणार नाही असेही स्पष्ट केले.

याबाबत महामंडळाने सवलतीच्या दराबाबतचा प्रस्ताव कार्योत्तर मंजुरीसाठी विभागीय स्तरावर पाठविल्यानंतर विभागाने काय कार्यवाही केली हे जाणून घेण्यासाठी विभागीय सचिवांना समितीने १६ ऑक्टोबर २०१२ रोजी पाचरण केले. व समितीने विचारले की महामंडळ स्तरावरून घेतलेला निर्णय शासनाच्या पूर्वपरवानगीसाठी कार्योत्तर सादर केला गेला. परंतु याबाबत शासनाची परवानगी मिळेपर्यंत महामंडळाने लाभधारक कंपनीला भूखंडाचा ताबा द्यावयास नको होता. याबाबत विभागाचे काय धोरण आहे असे विचारले असता विभागीय सचिवांनी सांगितले की सवलतीच्या दराने भूखंड वितरण करण्यासाठीचा प्रस्ताव शासन स्तरावर कार्योत्तर मंजुरीसाठी पाठविण्यात आल्यानंतर त्यावर विभागीय स्तरावर काही कारणांचा परामर्श घेतला गेला व नरढाणा औद्योगिक क्षेत्राचे भूसंपादन १९९६ मध्ये होऊन देखील सन २००६ पर्यंत तेथील भूखंडास मागणी नव्हती ही बाब प्रामुख्याने विचारात घेतली गेली. तसेच तेथील औद्योगिक क्षेत्रामध्ये पायाभूत सुविधादेखील प्रथम उपलब्ध नव्हत्या. लाभधारक कंपनीने वस्त्रोद्योगाच्या उद्योगांना चालना मिळण्यासाठी भूखंड घेतल्यामुळे तेथील परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात होणारे कापसाचे उत्पादन हा घटक देखील विचारात घेतला गेला होता. रोजगाराची निर्मिती होण्याच्या दृष्टीने वितरित करण्यात आलेल्या सवलतीच्या दरातील भूखंडास कार्योत्तर मंजुरी दिली गेली. व या प्रकरणी लेखापरीक्षण करताना मुद्दा



उपस्थित होईल हे देखील विभागीय स्तरावर स्पष्ट केले गेले होते. दिनांक ८ जुलै १९८७ च्या पत्रान्वये सवलतीच्या दराने भूखंड देऊ नयेत असे शासनाने निर्देश दिले होते. व प्रचलित दराऐवजी सवलतीच्या दराने औद्योगिक क्षेत्रातील जमीन वितरित करावयाची असेल तर त्यासाठी शासनाची पूर्वसंमती घेण्यात यावी असेही त्यांनी स्पष्ट केले. जागेचा वापर न केल्यामुळे भूखंड परत मिळविण्यासाठी प्रथम ३१ जुलै, २०१२ रोजी संबंधित कंपनीला सूचनेद्वारे कळविले असून त्यामध्ये कालावधी स्पष्ट केला नसल्यामुळे दिनांक ३ ऑक्टोबर २०१२ रोजी कालावधी नमूद करून संबंधित कंपनीला पुन्हा सूचनेद्वारे कळविले आहे. असे त्यांनी स्पष्ट केले. विहित कालावधी उलटून गेल्यानंतरदेखील महामंडळाने सदर भूखंड परत ताब्यात का घेतला नाही ? असे समितीने विचारले असता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे सहव्यवस्थापक यांनी सांगितले की, नरढाणा औद्योगिक क्षेत्र हे "ड" वर्गामध्ये आहे. या वर्गातील औद्योगिक क्षेत्रामध्ये ५ वर्षांचा कालावधी दिला जातो. सदर कालावधीत विकास करण्यात आला नाही तर पाच टक्के दंड आकारून मुदतवाढ दिली जाते. आणि सदर मुदतवाढीला संचालक मंडळाची मान्यतेची आवश्यकता नसते. संबंधित लाभधारक कंपनीने सन २००८ मध्ये १७,७२७ स्क्वेअर मी. क्षेत्रावर बांधकाम करण्याची परवानगी घेतली आहे. संबंधित कंपनीस भूखंडाचे वाटप करताना एकच भूखंड वितरणाचे पत्र देण्यात आलेले आहे. ५० एकर जमीनीपैकी फक्त ३ एकर जमीनीवर बांधकाम स्वरूपाचे काम सूरू केलेले आहे. असे त्यांनी स्पष्ट केले. याबाबत अधिक स्पष्टीकरण देताना विभागीय सचिवांनी संबंधित लाभधारक कंपनीला बजावण्यात आलेल्या नोटीशीनुसार १५ दिवसांच्या आत खुलासा सादर करण्याविषयी सांगितले असून खुलासा समाधानकारक न वाटल्यास महामंडळाच्या प्रचलित धोरणानुसार सदर भूखंड परत घेण्यात येईल हे त्यांनी नमूद केले. महामंडळाचे औद्योगिक धोरण स्पष्ट करताना विभागीय सचिव यांनी स्पष्ट केले की राज्यामध्ये उद्योगाला चालना देणे, उद्योगांचा विकास करणे ही आहे. भावी उद्योजकांना आपण विकसित जमीन प्रकल्पासाठी देऊ शकलो तर तेथे गुंतवणूक करणारे उद्योजक लवकर येऊ शकतील या हेतूने जेथे पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत अशी राज्याच्या वेगवेगळ्या भागातील जागा औद्योगिक विकास महामंडळ उद्योजकांना उपलब्ध करून देते. जेणेकरून गुंतवणूक करू इच्छिणाऱ्यांना विकसित जमीन मिळून लवकरात लवकर उद्योग सुरू करणे शक्य होईल. लाभधारक कंपनीला सवलतीच्या दराने भूखंड वितरित करताना शासन जी किंमत निश्चित करेल ती रक्कम भरण्यास तयार असल्याबाबतचे हमीपत्र घेण्याची दक्षता देखील घेण्यात आली होती. अविकसित क्षेत्राचा विकास होणे व रोजगार निर्मिती होणे हा मुख्य उद्देश सवलतीच्या दराने भूखंड देण्यामागे होता. असे विभागीय सचिव यांनी स्पष्ट केले. या भूखंडाबाबत निर्णय घेताना लाभधारक कंपनी खरोखरच त्या ठिकाणी विकास करणार आहेत का, असल्यास त्याकरिता किती कालावधी लागेल, त्यासाठी त्यांच्याकडे वित्तीय उपलब्धी आहे का वगैरे गोष्टींचा परामर्श घेतला पाहिजे, तसेच, महामंडळाने त्यांच्या मुदतवाढीबाबतच्या विनंती अर्जावर बोर्डाच्या स्तरावर निर्णय घेताना सदर लाभधारक कंपनी नुसताच कालापव्यय करीत आहे की, विकासाकरिता त्यांच्याकडे ठळक योजना आहे या सर्व गोष्टींचा विचार करावा लागेल. महामंडळाने आपल्या अधिकारात

(शा.म.मु.) एचबी १९९३—५ (६५०—१२-२०१२)

जमीन देण्याचा निर्णय घेतला तो रद्द करण्याचा निर्णय त्यांनी घेणे उचित ठरेल. असे त्यांनी बैठकीच्या शेवटी स्पष्ट केले.

**१५.५ अभिप्राय व शिफारशी :**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने नरढाणा औद्योगिक क्षेत्र, धुळे जिल्हा या ठिकाणी उद्योगासाठी क्षेत्र विकसित करताना त्यातील एक भूखंड वस्त्रोद्योग उपक्रमासाठी विकसित करण्यासाठी व्हर्टेक्स स्पिनिंग मर्यादित या कंपनीला सवलतीच्या दराने भूखंड दिल्यामुळे रुपये ३.२० कोटीचे नुकसान झाले असा महालेखाकाराने लेखा परीक्षणामध्ये आक्षेप नोंदविला होता. नरढाणा, जि.धुळे येथील औद्योगिक क्षेत्राची निर्मिती होण्यासाठी संपादन करण्यात आलेली जमीन व त्याचे औद्योगिक क्षेत्राच्या दृष्टीने वितरण करण्यासाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करून भूखंड वितरणाची जबाबदारी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे होती. तेथील भाग विशेषतः अविकसित असल्यामुळे औद्योगिक क्षेत्रासाठी जमिनीकरिता मागणी नव्हती. धुळे येथील परिसरात कापसाचे उत्पादन जास्त असल्यामुळे जेव्हा केंद्र शासनाने वस्त्रोद्योग पार्कची योजना राबविण्याचे धोरण ठरविल्यानंतर व्हर्टेक्स स्पिनिंग या कंपनीने सदर ठिकाणी वस्त्रोद्योगाशी संबंधित छोटे छोटे उद्योग सुरू करण्याचा विचार करून प्रथम ५० एकर जागेची मागणी केली. तद्नंतर पूरक उद्योगासाठी जागेची निकड भविष्यात लागण्याची शक्यता लक्षात घेऊन अधिकची ३५० एकर जमिनीची महामंडळाकडे मागणी केली व तसे करताना तेथील प्रचलित असलेल्या दरामध्ये सवलत देऊन कमी दराने भूखंड वितरीत करण्यासाठी निवेदन सादर केले. सदर निवेदनाचा महामंडळाच्या संचालक मंडळाने विचार करून सवलतीच्या दराने एकंदरित ४०० एकर जागा प्रति १० रुपये स्क्वेअर मी. या सवलतीच्या दराने देण्याचा निर्णय घेतला व सवलतीच्या दराने भूखंड देण्यासाठी शासनाची आवश्यकता असल्याने शासनाकडे पाठविताना भूखंड वितरित करून शासन स्तरावर कार्योत्तर मंजुरीसाठी पाठविला. ही बाब समितीसमोर झालेल्या साक्षीवरून स्पष्ट होते. शासनाची मंजुरी मिळण्याअगोदर भूखंडाचे केलेले वाटप व शासनाने याबाबत लेखापरीक्षण झाल्यानंतर महामंडळाच्या उपरोक्त प्रस्तावास कार्योत्तर दिलेली मंजुरी व मंजुरी देताना होणारे नुकसान टाळण्यासाठी होत असलेल्या नुकसानीची भरपाईसाठी घालण्यात आलेली अट लक्षात घेता महामंडळाने वितरित केलेल्या भूखंडाच्या किंमतीचे आर्थिक नुकसान जरी टळले असले तरी घाईघाईने भूखंड वितरीत करण्याचा घेतलेला निर्णय हा चुकीचाच होता असे समितीचे मत आहे. धुळे हा भाग सूरत या वस्त्रोद्योग प्रवत क्षेत्राजवळचा असून राज्यातील आदिवासी बहुल भाग आहे. या क्षेत्रातील लोकांना रोजगार मिळावा म्हणून मोठ्या प्रमाणात उद्योग यावेत. हे शासनाचे धोरण आहे. परंतु सदर कंपनीने मोठ्या प्रमाणात जमीन ताब्यात घेऊनही विहित मुदतीत त्या जागेवर अपेक्षीत उद्योग उभा केला नसल्यामुळे धुळे क्षेत्रातील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होऊ शकला नाही ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. भूखंड वितरणानंतरदेखील संबंधित लाभधारक कंपनीने विहित कालावधीत सदर भूखंडावर विकास न केल्यामुळे शासनाच्या प्रचलित नियमानुसार भूखंड परत मिळविण्यासाठी करावयाच्या कार्यवाहीस देखील महामंडळाकडून विलंब होत



आहे. यासाठी विभागाने समितीमध्ये सुचविल्यानुसार याबाबत संबंधित लाभधारक कंपनीने कुठल्याही मुदतवाढीची मागणी केल्यास संबंधित लाभधारक कंपनीकडून खरोखरच त्याठिकाणी मागणी केल्याप्रमाणे उद्योग उभारून त्या परिसराचा विकास करणार आहेत का ? असल्यास त्यासाठी त्यांना किती कालावधी लागेल ? व त्यासाठी आवश्यक असलेला वित्तीय उपलब्धी त्यांच्याकडे उपलब्ध आहे का? याचा परामर्श घ्यावा. मुदतीवाढीचा विनंती अर्ज सादर करून नुसताच यामध्ये विलंब करावयाचा उद्देश संबंधित लाभधारकाचा आहे काय? व त्यानुसार त्यांच्यासमोर साचेबंद कार्यक्रम तयार आहे का? याचाही महामंडळ स्तरावर अभ्यास करावा. ज्याप्रमाणे आपल्या अधिकारात जमीन देण्याचा निर्णय महामंडळाने घेतला. त्याप्रमाणे तो रद्द करण्याचा निर्णय देखील महामंडळ स्तरावर सर्वांगीण घडामोडीचा परामर्श घेऊन त्वरेने घ्यावा. लाभधारक कंपनीला मोठ्या प्रमाणावर जमीन ताब्यात देण्यात आली आहे व त्याचा वापर अद्यापही उद्दीष्ट पूर्तीसाठी करण्यात आलेला नाही. ही बाब विचारात घेता महामंडळाने यापुढील काळात सवलतीच्या दराने भूखंड देताना शासनाची पूर्व परवानगी घेतल्याशिवाय भूखंड वितरणाचे आदेश काढण्यात येऊ नयेत. तसेच महामंडळाने सदर कंपनीविरुद्ध प्रस्तावित केलेली कार्यवाही त्वरेने निकाली काढावी तसेच सदर औद्योगिक क्षेत्रामधील दिले गेलेले भूखंड व त्यांनी त्यावर सुरू करावयाचे उद्योग याचा तातडीने परामर्श घेऊन उद्योग विहित कालावधीत सुरू झालेल नसल्यास. त्यावर नियमानुसार त्वरित कार्यवाही करावी, अशी समिती शिफारस करीत आहे. याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत देण्यात यावी.

**सोळा "निविदांना अंतिमरुप देण्यामधील विलंबामुळे जादा खर्च"**

१६.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००७-२००८ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.२० मध्ये "निविदांना अंतिमरुप देण्यामधील विलंबामुळे जादा खर्च" यांचे संबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, **निर्विदांना अंतिमरुप देण्यामधील विलंबामुळे महामंडळाला पाणीपुरवठा योजनेसाठीचे व्हीटी पंप स्थापित करण्यामध्ये रुपये ६६ लाखांचा अतिरिक्त खर्च करावा लागला होता व विद्युत वापरामधील रुपये १.६२ कोटीच्या संभाव्य बचतीचा फायदा मिळाला नव्हता.**

महामंडळाने त्यांच्या पाताळगंगा (रायगड), शहाड व जांभुळ (ठाणे) येथे स्थित असलेले अशुद्ध पाणीपुरवठा व शुद्ध पाणी पंपींग स्टेशन्समधील व्हरटिकल टरबाईन पंप (व्हीटी) बदलण्यासाठी निविदा मागविल्या (जून २००३) होत्या. या बदलामुळे विद्युत वापरामध्ये दरमहा रुपये १३.३८ लाखांची बचत होणार होती.

महामंडळाला डिसेंबर २००३ मध्ये मिळालेल्या निविदांना निविदांच्या वाढीव विधीग्रह्यता कालावधीमध्ये सुद्धा (जुलै २००४) अंतिमरुप देणे शक्य झाले नव्हते व बोलीदारांनी त्यांच्या देकारांची विधीग्राह्यता पुढील कालावधीसाठी वाढविण्यास मान्यता दिली नव्हती. त्यामुळे महामंडळाने पुन्हा निविदा मागविल्या (नोव्हेंबर २००४) व पाताळगंगा, शहाड व जांभुळ येथे कामपूर्ण करण्यासाठीचे विहित तारीख अनुक्रमे नोव्हेंबर २००५, फेब्रुवारी व मार्च २००६ असलेले कामाचे आदेश जारी (मे, जून व ऑगस्ट २००५) केले होते.

लेखापरीक्षणांत असे निदर्शनास (ऑक्टोबर २००७) आले की ज्यांना अंतिमरुप देण्यात आले नाही अशा पहिल्या निविदांमध्ये मागविलेल्या देकारानुसारची किंमत (रुपये २.३१ कोटी) व स्वीकृत करण्यात आलेल्या निविदांची किंमत (रुपये २.९७ कोटी) यामधील तफावत म्हणजे रुपये ६६ लाख एवढा अतिरिक्त खर्च महामंडळाला करावा लागला होता. त्याशिवाय, निविदांना अंतिमरुप देण्यात झालेल्या विलंबामुळे पंप स्थापित करण्यामध्ये उशीर झाला होता व परिणामस्वरूप विद्युत वापरामधील रुपये १.६२ कोटीचा संभाव्य बचतीचा फायदा महामंडळ घेऊ शकले नव्हते.

व्यवस्थापनाने स्वीकारले होते (मे २००८) की सक्षम अधिकाऱ्याची मान्यता घेण्यामधील विलंबामुळे वाढीव विधीग्राह्यता कालावधीमध्ये देखील निविदांना अंतिमरुप देण्यात आले नव्हते त्यांनी पुढे असेही म्हटले होते की संभाव्य बचत पंपाच्या वाढलेल्या कालावधीसाठी मिळेल. शासनाने महामंडळाच्या दृष्टीकोनाची पुष्टी केली होती (जून २००८).

परंतु हे तथ्य तसेच शिल्लक राहते की मान्यता मिळविण्यामधील विलंब टाळता येण्याजोगा होता व पंपांच्या वाढीव कालावधीसाठीच्या विजेच्या वापराची विलंबामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई होणार नव्हती.

१६.२ या प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणांत्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले की, प्रथम मागणीच्या वेळी आलेल्या देकाराची तपासणी करता दुसऱ्या ठेकेदाराने न्युनतम ठेकेदाराकडे पंप तपासण्याची सुविधा नसल्याचे निदर्शनास आणल्यानंतर, अभियांत्रिकी विभागातील सक्षम अधिकाऱ्यास दिल्ली तेथील कारखान्यास प्रत्यक्ष भेट देऊन वस्तुस्थिती सादर करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. सदर निर्णय प्रक्रियेस प्रशासकीय कारणास्तव विलंब झाल्यामुळे व केंद्र शासन व राज्य शासन यांचे अंदाजपत्रकामध्ये झालेल्या बदलामुळे पंप निर्मितीच्या किंमतीत वाढ झाली. निविदा या अंदाजपत्रक मंजूर होण्यापूर्वीच्या असल्याने व अंदाजपत्रकात झालेली वाढ विचारात घेता मूळ दरात काम करणे हे अशक्य असल्याने न्युनतम देकाराने पूर्वी दिलेल्या देकाराप्रमाणे काम करण्यास नकार दिला ही बाब स्वयंस्पष्ट आहे. द्वितीय मागणीच्या वेळी त्यावेळी असलेली बाजारातील पंप निर्मितीस येणारी किंमत विचारात घेऊन देकार प्राप्त झाला ही वस्तुस्थिती होती. द्वितीय मागणीच्या वेळी मंजूर केलेल्या देकारानुसार झालेला खर्च काल्पनिक नुकसान (Notional Loss) होते.

काम करण्यास झालेल्या उशीरामुळे ठेकेदारावर करारनामा कलम २ नुसार उक्त कारवाई करण्यात येऊन नियमानुसार अंदाजित रकमेच्या जास्तीत जास्त १० टक्क्यांपर्यंत नुक्सानभरपाई वसूल करण्यात आली. विलंबित कालावधीमध्ये ठेका रद्द करणे महामंडळाचे दृष्टीने वाजवी नसल्याने मूळ ठेकेदाराकडून नुक्सानभरपाई कलमानुसार केलेली कारवाई योग्य होती. त्यामुळे विलंबित कालावधीमधील विजेच्या बचतीअभावी झालेले रूपये १.६२ कोटीचे नुकसान हे काल्पनिक नुकसान आहे.



१६.३ महालेखाकार कार्यालयाकडून प्राप्त वाणिज्यिक परिच्छेदामध्ये नमूद केलेल्या बाबींसंदर्भात महामंडळाच्या स्तरावर निर्णय घेण्यात आला आहे. यास्तव महामंडळाच्या अखत्यारितील बाबीवर विभाग भाष्य करू शकत नाही.

१६.४ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने त्यांच्या पाताळगंगा (रायगड) शहाड व जांभूळ (ठाणे) याठिकाणी असलेल्या अशुद्ध पाणीपुरवठा शुद्ध करण्यासाठी पंपींग स्टेशनमधील व्हर्टीकल टर्बाईन पंप बदलण्यासाठी निविदा मागविल्या होत्या. सदर पंप बसविल्यामुळे विद्युत वापरामध्ये बचत होणार होती. यासाठी काढलेल्या निविदांना अंतिम रूप देताना विधीग्राह्यता कालावधीमध्ये ते देणे शक्य झाले नव्हते त्यामुळे फेरनिविदा काढणे आवश्यक होते. फेरनिविदा काढल्यामुळे झालेल्या कालापव्ययामुळे पंप स्थापित करण्यामध्ये अतिरिक्त खर्च करावा लागला होता. असा महालेखाकारांनी आक्षेप नोंदविला होता. याबाबत वस्तुस्थिती विषद करण्याविषयी समितीने सांगितले असता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य अभियंता यांनी सांगितले की प्रथम प्राप्त झालेली निविदा २.३१ लाख रुपयांची होती, व दुसऱ्या निविदा मागविल्यानंतर दुसरी निविदा ही २.९७ कोटी रुपयांची होती. यामध्ये ६६ लाख रुपये जास्त खर्च करावे लागले आहेत. प्रथम प्राप्त झालेल्या निविदेचा विधीग्राह्यता कालावधी १२० दिवसांचा होता. सदर कालावधीत त्याची प्रक्रिया पूर्ण न झाल्यामुळे ती निविदा रद्द करावी लागली. आता विधीग्राह्यता कालावधी १२० दिवसांवरून १८० दिवस केला गेलेला आहे. यासंबंधातील काम ज्या ठेकेदाराला देण्यात आलले होते ते त्यांनी विहित कालावधीत पूर्ण न केल्यामुळे त्यांच्याकडून निविदा रकमेच्या १० टक्के रक्कम म्हणजे २८ लाख रुपये वसूल केलेले आहेत. तसेच व्याजापोटी ३५ लाख रुपये वाचविलेले आहेत. असे एकुण ६३ लाख रुपये इतकी बचत झाल्याचे सांगून सदर महालेखाकारांनी दाखविलेले नुकसान काल्पनिक स्वरूपाचे आहे असे स्पष्टीकरण केले. विधीग्राह्यता कालावधीत ज्या अधिकाऱ्यांनी प्रक्रिया कार्यवाही पूर्ण केलेली नाही. की ज्यामुळे महामंडळाचे आर्थिक नुकसान झाले त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली? असे समितीने विचारले असता महामंडळाच्या मुख्य अभियंता यांनी या संबंधात उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरून संबंधितावर कोणतीही कारवाई करण्यात आल्याचे दिसून येत नाही असे उत्तर दिले. याबाबत बसविण्यात येणारे पंप तपासण्याची सुविधा ठेकेदाराकडे नसल्यामुळे त्याची शहानिशा करण्यासाठी काही अधिकारी दिल्ली याठिकाणी गेले होते असेही त्यांनी स्पष्ट केले. याबाबत विभागाने अभिप्राय व्यक्त करताना महामंडळ स्तरावर निर्णय घेण्यात आल्यामुळे महामंडळाच्या अखत्यारितीतील बाबींवर विभाग भाष्य करू शकत नाही. असे लिहिलेले असल्यामुळे याबाबत चौकशी होणे गरजेचे आहे असे समितीला वाटते तशी नोंद समितीने घेतली व याप्रकरणी चौकशी करून समितीला अहवाल सादर करावा असेही सुचविले.

### १६.५ अभिप्राय व शिफारशी

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने त्यांच्या पाताळगंगा (रायगड) शहाड व जांभूळ (ठाणे) याठिकाणी असलेल्या अशुद्ध पाणीपुरवठा शुद्ध करण्यासाठी पंपींग स्टेशनमधील व्हर्टीकल टर्बाईन पंप**

बदलण्यासाठी निविदा मागविल्या होत्या. सदर पंप बसविल्यामुळे विद्युत वापरामध्ये बचत होणार होती. यासाठी काढलेल्या निविदांना अंतिम रूप विधीग्राह्यता कालावधीमध्येसुद्धा देणे शक्य झाले नव्हते, त्यामुळे फेरनिविदा काढणे आवश्यक होते. फेरनिविदा काढल्यामुळे झालेल्या कालापव्ययामुळे पंप स्थापित करण्यामध्ये अतिरिक्त खर्च करावा लागला होता. असा महालेखाकारांनी नोंदविलेला आक्षेप बरोबर होता असे समितीसमोर झालेल्या साक्षीवरून समितीला दिसून आले. याप्रकरणी कार्यवाही करताना प्रथम सादर केलेल्या निविदेतील विधीग्राह्य कालावधीत अंतिम रूप न दिल्यामुळे फेरनिविदा काढली गेली व तसे केले गेल्यानंतर प्राप्त झालेल्या निविदेतील वरचढ रकमेमुळे महामंडळाला सदर कामासाठी अधिक आर्थिक नुकसान सोसावे लागले. ही वस्तुस्थिती समितीला दिसून आली तसेच विजेची बचत होण्यासाठी बसवावयाच्या विद्युत पंपामध्ये विलंबदेखील झाला. त्यामुळे ते नुकसानदेखील अधिकचेच होते. एकंदरीत महामंडळामध्ये कार्यरत असलेल्या तत्कालीन अधिकाऱ्यांनी वाणिज्यिक प्रथेनुसार सुयोग्य वाणिज्य तत्त्वांचा वापर केला नसल्याचे दिसून येते. अशा कर्तव्यात कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांची समितीमध्ये झालेल्या चर्चेनुसार सुचविल्याप्रमाणे चौकशी करून जबाबदारी निश्चित करून अशा अधिकाऱ्यांना जरब निर्माण होण्याच्या दृष्टीने कडक कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. याप्रकरणी केलेली कार्यवाही समितीला तीन महिन्याच्या आत कळविण्यात यावी.

---

# बैठकींचे परिशिष्ट

**बुधवार, दिनांक १२ सप्टेंबर २०१२, विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

**समिती प्रमुख :**

(१) डॉ. कल्याण काळे, वि.स.स.

**सदस्य :**

(२) श्री. सुभाष घोटे, वि.स.स.

(३) श्री. दिनानाथ पडोळे, वि.स.स.

(४) श्री. शिरिषकुमार कोतवाल, वि.स.स.

(५) श्री. संजय वाघचौरे, वि.स.स.

(६) श्री. हनुमंत डोळस, वि.स.स.

(७) श्री. विकास कुंभारे, वि.स.स.

(८) श्री. कृष्णा खोपडे, वि.स.स.

(९) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(१०) श्रीमती अलका देसाई, वि.प.स.

(११) श्री. हेमंत टकले, वि.प.स.

(१२) श्री. सतिश चव्हाण, वि.प.स.

(१३) डॉ. दिपक सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. विलास आठवले, उप सचिव.

**महालेखाकार कार्यालय, मुंबई :**

१. श्री. पी. एन. शेषाद्री, महालेखाकार (वाणिज्यिक)

२. श्री. एस. व्ही. खेडकर, वरिष्ठ लेखाधिकारी.

**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (ऊर्जा) विभाग :**

श्री. अविनाश सुभेदार, उप सचिव.

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित :**

श्री. अजय मेहता, व्यवस्थापकीय संचालक, विद्युत वितरण कंपनी मर्यादित.

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित**

श्री. आशीष शर्मा, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित.

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००६-२००७ च्या वाणिज्यिक अहवालातील "महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित" व "महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित" यांच्या परिच्छेदासंबंधात विभागीय सचिवांची तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

## गुरुवार, दिनांक ११ ऑक्टोबर २०१२, विधान भवन, मुंबई

**उपस्थिती :**

**समिती प्रमुख :**

(१) डॉ.कल्याण काळे, वि.स.स.

**सदस्य :**

(२) श्री.संग्राम थोपटे, वि.स.स.

(३) श्री. दिनानाथ पडोळे, वि.स.स.

(४) श्री. संजय वाघचौरे, वि.स.स.

(५) श्री. हनुमंत डोळस, वि.स.स.

(६) श्री. विकास कुंभारे, वि.स.स.

(७) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(८) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.

(९) श्री. चिमणराव पाटील, वि.स.स.

(१०) श्रीमती अलका देसाई, वि.प.स.

(११) श्री. हेमंत टकले, वि.प.स.

(१२) डॉ. दिपक सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. विलास आठवले, उप सचिव,

श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव.

**महालेखाकार कार्यालय, मुंबई :**

१. श्री. व्यंकटरमन, उप महालेखाकार (वाणिज्यिक),

२. श्री. एस. व्ही. खेडकर, वरिष्ठ लेखाधिकारी.

**महसूल व वन विभाग (महसूल) :**

श्री. स्वाधीन क्षत्रिय, अपर मुख्य सचिव.

**महाराष्ट्र शेती विकास महामंडळ :**

श्री. यु. के. अगरवाल, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र शेती विकास महामंडळ

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००७- २००८ च्या वाणिज्यिक अहवालातील "महाराष्ट्र शेती विकास महामंडळ" यांच्या परिच्छेदासंबंधात विभागीय सचिवांची तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक २६ सप्टेंबर २०१२, विधान भवन, पुणे**

**उपस्थिती :**

**समिती प्रमुख :**

(१) डॉ. कल्याण काळे, वि.स.स.

**सदस्य :**

(२) श्री. सुभाष घोटे, वि.स.स.

(३) श्री. दिनानाथ पडोळे, वि.स.स.

(४) श्री. शिरिषकुमार कोतवाल, वि.स.स.

(५) श्री. संजय वाघचौरे, वि.स.स.

(६) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(७) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.

(८) श्री. महादेव बाबर, वि.स.स.

(९) श्री. वसंत गीते, वि.स.स.

(१०) श्रीमती अलका देसाई, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. विलास आठवले, उप सचिव

**महालेखाकार कार्यालय, मुंबई :**

श्रीमती आर. राजलक्ष्मी, उप महालेखाकार (वाणिज्यिक)

**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (उद्योग) :**

श्री. क्रिशोर कदम, उप सचिव

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ ;**

श्री. भूषण गगराणी, मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ.

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७- २००८ च्या वाणिज्यिक अहवालातील "महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ" यांच्या परिच्छेदासंबंधात विभागीय अधिकारी तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.



**मंगळवार, दिनांक १६ ऑक्टोबर २०१२, विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

**समिती प्रमुख :**

(१) डॉ.कल्याण काळे, वि.स.स.

**सदस्य :**

(२) श्री. हनुमंत डोळस, वि.स.स.

(३) श्री. विकास कुंभारे, वि.स.स.

(४) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(५) श्रीमती अलका देसाई, वि.प.स.

(६) डॉ. दिपक सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव

**महालेखाकार कार्यालय, मुंबई :**

१. श्री. पी.एन.शेषाद्री, महालेखाकार (वाणिज्यिक)

२. श्री. एस. व्ही. खेडकर, वरिष्ठ लेखाधिकारी.

**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (उद्योग) :**

श्री. मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव (प्रभारी)

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ :**

श्री. पी. अन्बलगन, सह मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ.

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७- २००८ च्या वाणिज्यिक अहवालातील "महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ" यांच्या परिच्छेदासंबंधात विभागीय सचिवांची तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक २७ नोव्हेंबर २०१२ विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

**कार्यकारी समिती प्रमुख :**

(१) श्री. योगेश सागर, वि.स.स.

**सदस्य :**

(२) श्री. सुभाष धोटे, वि.स.स.

(३) श्री. शिरिषकुमार कोतवाल, वि.स.स.

(४) श्री. संजय वाघचौरे, वि.स.स.

(५) श्री. हनुमंत डोळस, वि.स.स.

(६) ॲड. अशोक पवार, वि.स.स

(७) श्री. विकास कुंभारे, वि.स.स

(८) श्री. चिमणराव पाटील, वि.स.स.

(९) श्री. संजय दत्त, वि.प.स

(१०) श्रीमती अलका देसाई, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव.

(२) श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव.

समितीने प्रारूप अहवालाच्या मसुद्यांवर विचार करून तो काही सुधारणांसह सहमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई